२४ मे १९६९ । चाळीस पैसे

# माणूस

'बागायतदार, बडे घरमालक, चांगले उत्पन्न कमावणारे व्यावसायिक यांच्यावर दोन वर्षांपुरता 'पुनर्वसन कर' बसवून कोयना भूकंपाच्या संकटावर मात केली पाहिजे. दर वेळी आपत्ती आली की भिकेची झोळी घेऊन दारोदार फिरावे हे नवोदित, स्वाभिमानी राष्ट्राला शोभणारे .........

[ कव्हर पान ४ पाहा ]






"मला वाटतं, अशीच चर्चा आणखी काही दिवस चालली तर तुमचं नाव जनतेला फारसं माहित नाही म्हणन तरी विरोध करणं कठीण जाईल..."

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : आठवे : अंक : बावन्नावा

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

परदेशाची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. मे, १४

आपला ३ मेचा अंक वाचला. मुंबईतील कामगारांच्या राहण्याच्या जागेच्या ज्वलंत प्रश्नाबाबत आपण परिश्रमपूर्वक जे लेख संकलित केले आहेत ते उत्कृष्ट आहेत. आपल्या ह्या उपक्रमाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन.

आमच्याही ऑर्गनायझेशनने मध्यमवर्गीय कर्मचाऱ्यांनाही भेडसावणाऱ्या ह्या जागेच्या प्रश्नाबाबत एक पाऊल म्हणून सहकारी पद्धतीवर गृहनिर्माण मंडळे (Co-operative Housing Societies) स्थापावयास प्रारंभ केला आहे. अर्थात बँकेचे ह्याला कर्जाच्या रूपाने आर्थिक साहाय्य मिळते. परंतु योग्य मार्गदर्शनाअभावी कर्मचारी ह्या कर्ज-योजनेचा घ्यावा तेवढा फायदा घेत नाहीत. म्हणून आमची ऑर्गनायझेशन जरूर ते मार्गदर्शन व साहाय्य विनामूल्य करते. सध्या ठाणे येथे आमच्या वतीने दोन हाऊसिंग सोसायट्या काम करीत असून त्यांत एकूण ९० बँक कर्मचाऱ्यांची राहण्याची सोय होईल. हळूहळू आम्ही हे काम मोठ्या प्रमाणावर हाती घेऊ.

—सु. पु. बाक्रे

स. न. मे, १४

१० मे १९६९ च्या अंकातील "जनसंघ अधिवेशन – आश्वासन आणि अपेक्षा" या लेखातील काही अपेक्षांना

किंमत : ४० पैसे

१०२५ सदाशिव

पुणे २

दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. कल्पित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

(आक्षेपांना ?) उत्तर देण्याचा किंबहुना त्यांसंबंधी काही विवरण करण्याचा हा एक छोटासा प्रामाणिक प्रयत्न !

लेखकद्वयांनी... "भव्य अधिवेशन म्हणजे कार्यकर्त्यांचा उत्साह व विश्वास वाढवण्याचे एक साधनच असते... जनसंघाने या संधीचा कसा फायदा घेतला याचा विचार करता निराशाच पदरी येते" ...असे एक चमत्कारिक विधान केले आहे. त्यांना निश्चित काय म्हणायचे आहे ते कळू शकत नाही. त्यांनी जे जसे लिहिले आहे ते तसेच त्यांना म्हणायचे असल्यास, विधानाचा पूर्वार्ध पूर्णपणे बरोबर आहे, परंतु उत्तरार्धातला निष्कर्ष काढता येण्याइतका किमान कालावधी अधिवेशनानंतर गेला का ? अधिवेशनापूर्वीच्या तयारीच्या काळात, अधिवेशनाच्या ६–७ दिवसांत व त्यानंतरच्या गेल्या १३–१४ दिवसांत उत्साह व विश्वास गमावून बसलेले जनसंघ कार्यकर्ते, लेखकांना भेटले, दिसले काय ? उलटपक्षी, सर्व ठिकाणी मध्यावधी निवडणुकांत झालेला अपेक्षाभंग व महाराष्ट्रात, मुंबईत अद्याप विशेष न लाभलेले यश, या पार्श्वभूमीवरही, पूर्ण भारतातून सुमारे १७–१८ हजार कार्यकर्ते, प्रतिनिधी म्हणून येतात. मुंबई व परिसरातले सुमारे २॥–३ हजार कार्यकर्ते त्यांची व इतरांची सर्वत्र उत्कृष्ट व्यवस्था पूर्ण अनुशासनाने ठेवतात हीच गोष्ट कार्यकर्त्यांचा उत्साह व स्वतःवरील आणि नेतृत्वावरील विश्वासच दर्शवीत नाही काय ? एक छोटासा कार्यकर्ता या नात्याने व इतर पक्षांतील कार्यकर्त्यांशी मित्रत्वाचे संबंध असल्याने, माझा तर असा अनुभव आहे की, "जनसंघ कार्यकर्त्यांचा उत्साह ढिला पडत नाही, विश्वास कमी होत नाही व निष्ठा डळमळीत होत नाही" हा इतर अनेक पक्षनेत्यांचा व कार्यकर्त्यांचा डोकेदुखीचा विषय आहे ! परंतु याचबरोबर जनसंघ कार्यकर्ता आत्मसंतुष्ट ही नाही.

अस्पृश्यतेबाबतही लेखकद्वयांनी उपस्थित केलेले मुद्दे काहीसे अज्ञानमूलक आहेत. कै. बाबांच्या पुतळ्याला हार घालणे व अस्पृश्यता न मानण्याची घोषणा करणे यांनी 'कार्यभाग झाला' असे जनसंघ कार्यकर्ते वा नेते कसे मानतील ? या गोष्टी प्रतिकात्मकच असतात. जनसंघ निश्चितपणे या बाबतीत काय करू इच्छितो हे स्पष्टपणे दिग्दर्शित करणारा एक सहा सूत्री कार्यक्रम, चिटणीस श्री. नानाजी देशमुख यांनी दि. २८ एप्रिल रोजी मुंबईत एका पत्रकार परिषदेत सादर केला आहे. त्यांचे संपूर्ण Text बरीच जागा अडवील. जिज्ञासूंनी तो नजरेखालून घातल्यास ('विवेक' ४ मे १९६९) 'कार्यभाग होणार असल्याबद्दल त्यांची खात्री पटेल... जनसंघाच्या लहानथोर कार्यकर्त्यांनी–नेत्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून एक 'कार्यक्रम' अमलात आणलेला आहे; तो म्हणजे तथाकथित अस्पृश्यांशी, त्यांना कोणत्याही तऱ्हेचे अस्पृश्य न मानता आपल्याच मातृभूमीचे इतर सर्वांसमान नागरिक मानून त्यांच्याशी आचार व्यवहार करणे ! अस्पृश्यतेच्या कल्पनेलाच

व्यक्तिगत व सामाजिक आचार–विचारांतून निपटून काढणे व त्याला ‘ दलितो-द्धार ’, ‘ अस्पृश्यता–निवारण–मोहीम ’ इत्यादी पृथकता वाढवणारी नावे न देणे व त्याचा डिंडिम न वाजवणे हाच हे सामाजिक लांच्छन पुसून टाकण्याचा प्रभावी मार्ग आहे. हा साधा ‘ कार्यक्रम ’ जनसंघाने ‘ अधिकारावर नसतानाही ’ अमलात आणलेला आहे.

‘ जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांबाबत जनसंघास आच नसावी, ’ असाही भास लेखकद्वयांना कसा झाला नकळे; कारण अधिवेशनातील कार्यवाही जवळून न्याहाळलेल्या सर्व पत्र-प्रतिनिधींना एक गोष्ट विशेषत्वाने जाणवली की कार्य-समिती निवासांतर्गत, ज्या अनेक खोल्या प्रेसरूमच्या जवळपासच होत्या, त्यावर १. शिक्षा, २. हरिजनों की कठिनाइयाँ, ३. गिरिजन और आदिवासियों के प्रश्न ४. सुरक्षा, ५. खाद्यान्न और खेती, ६. व्यापार और उद्योग, ७. परराष्ट्र संबंध, ८. देशांतर्गत व्यवस्था, ९. स्वायत्त नगर शासन, १०. सहकारिता, ११. दलीय संगठन, १२. घटनात्मक व्यवहार, १३. नियोजन इत्यादी फलक होते व वरील विषयांचे सुमारे १५० अभ्यासक–कार्यकर्ते–नेते अभ्यासमंडळांच्या स्वरूपात, दोन दिवस आपापल्या विषयांच्या, स्वतःच्या अभ्यासाच्या व अनुभवाच्या प्रकाशात चर्चा करीत होते व पक्षाच्या भावी कार्याची दिशा निश्चित करीत होते. या गोष्टीचा विशेषत्वाने उल्लेख अनेक वृत्तपत्रांनी केला आहे. हे विषय जनतेच्या जिव्हाळ्याचे नाहीत अशी लेखकद्वयांची धारणा असल्यास प्रश्न वेगळा !

‘ योजना स्वदेशी हवी ’ असे म्हणताना जनसंघास निश्चित काय अभिप्रेत आहे अशी एक शंका लेखकद्वयांनी उपस्थित करून, इंदिराजी व नंबुद्रिपाद यांची किंचित भलावणी करू घातली आहे ! अधिवेशनात चौथ्या योजनेसंबंधी जो ठराव आला, तो दोन-तीन दिवस आधी प्रसिद्ध झालेल्या योजनेच्या ढोबळ रूपरेषेवर आधारित होता. तरीही जनसंघास काय पर्याय अपेक्षित आहेत, यासंबंधीचे विवेचन प्रा. महावीर यांनी दि. २२ एप्रिलच्या पत्रकार परिषदेत केले होते. वृत्तपत्रांनीही त्यांची चांगली दखल घेतली होती; लेखकद्वयांना वृत्तपत्रांचे त्या काळातील अंक मिळाले नाहीत काय ? ...याशिवाय जनसंघाने १९५२–५७ सालापासूनच काँग्रेसच्या वा समाजवाद्यांच्या राजकीय व आर्थिक धोरणांना योग्य व प्रभावी पर्याय देऊनच विरोध केला आहे. जनसंघाचे निवडणूक जाहीरनामे वा इतर प्रकाशने नजरेखालून घातल्यास लेखकद्वयांची यासंबंधी खातरजमा व्हायला प्रत्यवाय नसावा. प्रत्येक गोष्ट संपूर्ण तपशीलासह, अधिवेशनातील तीन दिवसांतच व्हायला हवी ही अपेक्षा कसली निदर्शक आहे ? पक्षांनी दिलेली आश्वासने व ठिकठिकाणचे प्रत्यक्ष कार्य, शासकीय अधिकारात असलेल्या दिल्लीसारख्या ठिकाणचे कार्य, यासंबंधीचे सुस्पष्ट चित्र कार्यकर्त्यांसमोर नियमित बैठकांतून व जनतेसमोर अनेक सभांतून वेळोवेळी ठेवण्यात येतेच !

जनसंघाने केलेल्या कार्याची माहिती देणारी, महती सांगणारी दृश्ये मिरवणुकीत असण ही एक फार सुंदर कल्पना होती; लेखकद्वयांना ती नंतर सुचली काय? कारण आधी सुचली असल्यास त्यांनी ती नंतरच्या लेखात वापरण्यासाठी ठेवून देण्यांऐवजी आपलेपणाने पुरेशी आधी, अधिवेशन कार्यालयात पाठवली असती तर तिच्या शक्यतेबद्दल निश्चितच विचार झाला असता!

जाता जाता एक केवळ गमतीचा विचार येतो. हे लेखकद्वय व्यवसायाने अंतर्गत हिशेब तपासनीस (Internal Auditors) आहेत का हो? कारण, एखाद्या ठिकाणी अकाउन्टिंगमध्ये कुठेच महत्त्वाची चूक न आढळल्यास, सर्व समाधानकारक अहवाल देता देता, ऑडिटर्स कुठे 'C/F लिहायचेच राहून गेले', 'हिशेबपुस्तकाचे कोपरेच मोडले होते', वगैरे अवलोकने टाकायला विसरत नाहीत!

आपला नम्र
**बाळ बरवे**


# पुरंदऱ्यांची नौबत

**ब. मो. पुरंदरे**

मूल्य साडेतीन रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव, पुणे २

## ना-पीतांची नशा !

**बखदरे वसा दर इसलाह् कोशद**
**बगर इसलाह्, नतवानत बेपोशद**

बहुधा काही कळले नसेल ! हा एक फारसी ' बैत ' आहे. याचा अर्थ असा की एखादी विपरीत गोष्ट आढळली आणि अंगात दम असला तर ती सुधारावी. पण जर अंगात दम नसला तर ? चूक काढू नये, इतकेच नव्हे तर ती झाकावी !

सर्वच सर्वोदयी मंडळींना हा फारसी बैत माहीत नसावा. त्यांच्यांत सर्व मंडळींना सर्वांच्या चुका स्पष्ट दिसतात. सर्व माणसे सोललेल्या केळ्यासारखी सच्छील आणि कलंकरहित असावीत यासाठी ही मंडळी मग खपत राहतात. उत्तर प्रदेशातली गोष्ट आहे. बद्रीनाथ आणि केदारनाथच्या यात्रेच्या वाटेवर लांसडुनी, कोटद्वार अशा दोन-तीन खेड्यांत ताडीची दुकाने आहेत. दोन महिन्यांपूर्वीची गोष्ट आहे. एक सर्वोदयी कार्यकर्ता या बाजूला गेला. या खेड्यांपलीकडे असलेल्या गरवालच्या डोंगराळ भागांत गांधी जन्मशताब्दीचा कार्यक्रम आखण्यासाठी जात असताना त्याचे लक्ष या ताडीदुकानांकडे गेले. गिरीजन, हरिजन, स्त्रीजन, शिक्षितजन, अशिक्षितजन, गॉगलजन, बिनगॉगलजन, गांधीटोपीजन, बोडकेजन सगळी मंडळी भलतीच खुषीत आलेली होती. समोर ताडीच्या बाटल्या, शेव, खारेदाणे सर्वत्र सांडलेले, सगळा भेदाभेद विसरून मंडळी एकमेकांना टाळ्या देत होती. मिठ्या मारीत होती. गात होती. खिदळत होती. गंभीर वृत्तीचा कार्यकर्ता हे दृश्य पाहून गलबलला. किरकोळ शरीरयष्टी असून त्याला घाम फुटला.

गॉगल घातलेला, बुशकोट घातलेला माणूस सुशिक्षित तरुण आहे हे त्याच्या लक्षात आले. इंग्रजीत बोलल्याशिवाय सुशिक्षित माणसे जनसामान्यांकडे लक्ष देत

नाहीत हे त्याला अनुभवाने माहीत होते. त्या गॉगलजन तरुणाजवळ जाऊन कार्यकर्त्यानें बारीक इंग्रजीत विचारले– " व्हाट आर यू डुइंग ? अहो, काय चाललंय हे . . . ! "

गॉगलवाला फिसकन हसला आणि म्हणाला– " Drink ! for you know not whence you came nor why;

Drink ! for you know not why you go nor where ! "

कार्यकर्ता सर्दावला. या माणसाला नशा-पान करावेसे वाटते कारण आपण जन्माला का आलो, कुठून आलो, हे याला माहीत नाही. आपण या जगातून का जाणार आणि कुठे जाणार हेदेखील याला माहीत नाही. बांधवांची ही अधोगती पाहून कार्यकर्ता घळाघळा रडू लागला. गॉगलवाला वरमला. शेजारच्याच्या गळ्यांत हात टाकून म्हणाला–" यांना काय झालं ?"

कार्यकर्ता म्हणाला–" हे अश्रू फार मोलाचे आहेत. याची हेटाळणी करू नका ! तुमची स्थिती पाहून मला रडू यावं ही मी फार थोर स्थिती समजतो. अश्रू हे तीर्थ आहे. अश्रू हे . . ."

आचार्यांनी केलेल्या व्यसन मीमांसेतील पुढची वाक्ये त्याला आठवेनात, एकदम पुढचा भाग आठवला–

" A book of verse underneath the Bough<br>
A Jug of wine, a loaf of Bread<br>
and thou Besides me Singing–

खय्यामची ही सुखासीनता–नाही परवडणार दरिद्री भारताला ! बाजूला रुबायांची वही, समोर मद्याची सुरई, सखीच्या गळ्यात आपला हात आणि तिच्या गळ्यांत सुंदर गाणे हे का भारताचे गांधीजींपुढचे चित्र होते ? मी आपल्या प्लॅनिंग कमिशनला विचारतो–शरीर आणि आत्मा एकत्र राहावेत यासाठी सर्वांना तुम्ही काय देणार आहात ? ताडी ? दारू ? पूज्य विनोबाजींकडे एकदा एक कॉलेज तरुण गेला. म्हणाला–" वेळ जात नाही काय करू ?" विनोबा म्हणाले– " फाशी जा. दोन मिनिटांत वेळेचाच अंत होईल ! " गरीब बेकार असतो म्हणून पितो. श्रीमंत फुरसद असते म्हणून पितो. फाशी कुणीच जात नाही . . ."

आचार्यांच्या भाषणाची नशा पुरती चढताच कार्यकर्त्याने डोळे पुसले. तो उठला. आश्रमाच्या दिशेने चालू राहिला.

सात-आठ दिवसांनी ' कोटद्वार ' या ठिकाणी सर्वोदय मंडळींनी नशापानाविरुद्ध सत्याग्रह सुरू केला. कार्यकर्ते आणि कार्यकर्त्या ताडी दुकानासमोर हात जोडून मद्यपानभक्तांना विनवू लागल्या, " नशापान हराम है ! " दुकानाचे ठेकेदार संत्रस्त झाले. मद्यपानासाठी आलेली मंडळी ही सच्छील जत्रा दुकानापुढून कधी जाईल याचा विचार करीत आसपास रेंगाळू लागली. गांधीजींची, विनोबाजींची

वचने छापलेली भेंडोळीच्या भेंडोळी ताडी दुकानासमोर वाटण्यात येऊ लागली. यांतली बरीचशी काबुली चणे, खारेदाणे विकणाऱ्यांनी उचलून ठेवली. सात-साठ दिवसांनी ही सर्वोदयी ' कटकट ' गेली की याच पत्रकांवर चणे दाणे ठेवून मंडळी ताडी ग्लासात ओतीत म्हणणार होती, " कंबख्त तूने तो पीही नहीं ! "

हे असे किती दिवस चालायचे ? ६ लिटर ताडी खपायची ती ३ लिटर खपू लागली. परंतु यासाठी पाचपन्नास मंडळींनी दुकानापुढे बसून घसा बसेपर्यंत ओरडत राहायचे हा धंदा तसा महागातलाच होता. म्हणजे एका व्यसनी माणसाला परावृत्त करायला पंधरा निर्व्यसनी मंडळी अडकून पडायची ! कार्यकर्त्यांनी खूप खूप विचार केला. काही सुचेना. तेव्हा मग डॉ. सुशीला नायर म्हणाल्या—" आता मीच बाई उपासाला बसते ! ही ताडी दुकाने मुख्यमंत्री चंद्रभानू गुप्ताने बंद केल्याखेरीज उपास सोडणार नाही. " नोव्हेंबर १९६८ मध्ये पणजी येथील काँग्रेस अधिवेशनात ना. नाईक, स. का. पाटील या मंडळींनी दारूबंदीचा कार्यक्रम दहा वर्षे अधांतरी टांगून ठेवल्यापासून डॉ. सुशीलाबाई नायर हवालदिल होत्या. एकेकाळची भारताची ही स्वास्थ्य मंत्री अस्वस्थ होती. बाई उसळून म्हणाल्या–

" गांधी जन्मशताब्दी समितीवर आपले जे जे कार्यकर्ते असतील त्यांनी राजीनामे द्या ! ताडीची दुकाने चालवते, मद्यपानाचे ठेके देते, त्या सरकारने गांधीजींचे नाव कशाला घ्यावे ? " लोकसभेत मनुभाई पटेलांनी विचारले, " किती केंद्रीय मंत्री मद्य पितात ? " उत्तर नाही ! पुढचा प्रश्न आला– " जे मंत्री पितात त्यांना इंदिराजी मंत्रिमंडळातून हाकलतात काय ? " उत्तर नाही ! उलट कायदा आणि कल्याण मंत्री गोविंद मेनन कन्वरलाल गुप्तांना म्हणतात—" दारूबंदीच्या धोरणाचा पुर्नविचार करण्याची वेळ आली आहे ! " महाराष्ट्र सरकारने दारूचे सरकारी कारखाने काढले आहेत. महाराष्ट्र सरकारची ' रम ' व ' जीन ' यांना आम्ही ' अजंठा ' आणि ' एलोरा ' अशी नावे देणार आहोत असे सरकार निर्लज्जपणे सांगते. ताडीमाडीचे आणि दारूचे हे सांस्कृतिक पुनरुत्थान चालू आहे आणि गांधी जन्मशताब्दीचे ढोलही वाजत आहेत–

डॉ. सुशीलाबाईंचा उपास सुरू झाला. नशापानाचे दृश्य प्रथम पाहून व्यथित झालेले कार्यकर्ते तजेलदार दिसू लागले. पाच दिवस सर्वोदयी कार्यकर्ते आनंदात होते. चंद्रभानू गुप्ता डॉ. सुशीलाबाईंच्या भेटीला निघाले तेव्हा तर हर्षाला उधाण आले.

—आणि सहाव्या दिवशी प्राणांतिक उपोषण सुटले ! कार्यकर्त्याला हे सायंकाळी कळले. सकाळी अत्यानंदाने तो कोटद्वारला ताडी दुकानासमोर गेला. दुकान गच्च भरलेले होते. मंडळी पीत होती. गात होती. दुकानासमोरचा सत्याग्रह संपल्यामुळे सर्वत्र आनंदी आनंद पसरलेला होता.

कार्यकर्ता मूर्च्छित झाला. दुकानांतील गॉगलवाल्याने त्याला मूर्च्छित होताना

पाहिला.--दुकानातल्या एकदोघांना घेऊन तो झोकांड्या खात कार्यकर्त्यापाशी आला
" ये बंबईकी ' अजंठा ' पियो यार ! " खिशातली बाटली त्याने कार्यकर्त्याच्या तोंडाला लावली. ओठ थोडे हलले. चार थेंब घशाखाली गेले. कार्यकर्ता उठून बसला. भोवती जमलेल्या मद्यप्यांना म्हणाला—" बंधूंनो, हे काय करता ? चीनकडे पाहा. पापाचा व्यापार तिथे बंद झाला आहे. तिथे व्यभिचार असेल, पण वेश्याव्यवसाय नाही ! झिंग आहे पण ती मद्याची नाही–"

हे मद्यप्यांना सांगण्यात काही अर्थ आहे असे आम्हांस वाटत नाही. माओ करू शकतो ते गांधीवादी सरकार करू शकत नाही–

बखदरे वसा दर इसलाह कोशद ।
बगर इसलाह–नतवानत बेपोशद ।

मद्य तर आता प्रतिष्ठित झाले आहे. आचार्य दादा धर्माधिकारी म्हणाले–" आता मद्यप्याला समाजात प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. न पिणारा मूर्ख, पुराणमतवादी, सनातनी समजला जातो ! आज पुष्कळसे कवी, साहित्यिक, कलाकार, कॉलेजचे प्राध्यापक पितात. महाराष्ट्रात शंभरातून केवळ वीस परिवार असे सापडतील की जिथे दारूचा वापर करीत नाहीत ! विमानदलात, नौकादलात, लष्करात जावई मिळाला तर मुलीच्या वडिलांना कृतकृत्य वाटते. ते सगळे मद्यपान करतात. कारण न पिणे प्रतिष्ठित नाही."

आमच्या मते स्वतंत्र भारतात आता लोकशाहीची कास धरणाऱ्यांनी-लोकांनी चहा प्यावा की नाही, मद्य घ्यावे की नाही, लग्न करावे की नाही, बायका किती कराव्या, वगैरे गोष्टींबाबत कायद्याचा आग्रह धरणे किंवा त्यासंबंधी कसलाही आग्रह धरून गांधीवादी सरकारला पेचात आणणे चूक आहे. सर्वच्या सर्व मंडळींना याबाबतीत एकच नियम करणे कठीण आहे. कवी, साहित्यिक, कलाकार, प्राध्यापक, पत्रकार, सैनिक हे आपआपले धंदे व्यवस्थित करून समजा पीत असले तरी ' नापीतांनी ' त्यांची हजामत करण्याचे कारण काय ? सर्व समाज निर्व्यसनी असायलाच हवा का ? ही रिकामपणची नशा हवी कशाला ? विपरीत गोष्टी कायद्याने नष्ट करण्याची ताकद फक्त एखाद्या माओत असते. आपल्याला माओ नको आहे ना ? मग मंडळी आमचे ऐका–

बगर इसलाह–नतवानत बेपोशद.

## ☐ समाजवादाची पुष्पे आणि फळे !

एका गावात गावकऱ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम म्हणून वसंत व्याख्यानमाला सुरू केली. महाराष्ट्रातील एका उप-मंत्रिजनाने व्याख्यानाला यायचे कबूल केले. मंत्रिमहाशयांनी समाजवादावर तीन पुष्पे गुंफावी असे ठरले. पहिल्या दिवशी सभास्थानी

गावकरी जमा झाले. वक्ते व्यासपीठावर गेले व त्यांनी गावकऱ्यांना प्रश्न टाकला–

"मी आता काय सांगणार आहे, हे तुम्हांला ठाऊक आहे काय ?"

"नाय...बा" पाच–सहा जणांनी एकदम सांगितले.

मंत्रिमहाशयांनी रागाने सांगितले– "इतक्या अज्ञजनांपुढे पुष्प गुंफणे मला शक्य नाही !" मंत्री निघून गेले. कार्यकर्त्यांची धावपळ झाली. समजूत घालताच दुसऱ्या दिवशी मंत्रिमहाशय सभेला आले.

गावकऱ्यांना त्यांनी पुन्हा प्रश्न विचारला– "मी काय बोलणार आहे, हे तुम्हांला ठाऊक आहे काय ?"

गावकऱ्यांत काही प्रजासमाजवादी होते. त्यांनी एकदम सावधपणे सांगितले– "ठावं नाय कसं ? समाजवाद कळं नाय व्हय आम्हांस्नी !"

मंत्रिमहाशयांनी चेहरा क्रुद्ध करून सांगितले– "जर समाजवाद म्हणजे काय, हे तुम्हांला माहीत असेल तर मी पुन्हा त्यावर पुष्प गुंफण्यात काय हशील आहे ?"

मंत्री तावातावाने निघून गेले. मंत्रिमहाशयांना अज्ञ श्रोते नकोत, जाणकार श्रोते नकोत, मग त्यांना हवे तरी काय, ते गावकऱ्यांना समजेना.

तिसऱ्या दिवशी गावकऱ्यांनी गंमत केली. परजा समाजवादी उजव्या अंगाला बसले आणि बाकी अज्ञ दुसऱ्या अंगाला बसले. मंत्रिमहाशय आले. त्यांनी पुन्हा तोच प्रश्न विचारला. त्याबरोबर डाव्या अंगाचा एक गावकरी उठून म्हणाला– "आपुन काय बोलनार ते आम्हांस्नी ठावं नाय, पण ते पल्याड बसलेलं हायेत त्यांना ठावं हाय !"

मंत्रिमहाशयांनी चेहरा सस्मित केला. गावकऱ्यांना वाटले, आता भाषण होणार. मंत्री म्हणाले,

"मंडळी, मला खरोखर आनंद होतो आहे की, समाजवाद म्हणजे काय, हे ठाऊक असलेली आपलीच चार मंडळी इथे आहेत आणि ठाऊक नसलेली मंडळीही आहेत. माझी अशी विनंती आहे की, ही जी समाजवाद माहीत असलेली आपली मंडळी आहेत त्यांनी, ज्यांना तो ठाऊक नाही त्यांना तो समजावून सांगावा. आपण मला बोलण्याची तसदी दिली नाहीत, याबद्दल मी आभारी आहे !"

एवढे भाषण करून मंत्रिमहाशय निघून गेले. गावकऱ्यांनी प्रजासमाजवाद्यांच्या घोळक्याकडे पाहिले तो तिथे तुंबळ हाणामारी सुरू झालेली. खरा समाजवाद म्हणजे काय, यावर तिथे दोन गटांत बोलाचाली होऊन त्याचे हे पर्यवसान झाले होते.

शेवटी व्याख्यानमालेच्या चिटणिसांनी जाहीर केले– "वसंत व्याख्यानमालेची आपल्या गावाला जरुरी नाही. समाजवादावरची पुष्पे आपण पाहिली. इथे आता प्रत्यक्ष 'फळे'ही पाहत आहोत..." कसेबसे एवढे सभ्य भाषण करून मग हाणामारी करणाऱ्या समाजवादी गावकऱ्यांकडे वळून चिटणीस म्हणाले–

"आता गुमान घरी जावा. नाहीतर हाणू बघा एकेकाला."

आता गाव शांत आहे. **– ग्यानबा**

चंद्रशेखर मराठे

# सरकारकडून साखरधंद्याच्या अपेक्षा

१९६७–६८ च्या हंगामात साखरउत्पादनाची स्थिती अतिशय चिंताजनक होती. साखरेचे उत्पादन घटले होते व वाटपव्यवस्थाही विस्कळीत झाली होती. कारखान्यांच्या अखत्यारातील ऊस क्षेत्रात १९६५–६६ शी तुलना करता ३९ टक्के कपात झाली होती. त्या हंगामात साखरेचे उत्पादन १६ लाख टनांच्यावर जाऊ शकले नसते, म्हणून साखरेचे अंशत: विनियंत्रण करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे १९६७–६८ सालात साखरेचे उत्पादन २२ लाख टनांच्यावर जाऊ शकले. या साली साखर उत्पादन ३३ लाख टन होईल, असा अंदाज आहे.

अंशत: विनियंत्रणाचे यश असे दिसत असल्याने या दिशेने आणखी काही पावले टाकावी अशी साखरधंद्याची मागणी आहे. साखरधंद्याच्या काही अपेक्षा अशा आहेत–

१. २० वर्षांपूर्वी सरकारने मळीवर नियंत्रण आणले व मळीचा भाव क्विंटलला ६७ पैसे ठरविण्यात आला. मळीची विक्रीदेखील सरकारने रिलीज ऑर्डर दिल्यावरच करता येते. साखरधंद्यात या काळात एवढे बदल झाले, पण मळीवरचे नियंत्रण आहे तसेच कायम आहे. मळीचा नियंत्रित भावही क्विंटलला ६७ पैसेच अद्याप आहे. या किमतीतून मळी साठवण्याचा खर्चदेखील भरून निघत नाही. आंध्रप्रदेश हायकोर्टाने मळीचा हा नियंत्रित भाव व नियंत्रण बेकायदा ठरविले आहे. हा निर्णय एका खांडसरी साखरेबाबत असला तरी मोठ्या साखर कारखान्यांनाही तो तितकाच लागू पडतो.

साखरेच्या वाढत्या उत्पादनाबरोबर मळीचेही उत्पादन वाढत जाईल व मळीची सर्व औद्योगिक मागणी पुरी करणे साखरधंद्यास शक्य होईल. तेव्हा मळीचे नियंत्रण करण्यास सध्याचा काळ सर्व दृष्टींनी अनुकूल आहे.

२. नियंत्रण मंडळाच्या एका अभ्यास मंडळाने अशी सूचना केली की, सहकारी

क्षेत्रामध्ये साखर कारखाना काढण्यास परवान्याची जरुरी भासू नय अशी तरतूद करावी. ही सूचना पक्षपात करणारी व साखरधंद्याच्या हिताशी विसंगत अशी आहे. जर परवानामुक्ती ही सध्याच्या काळात आवश्यक आहे असे अभ्यासानंतर ठरले तर ही सवलत सहकारी व खाजगी अशा दोन्ही क्षेत्रांस देणे न्याय्य ठरेल.

३. १९६९–७० च्या अर्थसंकल्पात साखरेवर मूल्यानुसार २३ टक्के अबकारी कर बसविण्यात आला आहे. थोडचाफार सावरू लागलेल्या साखरधंद्यास हा धक्का जबर आहे. पूर्वी अबकारी कराचे प्रमाण ठराविक म्हणजे क्विंटलला २८ रु. ६५ पैसे असे होते. या प्रमाणानुसार सरकारला साखरधंद्याकडून वर्षाला १०० कोटी रु. कररूपाने मिळत असत. आता मूल्यानुसार कर आकारण्याच्या नव्या पद्धतीने या धंद्यावर साडेसत्तावीस कोटी रुपयांचा जादा बोजा पडेल व साखर-धंद्याच्या विकासावर त्याचा अनिष्ट परिणाम होईल.

या जादा करवाढीमुळे साखर, खांडसरी व गूळ यांवरील कराच्या प्रमाणातील तफावत आणखी वाढेल व साखरधंद्याची आर्थिक स्पर्धाक्षमता खच्ची होईल. त्यामुळे मूल्यानुसार कर आकारणीची नवी पद्धत अमलात आणण्याचा विचार रद्द करावा व पूर्वीचीच ठराविक प्रमाणाची पद्धत चालू ठेवावी.

४. अन्नधान्यास प्राधान्य देण्याच्या आवश्यकतेमुळे उसाखालील क्षेत्रात भरीव वाढ होण्याची शक्यता कमी आहे. त्याच ऊसक्षेत्रातून अधिक उत्पादन काढण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. हायब्रीड बियाण्यांच्या प्रसारामुळे शेतकऱ्यांचे लक्ष ऊस लागवडीकडून धान्यपिकाकडे वळण्याचा संभव आहे. ही प्रक्रिया फार मोठ्या प्रमाणावर होऊ नये म्हणून ऊसपिकाची उत्पादकता वाढविण्याची गरज आहे.

५. ऊसटंचाईमुळे गेल्या काही वर्षांत कित्येक साखर कारखान्यांची परिस्थिती चिंताजनक झाली आहे. अशा कारखान्यांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे. ऊसटंचाईच्या क्षेत्रातून कारखाने हलवून दुसरीकडे न्यावेत, अशी सूचना केली जाते. याबाबत कारखान्यांना सल्ला देण्यासाठी एखादे तज्ज्ञ मंडळ स्थापन करण्याची फार गरज आहे.

६. या वर्षी ९५ हजार टन साखर निर्यात करण्याची व्यवस्था झाली आहे. ही निर्यात बहुतेक ब्रिटन व अमेरिका या देशांत होईल. या वर्षी साखर उत्पादन ३३ लाख टन होईल हे लक्षात घेता आणखी २ लाख टन साखर निर्यात करण्या-संबंधी सरकारने प्रयत्न करणे जरूर आहे. जिनिव्हा येथील आंतरराष्ट्रीय साखर परिषदेत भारतीय शिष्टमंडळाच्या प्रयत्नांमुळे भारतास अडीच लाख टन साखर निर्यात करण्याचा कोटा मिळाला आहे. हा कोटा ब्रिटन व अमेरिकेस करावयाच्या साखर निर्यातीव्यतिरिक्तचा आहे. साखरेच्या आंतरराष्ट्रीय किमतीही सुधारल्या आहेत. त्यामुळे आपण निर्यात करण्याइतकी साखर निर्यात करण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. ○

२४ मे १९६९ या दिवशी राम गणेश गडकरी यांची ८४ वी जयंती साजरी होत आहे.

# प्रेम आणि मरण

श्री. के. क्षिरसागर

'प्रेम आणि मरण' या सुप्रसिद्ध कवितेच्या पहिल्या चार दोन ओळी वाचताच आपल्याला एक गोष्ट दिसून येते : ही कविता कवीनं कथेच्या–किंबहुना जुन्या कहाणीच्या–सुरात लिहिली आहे. 'कोण्या एका देशात' किंवा 'आटपाट नगर होतं' या थाटात तिची सुरुवात आहे. पहिल्या तीन-चार ओळीतच आपल्या कळतं, की ही कहाणी एका थोर वृक्षाची आहे. कवितेला मथळा द्यायलाही कवीनं संकोच केलेला नाही. 'कवितेला **विषय नसतो**' किंवा '**नसावा**' हे अलीकडचं मत या कवीला मान्य दिसत नाही ! पण कवीनं 'प्रेम आणि मरण' या विषयावर सरळ कविता लिहिली आहे, असाही याचा अर्थ नव्हे. या कवितेत बाहेरून पाहता एक कहाणी आहे. पण जसजसे आपण कवितेच्या आत शिरतो, तसतसे या कथेच्या निमित्तानं कवी आपणांला एका उदात्त आणि असाधारण अनुभवाचं स्वरूप सांगत आहे असं आढळून येतं. म्हणजे त्यानं एका वृक्षाची कल्पित कथाही सांगितली आहे, एक मानवी अनुभवही सांगितला आहे, अन् त्या अनुभवाच्या आवेशात एक तत्त्वही सांगितलं आहे.

आपणांला पहिल्याच कडव्यात असं दिसू लागतं, की ही कथा वृक्षाची नसून प्रेमा'ची आहे; अन तीही ज्या प्रेमाला तडजोड किंवा भय माहीत नाही, अशा

ध्येयवादी प्रेमाची ही कथा आहे. कवीनं त्या ध्येयवादी प्रेमिकाचं गौरवपूर्ण चित्र काढताना सामान्य तडजोडी वृत्तीच्या जगाचं चित्रही तुच्छतेनं काढलं आहे.

**चहुकडेच त्याच्या भवते ।**
**गुडघाभर सारे जग ते । तेथले ।।**
**झुडपेच खुरट इवलाली ।**
**मातीत पसरल्या वेली ।। चहुकडे ।।**

यातल्या 'गुडघाभर' आणि 'खुरट' या शब्दांत पुरेपुर तुच्छता भरलेली दिसेल. आणखी एक गोष्ट : कवीला केवळ ध्येयवादी प्रेमाच्या निग्रहीपणाचंच वर्णन करायचं नाही, तर प्रेमातल्या दैवबलाचं किंवा 'fatality'चंही वर्णन करायचं आहे. त्या उत्तुंग वृक्षाकरिता कितीक वेली अहोरात्र तळमळत होत्या. पण 'प्रारब्ध लिखित' म्हणून काही वेगळंच असतं !

**कोणत्या मुहुर्तावरती ।**
**मेघात बीज लखलखती । नाचली ।।**
**त्या क्षणी । त्याचिया मनी । तरंगति झणी ।**
**गोड तरी जहरी । प्रीतीच्या नवथर लहरी ।।**
**न कळता ।।**

तीन मोठ्या ओळी अन् पाच छोट्या, अशा आठ ओळींच्या या अर्ध्या कडव्यात, कवीनं प्रेमानुभवाची अनेक 'अनोखी' 'Romantic' लक्षणं सांगितली आहेत. प्रेमबाधेचा एक पूर्वनियोजित क्षणच जणू ठरलेला असतो. प्रेम कधीकधी सर्वस्वी प्राणघातक अशा वस्तूवरही बसतं. त्यालाच इंग्रजीत fatal fascination असं म्हणतात. प्रेम केव्हा बसलं, हेही त्या बिचाऱ्या प्रेमिकाला कळत नाही. फक्त त्या गूढ बाधेची लक्षणं मात्र जाणवतात. मनात कसल्या तरी अगदी अननुभूत, मधुर, पण जहरी अशा उकळ्या उसळू लागतात !

त्या नंतरचं वर्णन हे अर्थात प्रेमवेडाच्या अवस्थेचं वर्णन असलं, तरी आपण 'माणसा'ची अवस्था सांगत नसून प्रेमवेड्या 'वृक्षा'ची अवस्था सांगत आहो, हे कवी विसरलेला नाही. म्हणजे स्वतःच कल्पनेत पाहिलेल्या प्रसंगाशी त्याची एकतानता आहे. 'जातिधर्म त्याचा सुटला' या ओळीत कवीनं प्रेमवेडाच्या स्थितीचं वर्णन केवळ दोन शब्दांत केलं आहे. प्रेमवेडाच्या अवस्थेत मनुष्याचा जातिधर्मच सुटतो म्हणजे खाणं पिणं, आत्मरक्षण या Biological functions कडेच मुळी त्याचं दुर्लक्ष होतं. पण वृक्ष जर प्रेमानं वेडा झाला, तर त्याचा 'जातिधर्म सुटेल' म्हणजे काय होईल, त्याचं वर्णन गडकऱ्यांनी अद्भुत, पण स्वाभाविक वाटण्यासारखं केलं आहे. पण पावसानं त्याला टवटवी येईना, वाऱ्यानं त्याचं पान हलेना, कळ्या आल्या तरी त्या फुलेनात ! थोडक्यात म्हणजे 'चाफा हालेना, चाफा बोलेना !'

ध्येयवादाच्या उदात्तचरिताला विरोधी भूमी म्हणून एकाआड एका कडव्यात

भिकार पोटभरु दुनियेचं वर्णन कवीनं कधी तुच्छतेनं, तर कधी उपहासानं केलं आहे. ते वृक्षापेक्षा मानवाच्या संदर्भातच झटकन डोळ्यांपुढं येणारं आहे. अशा हट्टवादी प्रेमिकाची कुणी कीव करतात, तर कुणी त्याला हसतात. इतकंच नव्हे, कित्येक लोक भीतीमुळे त्याचं तोंडच चुकवू लागतात ! आत्यन्तिक ध्येयाकरिता वाटेल ते हाल सोसणाऱ्या माणसाला सामान्य प्रापंचिक लोक का टाळतात ? तो त्यांना ' अवजड गोणी ' का होतो, हा एक गमतीचा विषय आहे. एक उदात्त जीवन म्हणजे बाकीच्या यच्चयावत् पोटभरू दुनियेचा चालता बोलता निषेधच होय ! म्हणून भोवतालची ती क्षुद्र ' दीडवितीची दुनिया ' अशा उत्तुंग आणि आत्यन्तिक वृक्षराजाचा द्वेष करणं स्वाभाविकच आहे.

केवळ जगच त्याला टाळतं असं नव्हे तर तोही जगाला आणि स्वतःला एक प्रकारे टाळीत असतो. त्याचं जीवन, त्याच्या ध्येयप्राप्तीच्या अभावी खोटं आणि वरवरचं होऊन बसतं. रडायचं असून तो हसत असतो, जगायचं नसून तो जगत असतो. या सहाव्या कडव्यात गडकऱ्यांनी आपल्या नेहमीच्या विरोधाभासांची आणि शाब्दिक कसरतीचीही चुणूक दाखविली आहे. ' टोकाविण चालू मरणे ' व ' देवातून दगडच बाकी राहतो ' या दोन ओळींत ही चुणूक दिसते पण अगदी साध्या शब्दांत मोठा आशय भरण्याची शक्तीही या कडव्यात दिसते. ' पटत ना जगी जगपणा । त्याचिया मना ' या अगदी बाळबोध कर्णमधुर ओळीत, त्यांनी अर्थाचं केवढं विश्व भरलं आहे, ते पाहण्यासारखं आहे. अशा दुःखी प्रेमिकाला जगणं म्हणजे एक मरण वाटतं, एवढंच नव्हे, तर ' जग ' म्हणजेही एक वैराण वाटतं !

' प्रेम आणि मरण ' ही कविता म्हणजे एक रूपककथा आहे, अन् तिला पुराण-सदृश कथा बनविण्याचाही गडकऱ्यांचा प्रयत्न आहे हे मी सांगितलंच. मागे पाचव्या कडव्यातच **स्वर्गस्थ देव मनि हसती । त्या प्रती ।** असं कवीनं म्हणून ठेवलं आहे. आता या सातव्या कडव्यात कवीनं उघडपणेच पौराणिक मालमसाला घातला आहे. कुणीतरी अघोर तप करायचं, अन् मग इंद्राला ' तो आपलं पद घेतो की काय ' अशी भीती पडायची, हा आपल्या शेकडो पुराणकथांचा ठरीव सांगाडा असतो. इथेतर ' ध्रुवबाळा मत्सर वाटे । पाहुनी । ' असं म्हणून गडकऱ्यांनी पुराण-कथांवरही कडी केली आहे. शेवटी ' तपोदेवता ' प्रसन्न होऊन ' वर काय हवा ते बोल ' असं म्हणते, हाही पुराणातला ठराविक रिवाजच आहे. भावगीतांची रूपककथा (Allegory) होणं, अन् ' रूपककथे'ची ' पुराणकथा ' किंवा ' Myth ' होणं, हा काय प्रकार आहे ? कवितेत ' Compression ' ला किंवा ' अल्पाक्षर वैखरी'ला महत्त्व आहे, असं आजचा एक काव्यसंप्रदाय म्हणतो; कवितेला विषय नसतो, असही तोच संप्रदाय म्हणतो. इथं तर पुराणकथेचं पाल्हाळ आहे; उघड विषय आहे, बाह्य कथानक आहे, तात्त्विक तात्पर्य आहे ! ही

कोणत्या जातीची कविता म्हणायची ? इंग्लिश कवी शेले हाही Lyrical किंवा भावगीतप्रधान कवी म्हणूनच प्रसिद्ध आहे. पण एका प्रसिद्ध इंग्रज टीकाकारानं Myth making हा शेलेचा परमोच्च गुण म्हणून सांगितला आहे. आपले उत्कट अनुभव सांगता सांगता, भावकवी एकदम सार्वकालीन अनुभवाची कथा बोलून जातो; तेव्हा तो Myth making च्या म्हणजेच द्रष्टया ऋषींच्या पातळीवर जातो, असा त्या टीकाकारांचा मतलब असावा. निदान गडकरी तरी या रूपककवितेत सार्वत्रिक अनुभव सहज रूपकानं सांगणाऱ्या ऋषींच्या पायरीवर गेले आहेत खास !

सातव्या कडव्यापासून दहाव्या कडव्यापर्यंत सर्व परिचित पुराणकथेची भाषा आहे. फक्त **" स्पर्शासह मरणही आणी । ती तुझ्या जिवाची राणी ।।"** या दोन ओळींत वृक्षाचा प्रेमविषय झालेल्या विद्युल्लतेचं सूचक वर्णन आहे. विद्युल्लतेलाच केवळ नव्हे, तर मानवी प्रेयसींनाही पुष्कळदा हे वर्णन लागू पडत असल्यानं या ओळी चांगल्याच जहरी झाल्या आहेत. कठोर तप करून असली 'शुद्ध राक्षसी' मिळवणाऱ्या प्रेमिकाची तेहतीस कोटी देवांनी कीव केल्यावर तो वृक्षयोनीतील प्रेमिक त्रासानं आणि उपहासानं हसून जे उद्गार काढतो, ते म्हणजेच ध्येयवादी प्रेमिकांचं तत्त्वज्ञान होय.

"जीवाच्या राणीच्या स्पर्शानं तात्काळ मरण येईल याची भीती कुणाला ? केवळ जगणं हेच ज्याचं ध्येय असेल, त्याला ! प्रेमशून्य दीर्घायुष्य खंडाळ्याच्या घाटातील खडकांनाही मिळतं ! प्रेमाचा एकच क्षण, हा मी निष्प्रेम खडकांच्या दीर्घायुष्यापेक्षा मोलाचा समजतो !"

अखेर निरुपायानं देवांनी आकाशाची वीज त्या वृक्षाच्या इच्छेप्रमाणं धाडली. तिच्या आवेगाचं, कवीनं अगदी साध्या शब्दात जे अपूर्व चित्र काढलं आहे, त्याला आधुनिक वाङ्मयात तोड नाही !

**मग त्याला भेटायाला ।**
**गगनातील चंचल बाला ।। धाडिली ।।**
**धावली उताविळ होत ।**
**प्रीतीची जळती ज्योत ।। त्याकडे ।।**
**कडकडे । त्यावरी पडे । स्पर्श जो घडे ।**
**वृक्ष उन्मळला । दुभंगून खाली पडला ।।**
**त्या क्षणी ।।**

क्वचित् लावण्यांत आणि पोवाड्यांतच, इतक्या अस्सल मराठीत एवढं अद्भुत चित्र काढलेलं असेल. एरव्ही या मराठी शैलीला अन्यत्र तोड नाही !

पुढच्या–म्हणजे शेवटच्या कडव्यात–कवीनं वृक्षाच्या तपस्येबरोबरच रूपक काव्याच्या 'सिमेट्री'ची अथवा समप्रमाणतेचीही पूर्तता केली आहे. जो हसत

( पान ६१ वर)

# जॉर्ज केट । । । । । । ।

**वसु भगत**

जहांगीर आर्ट गॅलरीतील एक प्रदर्शन कक्ष.

ज्या कक्षाच्या प्रवेशद्वाराजवळच एक व्यक्ती उभी आहे. चौकडचाची लुंगी, अंगात कफनीवजा ढगळ शर्ट-गेरूच्या रंगाचा साधू संन्यासी घालतात तसला. मानेवर रुळणारे केस. निश्चल, गहिरी नजर...

या व्यक्तीचे नाव जॉर्ज केट.

प्रदर्शन कक्षात भितीवर एकोणीस चित्रे मांडलेली आहेत.

ही चित्रे जॉर्ज केट यांची आहेत.

वीस मेपासून जॉर्ज केट यांच्या चित्रांचे प्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरीत भरले आहे.

बारा मे रोजी ही चित्रे ' प्रि- व्ह्यु'साठी मांडली होती.

बारा तारखेला मी जहांगीर आर्ट गॅलरीच्या प्रदर्शन कक्षात शिरलो. आणि माझे लक्ष सर्वांत आधी साधुसं न्याश्यासारख्या दिसणाऱ्या जॉर्ज केटनी वेधून घेतले.

या चित्रकाराचे दर्शनी व्यक्तिमत्त्व कसे शांत आणि प्रसन्न आहे. त्याच्या चित्रांसारखेच.

प्रसन्नता आणि शांतता, उत्कटता आणि तृप्ती ही जॉर्ज केटच्या चित्रांची सर्वांत आधी जाणवणारी आणि मनात दीर्घकाळ रेंगाळत राहणारी वैशिष्टचे आहेत.

अडुसष्ट वर्षांचा हा तरुण चित्रकार मूळचा कॅंडीचा. म्हणजे सिलोन देशातला.

तिथल्या ट्रिनिटी कॉलेजात कलेचा प्राथमिक अभ्यास केल्या-नंतर त्याच्यावर रवीन्द्रनाथ टागोरांचा प्रभाव पडला आणि

त्याने हिंदू आणि बौद्ध धर्मांचा अभ्यास करायला सुरुवात केली.
जॉर्ज केटच्या चित्रकलेवर प्राचीन भारतीय चित्रकलेचा जो विलक्षण परिणाम झालेला प्रत्ययास येतो, त्याचे कारण हेच आहे.
या चित्रकाराचे जसे रेषांवर प्रभुत्व आहे तसेच शब्दांवरही आहे.
त्यांच्या कवितांचा संग्रह १९३६ साली प्रकाशित झाला आहे.
जॉर्ज केटचे भारतात भरलेले हे तिसरे प्रदर्शन.
प्रथम ते १९४६ साली मुंबईला आले होते.
त्यांच्या चित्रांचे दुसरे प्रदर्शन १९५३ साली दिल्लीत 'आयफेक्स'च्या प्रदर्शन कक्षात भरले होते.
आणि त्यांची ही दोन्ही प्रदर्शने त्या वेळी फारच गाजली होती.
आज ते जागतिक कीर्तीचे चित्रकार आहेत. त्यांची चित्रे जगातील अनेक म्युझियम्स आणि खाजगी चित्रसंग्रहांतून विखुरली आहेत.
त्यांच्या या प्रदर्शनातील चित्रांवरून आवी जाणवते.ती एक गोष्ट.
ती म्हणजे प्रत्येक चित्रातून आनंदाचा, सुखाचा, तृप्तीचाच आविष्कार आहे.
ऐहिक जीवनाविषयी अपरंपार श्रद्धा आणि शारीरिक सुखाविषयी उत्कट आदर असल्यावाचून हे शक्य नाही.
शारीरिक सुखाची ओढ आणि त्यातून जन्माला येणारा आनंद यांचा प्रत्येक चित्रातून उत्कट आविष्कार त्यांनी केलेला इथे प्रत्ययाला येतो.
वासना ही सुंदर आहे. फक्त तिचे सौंदर्य शोधायला माणसाजवळ सौंदर्यशोधकाची निरागस नजर असायला हवी.
जॉर्ज केटजवळ ती नजर आहे. वृत्तीचा तो निरागसपणा आहे.
म्हणून तर प्रत्यक्ष स्त्री-पुरुष मीलनाविषयींच्या चित्रांनाही चैतन्य लाभले आहे.
स्त्री-पुरुषांच्या मीलनाचा प्रत्यक्ष आविष्कार करणारी दोन-तीनच चित्रे या-प्रदर्शनात आहेत
पण, वासनेच्या रूपांचा, वासनेच्या गतीचा वासनेच्या उत्कट उन्मादाचा आविष्कार प्रत्येक चित्रातून प्रत्ययास येतो.
या चित्रांतून वावरणाऱ्या एकाही आकृतीने वस्त्रांचे अवगुंठन घेतलेले नाही.
त्या साऱ्या नैसर्गिक अवस्थेत आहेत.
त्यांच्या देहाच्या कमनीय आकारांतून, वेगवेगळया पोझेसमधून वासनेची नैसर्गिक आणि सुंदर रूपे व्यक्त होत राहतात.
जॉर्ज केटच्या शैलीत कुठलीही गुंतागुंत नाही. अबोधता नाही. गूढता नाही.
जणू त्यांना जीवन सापडले आहे. त्याचा अर्थ आणि त्याचे मर्म त्यांना उलगडले आ हे
जणू जीवनात कुठे गुंतागुंत नाहीच. सारे कसे सरळ साधे आहे.
आनंदाखेरीज जीवन नाहीच. किंबहुना, जीवन म्हणजेच आनंद. जीवन म्हणजेच

सुख. जीवन म्हणजेच तृप्ती.
हा आनंद, हे सुख, ही तृप्ती वासनेतून उद्‌भूत होत असतात.
जॉर्ज केटनी आपल्या चित्रांतून हेच प्रमेय मांडले आहे.
त्यांचे क्रमांक तीनचे चित्र 'ललित रागिणी' हे या प्रमेयाचे उत्तम उदाहरण आहे. प्रियतमा झोपली आहे. तिच्यामागे जवळच तिचा प्रियकर वसलेला आहे. त्याच्या हाती तारा जुळलेला तानपुरा आहे.
प्रियतमेची मुद्रा तृप्त आहे. ती तृप्त स्वप्नांत गुरफटून गेली आहे. तिचे निरागस भाव, ओठांवर फुललेले अस्फुट जाणवेल न जाणवेल असे स्मित, आणि याला पूरक असे प्रियकराच्या मुद्रेवरचे भाव यांतून सारे चित्र आकारत जाते.
स्त्री-पुरुषांच्या प्रत्यक्ष मीलनाच्या चित्रांतही असाच निरागस आणि उत्कट आनंद ओसंडून वाहतो. तिथे खोटा विनय नाही. संकोच नाही. लज्जा नाही. कदाचित म्हणूनच त्यातली उत्कट ओढ गहिरी झाली असावी.
जॉर्ज केटना हे साधले; कारण त्यांच्यातील कलावंताचा पिंड परंपरेवर पोसला गेला आहे. परंपरेतून उद्‌भूत होणाऱ्या संस्कारांशी त्यांच्या सजग कलात्मक व्यक्तिमत्त्वाचा सुसंवाद साधला गेला आहे.
परंपरेत जे घटक मृत किंवा निष्क्रिय झाले होते ते त्यांनी कटाक्षाने टाळले आणि चैतन्यपूर्ण व आवश्यक गोष्टी तेवढ्या आत्मसात केल्या. त्यांच्यावर आपल्या कल्पकतेचे संस्कार केले.
म्हणून तर त्यांच्या कलाकृतीत व्यक्तिगत अथवा सामुहिक अहंकार किंवा अभिनिवेश आढळून येत नाही. या अहंकाराच्या पोटी जन्माला येणारे वैफल्य जाणवत नाही. असे वैफल्य किंवा आधुनिक चित्रकारांत प्रकर्षाने असणारी एकाकीपणाची भावना यांचा त्यांच्या चित्रांना स्पर्शही झालेला नाही.
त्यांचे चित्रविश्व काव्याचे आहे. संगीताचे आहे. नृत्याचे आहे. त्यांच्या प्रतिमांचे जग समृद्ध आहे.
याचा अर्थ जॉर्ज केट हे परंपरागत पद्धतीचे किंवा जुने चित्रकार आहेत असे नाही. उलट, ते नवकलेच्या अत्यंत जवळ आहेत. मुक्त स्वातंत्र्याचा नवकलेत प्रत्ययाला येणारा आविष्कार त्यांच्याही कलेत आहे. पण, विचारांची, प्रतीमांची किंवा अभिव्यक्तीच्या पद्धतीची त्या आविष्कारात कुठेही गुंतागुंत झालेली नाही. कुठेही गूढता आलेली नाही. अबोधता किंवा दुर्बोधता आलेली नाही.
त्यामुळे कलेच्या परंपरागत पद्धतीला त्यांच्या आविष्कारात अधिक अर्थसघनता आणि सखोलता प्राप्त झाली आहे.
जीवनाचे वासनात्मक अस्तित्व, वासनांची देहस्विता या वस्तुसत्याचा त्यांनी निर्लेप मनाने स्वीकार केल्यामुळे, त्यांच्या चित्रांना विलक्षण वस्तुनिष्ठा आणि सुंदर गहिरेपणा लाभू शकला आहे.

आजच्या गोंधळलेल्या, विस्कळलेल्या, अस्थिर झालेल्या आयुष्यात आनंदाचा, सुखाचा, तृप्तीचा आविष्कार खपुष्पासारखाच दुर्लभ झाला आहे.
जॉर्ज केटसारख्या एखाद्याच कलवंताला ते साधते.
क्वचित्च त्यांच्यासारख्या अपवादात्मक कलावंताच्या हाती हे खपुष्प लाभले. ◻

# चतुरंग

एखादी गोष्ट आपण पाहायला जातो तेव्हा आपल्या मनात काही अपेक्षा असतात. या गोष्टीच्या दर्शनातून आपल्याला अमुक प्रकारचा अनुभव येईल...निदान यावा...असे वाटत असते.
अशी ही अपेक्षा का निर्माण होते ?
त्याला अनेक कारणे असतात. काही व्यावहारिक, काही अव्यावहारिक. काही बाह्य, काही आंतर.
अशी अपेक्षा बाळगणे हे तत्त्वदृष्टया चूक आहे, असे नेहमी म्हटले जाते. विशेषतः, कलेच्या बाबतीत.
पण, प्रत्यक्षात कोणताही कलाविष्कार पाहताना निरपेक्ष आणि निर्विकार असणे शक्यच होत नाही.
' चतुरंग 'ने सादर केलेले नाटक पाहायला जातानाही मनात अशीच अपेक्षा होती. वाटत होते, आज आपल्याला काहीतरी नवीन, काहीतरी चांगले, काहीतरी कलात्मक आणि प्रायोगिक असे पाहायला मिळेल.
कारण, ' चतुरंग ' ही बंगाली रंगभूमी गाजवणारी हौशी आणि प्रायोगिक नाटय-संस्था असल्याचे जाणत्यांच्या तोंडून अनेक वेळा ऐकले होते. वृत्तपत्रांतून वाचले होते. आधीच बंगाली रंगभूमी ही अत्यंत प्रगत आणि प्रयोगशील मानली जाते. मराठी रंगभूमीवर आज जे काही घडते आहे ते बंगाली रंगभूमीवर कधीच घडून गेले आहे, असे पुन्हा पुन्हा सांगितले जाते. तंत्र आणि आशय या बाबतींत बंगाली रंगभूमीने विलक्षण क्रांती केली असल्याचे वारंवार लिहिले जाते. कधी तरी ' अंगार '-सारखे मन थक्क करून टाकणारे नाटक पाहण्यात आलेले असते. ' सेतू 'सारखे तांत्रिक करामतींनी नटलेले नाटक पाहायला मिळालेले असते. त्यांनी बंगाली रंगभूमीविषयीचे एक विलक्षण आदरणीय असे चित्र निर्माण करून ठेवलेले असते.
या साऱ्यांच्या जोडीला ' चतुरंग ' ही हौशी नटांची प्रायोगिक नाटयसंस्था असल्याची माहिती मिळते. तिच्या जन्मापासून म्हणजे १९५६ सालापासून तिच्या

कर्तृत्वाचा दबदबा बंगाली रंगभूमीवर पसरला असल्याचे कळते. श्री. तापस सेन-सारखी माणसे या संस्थेच्या पाठीशी उभी असतात. लहानमोठ्या एकोणीस नाटकांचा अनुभव तिच्या गाठी असतो. ही नाटकेही बंगालमध्ये गाजलेली असतात. निर्मितीविषयीची अनेक पारितोषिके त्यांनी पटकाविलेली असतात. बंगाली प्रेक्षक व वृत्तपत्रांनी त्यावर आपल्या पसंतीचे शिक्कामोर्तब केलेले असते.

हे सारे सारे माहीत झाल्यामुळे ' बिर्ला मातोश्री सभागारा 'कडे जाताना मनात खूप अपेक्षा होत्या.

वाटत होते, आजचे नाटक हा एक अनुभव ठरेल. वर्षानुवर्षे नसले तरी बराच काळ लक्षात राहण्यासारखे काही पाहायला मिळेल.

पण, प्रत्यक्षात हाती लागले ते नगण्य होते !

डोळे दिपवून टाकण्याची किंवा चित्त थरारून सोडण्याची गोष्ट तर दूरच राहिली; पण, साधे तीन तास बरे गेले असे म्हणण्याचीही सोय उरली नाही.

विनोदी नाटकात जीव कंटाळून प्रेक्षागृहात विरंगुळा शोधावा, याहून विनोदी नाटकाची आणखी दुसरी शोकांतिका कोणती असू शकणार ?

' चतुरंग 'ने मराठी आणि बंगाली नाटकांच्या महोत्सवात शेवटच्या दिवशी सादर केलेल्या ' बाबू ' या नाटकाची ही शोकपूर्ण कहाणी आहे.

गेल्या शतकात गोऱ्या साहेबाने या देशात आपली सत्ता स्थापन केल्यानंतर, आपले स्वत्व विसरून साहेबाच्या आचाराचे अंध अनुकरण करण्यात जीवनाचे साफल्य मानणारी भली थोरली अशी एक नवी जमातच या देशात जन्माला आली. या जमातीची मने इतकी गुलाम होऊन गेली होती की, साहेबासारखा पोशाख करणे, साहेबाच्या भाषेत संभाषण करणे, घरी साहेब ठेवत तसा बटलर ठेवणे आणि आपल्या पतीबरोबर फिरायला जाणे यातच त्यांना कृतकृत्यता वाटत होती. पण, त्यांच्या तोंडी भाषा असायची ती मात्र देशभक्तीची. देशाच्या पायातील दास्य-शृंखला तोडण्याची. हा मोठा चमत्कारिक विरोध होता. सकृत्‌दर्शनी तरी तसे वाटत होते. पण, मुळात ही देशभक्तीची भाषाच खोटी होती. देशभक्तीच्या नावा-वर आपला स्वार्थ साधून घेणे, एवढाच त्यांचा हेतू होता.

' बाबू ' हे नाटक अशा तथाकथित बुद्धिवादी आणि आदर्शवादाचे, ध्येयवादाचे अवगुंठन घेतलेल्या ' बाबू 'चे चित्र समोर ठेवते. त्यांचे ढोंग, त्यांचा खोटा बुद्धि-वाद आणि ध्येयवाद, स्वतःची जाणीव नष्ट होऊन ब्रिटिशांचे गुलाम झालेले मन आणि त्यामुळे, ब्रिटिश सत्ताधिशांविषयी वाटणारे भय यांचे चित्र या नाटकात आहे. या नाटकाचे लेखक आहेत श्री. अमृतलाल बसू. श्री. अमृतलाल बसू हे बंगालचे सुप्रसिद्ध लेखक आहेत. श्री. तापस सेन यांच्यासारख्या सर्जनशील तंत्रज्ञाला ज्यांचा ' ग्रेट रायटर ' म्हणून आवर्जून उल्लेख करावासा वाटावा, असे ! पण, असा उल्लेख करताना श्री. तापस सेन काही खरे बोलले नसावेत. त्यांनी केवळ



वरूण दासगुप्ता

औपचारिक शिष्टाचार पाळला असावा असे मला वाटते.

श्री. अमृतलाल बसूंचे ' बाबू ' हे नाटक तरी त्यांच्या महानतेचे किंवा महान वाङमयीन कर्तृत्वाचे दर्शन घडवीत नाही.

या नाटकाला कथा अशी काहीच नाही.

नाटक सुरू होते तेव्हा होते काय की, सास्थी कृष्ण नावाचा एक आंग्लाळलेला, माणूस आपल्या मेव्हण्याकडे यतो. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी चंदा गोळा करणे हा त्याचा व्यवसाय आहे. सास्थी कृष्णाचा मेव्हणा फटिकचंद त्याची, त्याच्या आंग्लाळल्यापणाबाबत चेष्टा करतो. सास्थी कृष्ण जातो. मग, रंगमंचावरचे दिवे मालवले जातात.

दुसऱ्या प्रवेशात सजनीकांत नावाच्या अशाच एका भोंदू बुद्धिवाद्याची भेट होते. सजनीकांताचे काही तथाकथित बुद्धिवादी स्नेहीही या प्रवेशात प्रेक्षकांना भेटतात. सास्थी कृष्ण ज्या विशिष्ट मनोवृत्तीचे प्रतिनिधित्व करतो त्याच मनोवृत्तीच्या जमातीतली हीही मंडळी आहेत.

इथे पहिला अंक संपतो.

दुसऱ्या अंकात पुन्हा सास्थी कृष्ण भेटतो. आपल्या बायकोशी इंग्रजी पद्धतीने प्रणय करताना, पुढच्या प्रवेशात कंदर्प आणि म्हातारी आजी भेटते. हा अविवाहित कंदर्पही सास्थी कृष्णाच्याच जमातीतला. त्याच्या घरी निरर्थक अंगविक्षेप करणारा आगाऊ आणि मूर्ख बटलर आहे. हिंदी चित्रपटात राजेंद्रनाथ नावाचा विषदूक ज्या पद्धतीने वागतो त्याच पद्धतीने हा बटलरही रंगभूमीवर वावरत असतो.

त्यानंतरच्या प्रवेशात ही सारी आंग्लाळलेली मंडळी एका मैदानात किंवा उद्यानात फिरायला जातात. ती सहकुटुंब तेथे आलेली आहेत. मग सारे आपल्या आपल्या बायकांचे हात हातात घेऊन इंग्रजी पद्धतीने आपण प्रणय करीत आहोत अशा समजात मश्गुल होतात. तेवढ्यात एक दारू पिऊन तर्र झालेला इंग्रज साहेब तिथे येतो. आणि सास्थी कृष्णाच्या बायकोच्या मागे लागतो. ही बुद्धिवादी मंडळी त्या साहेबाच्या निषेधार्थ एक जाहीर सभा घेऊन निषेधाचा ठराव करायचे ठरवतात. अध्यक्ष, उपाध्यक्ष, वक्ते यांची निवड होते. सास्थी कृष्णाची बायको विचारी त्या साहेबाच्या हातून कुणी तरी सोडवावे म्हणून अगतिक विनवण्या करीतच असते. पण, साहेबाची बखोटी धरायची कुणातही हिम्मत नसते. अखेर, तो साहेब आपले खरे रूप प्रकट करतो. साहेब म्हणजे दुसरा तिसरा कुणीही नसून फटिकचंद असतो. अशा रीतीने या बुद्धिवादी मंडळींचे ढोंग व्यक्त होते.

अर्थातच इथे नाटकही संपते.

हे नाटक पाहून माझ्या मनात असा प्रश्न उभा झाला की, श्री. अमृतलाल बसूंनी किंवा ' चतुरंग 'च्या कलावंतांनी हा सारा प्रपंच कशासाठी केला ? यात कलात्मक आणि प्रायोगिक काय होते ?

यातील ' प्रयोग ' शोधायचा झालाच तर तो लेखनात सापडेल. कक्षा नसलेले नाटक एवढेच काय ते या नाटकाचे वैशिष्टच सांगता येईल. बाकी, नाटकाची निर्मिती, नेपथ्य आणि प्रकाशयोजना, अभिनयाची पद्धती. . .कुठल्या कुठल्याही गोष्टींत काही नाविन्य नव्हते. सारे परंपरागत पद्धतीचे होते. त्यातही कलावंतांचा—म्हणजे काही कलावंतांचा—अभिनय वगळला तर सुखद असे काहीच नव्हते.

या पाहुणे मंडळींच्या अभिनयाविषयी जाणवलेली आणखी एक गोष्ट म्हणजे त्या अभिनयाला झालेला मेलोड्रामाचा स्पर्श. किंबहुना साराच प्रकार अतिशय भडक आणि मेलोड्रामॅटिक होता. लेखनात असलेला मेलोड्रामा उघडच होता. ' डाऊन ट्रेन ' काय किंवा ' आवर्त ' काय,. . .ही नाटके इतकी भडक आणि आक्रस्ताळी आहेत की सांगता सोय नाही. हिंदी चित्रपटांचा भडकपणा त्यांनी जसाच्या तसा उचललेला आहे. नाटकांचे विषयही असेच चावून चावून चोथा झालेले. ' डाऊन ट्रेन 'मधला परिस्थितीने गुन्हा करायला लावलेला सज्जन माणूस आणि ' आवर्त '-मधील स्वार्थी, अन्यायी शोषक जमीनदार नाटकासिनेमांतून पिढ्यान् पिढ्यांपासून याच पद्धतीने रंगवले गेलेले आहेत.

श्री. वरुण दासगुप्ता यांनी ही सारी नाटके दिग्दर्शित केली होती. श्री. वरुण दासगुप्ता हे स्वत: उत्तम नट आहेत. 'बाबू'मधील सजनीकांताची त्यांनी केलेली भूमिका त्यांच्या अभिनयकौशल्याचे उदाहरण आहे. दिग्दर्शक म्हणूनही त्यांनी आपले काम चोख बजावले आहे. विशेषत:, प्रत्येक पात्राला त्यांनी दिलेल्या वेगवेगळ्या लकबी आणि संवाद म्हणण्याची पद्धती त्यांच्या दिग्दर्शनकौशल्याचा विलोभनीय विशेष आहे.

ही 'सटायर' विनोदी पद्धतीने 'चतुरंग'ने सादर केली. पण, त्या विनोदाचे स्वरूप अगदीच फिल्मी होते. जोडे पॉलिश करायच्या ब्रशने कोट साफ करण्यासारखे प्रसंग विनोदनिर्मितीसाठी वापरले आहेत.

एकूण काय की, बंगाली रंगभूमीविषयी माझ्या मनात जो दबदबा निर्माण झाला होता, तो या नाटकाने बऱ्याच प्रमाणात कमी केला.


अर्थात, 'चतुरंग'ने मुंबईत सादर केलेली 'डाऊन ट्रेन', 'आवर्त' आणि 'बाबू' ही तीन नाटके सर्व बंगाली रंगभूमीचे प्रतिनिधित्व करतात, असे मला म्हणावयाचे नाही.

एरवी, श्री. पु. ल. देशपांडे यांनी या मराठी-बंगाली नाटकांच्या महोत्सवात सादर केलेल्या 'वाऱ्यावरची वरात' या रिव्ह्यूने मराठी रंगभूमीचे प्रतिनिधित्व केले, असेही म्हणावे लागेल.

मला तर वाटते स्वत: तेंडूलकरांची नाटके प्रायोगिक मराठी रंगभूमीचे अधिक योग्य रीतीने प्रतिनिधित्व करू शकली असती.

असो. हे असे चालायचेच! आपण काहीही म्हटले तरी ते बदलणार थोडेच आहे!

○



# सुकेलं मन

सौ. मंदाकिनी चिपळूणकर

लवकरच पहाट संपेल, उजाडेल, आणि नवीन दिवसाला सुरुवात होईल. नवीन दिवस. हो, आज आमच्या लग्नाला बारा वर्षे पूर्ण होतील !

टेबलावरचे घड्याळ पाच वाजल्याचे दाखवीत होते. इतक्या लवकर का बरे मी जागी झाले आज ? हे तर सात वाजल्याशिवाय घरी येत नाहीत, मग मला आज लवकर जाग का बरे आली ? कदाचित आजच्या दिवसाचे महत्त्व माझ्या मनात घोळत असेल म्हणून असेल !

यांची नोकरीच अशी होती चोवीस तासांची—आज सकाळी गेले की उद्या सकाळी परतायचे—मग चोवीस तास घरी—परत चोवीस घंटे काम—परत सुटी. अशा या चक्रात आम्ही आज बारा वर्षे सतत फिरत राहिलो आहोत. आजच्या लग्नदिवसाच्या दिवशी हे घरी आहेत, हे विशेषच म्हणायला पाहिजे. आम्ही सुखात आहोत. आमचा संसार मजेत चालला आहे, असे मी माझ्या मनाशी सतत म्हणत असले, तरीही माझ्या मनात हळूच एक पाखरू कुजबजते, नाही ! नाही ! मी सुखी नाही. आजचा हा बारावा लग्नदिवस; तरी पण ह्या दिवसात विशेष काहीही घडणार नाही. हा दिवसही रोजच्याचसारखा, अगदी रोजच्यासारखाच !

हे दार वाजवतील, मी हसून पुढे होऊन त्यांचे स्वागत करीन. विना आणि दत्ता नाश्ता करायला धडधड करत येतील आणि त्या आवाजाने पाळण्यात जागी झालेली सुजाता आरडाओरडा करील, तक्रारीचा

सूर काढील. ही कधीच न थांबणारी धावपळ वेग घेईल.

ह्या अफाट धावपळीतही माझे मन विचार करीत असते. ह्या महागाईच्या दिवसांत ह्यांच्या पगारात तीन मुले वाढवून शिवाय आपले घरकुल उभारणे म्हणजे एक दिव्यच! पण तेही आम्ही साधले. आम्ही दोघांनी मुलांना शिक्षणही चांगले देण्याचा प्रयत्न केला आहे. अगदी लग्नाच्या अक्षदा पडल्यापासून आम्ही दोघांनी एकमेकांचे सुख पाहिले, दुःख जपले. जोडीने संकटांना सामना दिला. तरीही माझ्या मनात एक सल रुतून राहिला आहे. मी मोकळ्या मनाने सुखाचा आस्वाद घेऊ शकत नाही. मी बऱ्याच वेळा अस्वस्थ होते, बेचैन होते. तारुण्यात जोपासलेल्या काही आकांक्षांची भुते मला अस्वस्थ करून सोडतात. मी माझ्या मनाशी कल्पिलेले त्या वेळचे आयुष्य किती वेगळेच होते....

मला वाटते त्या वेळची ती मनोराज्ये सुरू झाली माझ्या एका कथेमुळे. शाळेत असताना मी काहीतरी खरडीत असे. वर्गाशेजारी आंब्याचे झाड होते. त्यावर असंख्य पक्षी येऊन किलबिल करीत असत. त्यांच्याकडे सतत माझे लक्ष असे, अभ्यासापेक्षाही जास्त. त्या नादातच मी गोष्टी, कविता लिहीत असे. अशीच एक कविता बाबांच्या मित्रांच्या ओळखीने वर्तमानपत्रात छापून आली – आली मात्र छापून आणि माझे हात जणू गगनाला पोचले. मला वाटले माझ्या आयुष्याचे ध्येय मला सापडले. मी मोठी लेखिका होण्यासाठीच जन्माला आलेली आहे. शाळेच्या व नंतरच्या ५–६ वर्षांत मी खूप लिखाण केले. बरीचशी बक्षिसेही मिळवली,



वर्गातील माझे निबंध सर्वोत्कृष्ट ठरत; तरीही त्याचबरोबर 'साभार परत' च्या लेखांनी सबंध खोली भरून गेली असती हेही तितकेच खरे होते. पण मी निराश झाले नाही. माझे प्रयत्न सोडले नाहीत.

याच शकुन वेळी ह्यांची भेट झाली आणि सगळेच हरवले. माझ्या सगळ्या आशा–आकांक्षा, स्वप्ने यांच्यावरच केंद्रित झाली. ह्यांचे घर सजवायचे, यांचे सुख पाह्यचे हेच माझे नवे ध्येय ठरले. नाहीतरी स्त्रीचे जग आवडत्या माणसाच्या विश्वातच सामावलेले असते म्हणतात ना! मी माझे लेखन संपूर्णपणे विसरले आणि एक दिवस यांच्याबरोबर सात पावले टाकून, उंबरठ्यावरचे माप लवंडून यांच्या घरात आले. लग्न झाले. मुलेही झाली. आयुष्य मार्गाला लागले. तरीही मधूनच माझे काहीतरी हरवले आहे, कुणीतरी मला फसवले आहे, असे सारखे मनात वाटत असते. नव्या नवतीचा बहर केव्हा ओसरला हे कळलेच नाही. इतक्या वर्षांत सुरुवातीला ह्यांचे प्रेम हेच सर्वस्व वाटे. नुसत्या त्यांच्या स्पर्शानेही माझे रक्त उसळू लागे. संकटे, काळजी तुच्छ वाटत घरकाम म्हणजे गंमत वाटे, मुले म्हणजे फुलासारखी वाटत. प्रत्येक उगवता दिवस म्हणजे नवे साहस असे वाटे. जीवनाशी टक्कर देण्यात मजा येई.

पण आज असे वाटेनासे झाले आहे. आता सर्व काम म्हणजे मुद्दाम कुणीतरी खांद्यावर दिलेले ओझे वाटत आहे. लादलेले वाटत आहे. या चक्रात मुद्दाम कुणी-तरी आपल्याला पिळून काढत आहे असे सारखे वाटते. मी मीच आहे असे वाटे-नासेच झाले आहे. एक दुसरीच कुणीतरी व्यक्ती मी बनलेली आहे. मी हे उदास विचार झटकून मन ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करू लागले. अजून वेळ गेलेली नाही. मी माझे पूर्वीचे बेत निकराने पार पाडीन. परत माझे लेखन सुरू करीन.

यांच्या दार ठोठावण्याने मी विचारतंद्रीतून बाहेर पडले आणि दार उघडायला धावले. यांचे पाऊल घरात पडेल तेव्हा काहीतरी विशेष घडेल, असे मला आपले उगीचच वाटत होते. दार उघडताच मला पाहताच यांनी हास्य केले, आत आले आणि तडक बाथरूमकडे गेले—माझी जरा निराशा झाली. पण मी मुकाट्याने कामाला लागले. दत्ता तोंडाचे बोळके पसरून हसत हसत आत आला. रात्रीच त्याचे पुढचे दोन्ही दात पडले होते. त्यामुळे तो गमतीदार दिसत होता. रात्री दात पडले, खूप रक्त आले, तेव्हा त्याचे रडणे थांबेना म्हणून मी त्याला बरीचशी चिल्लर दिली होती. किती पैसे होते याची मलाही कल्पना नव्हती. त्याला वाटले होते, तो झोपला की मी ते काढून घेईन. मी दुसऱ्याच विचारात गुंतल्यामुळे माझे लक्षही राहिले नाही त्या पैशांकडे. ते पैसे खुळखुळवीत स्वारी हसत होती. " आई, हे सगळे पैसे माझे ? " तो पुन्हापुन्हा विचारून खात्री करून घेत होता.

" हो रे राजा, तुझेच. जा आता. बाबांना म्हणावे चहा प्यायला चला. "

हे आत आले. अगदी दमल्यासारखे दिसत होते. मी यांच्याकडे निरखून पाहिले.

ह, आज आपल्या लग्नाचा वाढदिवस याची यांना आठवणही दिसत नाही तर ! मी टक लावून पाहत आहे हे कसे कोण जाणे यांना कळले. त्यांनी एकदम वर मान केली. नेत्राला नेत्र भिडले. खुदकन हसत मी म्हटले, " अभिनंदन. "

" अभिनंदन, ते कशाकरता ? "

" सहजच. "

" तरीपण मला समजलं नाही. " हे गोंधळून गेले होते.

मी जरा फणकाऱ्यानेच म्हटले, " समजलं नसेल तर ऐका. आज आपल्या लग्नाला बारा वर्षे झाली, महाराज ! " ह्यांचा चेहरा एकदम पडला.

" सॉरी हं ! गेल्या आठवड्यात मला आठवण झाली होती आणि तुला काही-तरी प्रेझेंट द्यायचं मी ठरवलंही होतं. पण आज मात्र अजिबात विसरून गेलो बघ—मग सिनेमा, जेवण बाहेर करू या का मुलांना घेऊन ? मलाही आज सुटी आहे. का मित्रांना बोलावू या ? "

" छे छे, काही नको तसलं आणि खरं म्हणजे मलासुद्धा आज पहाटेपर्यंत आठवण नव्हती हं ! " मी सारवासारव करीत म्हटले.

मध्येच दत्ताने विचारले, " आई, लग्नदिवस म्हणजे काय ग ? "

" अरे, तोही एक वाढदिवसच. पण ज्या दिवशी आपण जन्मलो त्या दिवशी आपण वाढदिवस करतो, तर ज्या दिवशी लग्न झालं असेल ना त्या दिवशी तो लग्नाचा वाढदिवस म्हणून साजरा करायचा. कळलं ? बरं चला, आटपा, पळा आता शाळेला. . . " मला या विषयावर बोलायचाही आता अगदी कंटाळा आला होता.

मुले शाळेत गेली, सुजाताचे सगळे आटोपले. यांची झोप सुरू झाली होती. मी माझे सगळे काम आटोपले की चार ओळी तरी लिहून आज मुहूर्त करायचाच असे ठरवले होते. कागद—पेन सगळे जमवाजमवी करून आता बसणार एवढ्यात मुले परतच आली. आल्याआल्या म्हणाली, " आई, आम्ही आज हेडमास्तरांकडून रजा मागून घेतली आहे. कारण, आज आम्ही गंमत करायचं ठरवलं आहे. मजेचा स्पेशल दिवस आहे म्हणून. चल, चल ना आई, तू न् बाबा आमच्या खोलीत. अगदी लवक्कर. " यांना झोपेतून उठवूनच कोचावर आणून बसवले व मला हात पकडून अगदी ह्यांच्या शेजारी नेऊन बसवले. सुजाताला माझ्या मांडीवर ठेवले. टपोरी दोन गुलाबाची फुले आमच्या दोघांच्या हातांत दिली. नंतर कसलातरी कापसाचा बोळा आमच्या हातावर चोळला. अरे ! हे तर माझेच अत्तर होते वाटते ! विनाने एक डबा माझ्या हातात आणि दत्ताने दुसरा डबा ह्यांच्या हातात दिला. दोघांनी खाली वाकून नम्रपणे नमस्कार केले. आणि दोघे एकदमच ओरडले, " Happy birthday to you. ' अरे, चुकलंच की ! आई, happy लग्नदिवस म्हणजे काय म्हणायचं ग ? " जीभ चावीत दत्ता विचारत होता. आम्हांला दोघांना इतके हसू लोटले, माझ्या डोळ्यांत इतके आनंदाश्रू दाटले, की मला पुढचे दिसेचना. डब्याला बांधलेली


खिनसुद्धा मला धड सोडता येईना. माझ्या डब्यात बारा पेढे होते तर यांच्या डब्यांत चॉकोलेटे होती. (हे नेहमी लहान मुलासारखी चॉकोलेटे चघळीत असतात.) मला मुलांच्या चतुराईचे नवल वाटले.

" अरे, पण इतकं छान बक्षीस, तुम्ही आणलंत कुठून ? "

" अग, तू रात्री दत्ताला पैसे नाही का दिलेस त्यांतूनच. "

मी माझ्या दोन्ही मुलांकडे डोळे भरून पाहिले. नंतर ह्यांच्याकडे पाहते तो त्यांच्याही डोळ्यांत पाणी चमकत होते. खरेच, माझे आयुष्य वाया गेलेले अन् उदास का बरे वाटले मला ? स्त्रीला आयुष्यात आणखी काय हवे असते ! हे उत्साहाचे जिवंत झरे देव तिला देत असताना घराच्या चारी भिंतींत तिला स्वर्ग, पृथ्वी, विश्व सारे सारे गवसत असते आणि मी वेड्यासारखा चंद्राचा हट्ट धरून बसले होते. चंद्र-सूर्य, चांदण्या सगळ्या माझ्या हातांतच होत्या आणि वेड्यासारखी मृगजळा-मागे धावत होते. केवढी मी वेडी ! मी नकळतच यांच्या हातांत हात गुंफले.

" आजचा लग्नदिवस सर्वांत आनंदाचा झाला हं बाळांनो. " मी जवळ ओढीत आनंदाने म्हटले. ह्याच वेळी ह्यांनी आम्हांला सर्वांना आपल्या मिठीत गोळा केले. हे माझ्याकडे पाहून लग्नाच्या पहिल्या दिवशी जसे हसले—तस्सेच अगदी आजही हसले. देवाजवळ जळणाऱ्या उदबत्तीचा गंध खोलीत पसरावा तसा एक सुगंध माझ्या मनात व्यापून राहिला. . . . . ○



# खुसखुशीत विनोदी गोष्टी



अकरा विनोदी गोष्टींचा हा संग्रह आहे. गोष्टी खुसखुशीत आहेत. खेळकर शैलीत सांगितलेल्या आणि हसवणाऱ्या आहेत. घटकाभर गंमत करणाऱ्या आहेत; आणि विशेष म्हणजे कंटाळा न येता संपलेल्या आहेत. मनाला उल्हसित करण्याची, तजेला आणण्याची खुमारी त्यांच्यांत आहे. अभिजात विनोद, सूक्ष्म निरीक्षण, समाजाच्या व्यंगांवर टीका, अश्रूंना हसविणारा विनोद असल्या काही अपेक्षा न ठेवता निखळ करमणुकीच्या, गमतीच्या दृष्टीने वाचले तर पुस्तक चांगले आहे. अनेक वाटांनी येथे विनोद आलेला आहे.

'व्यायाम' या कथेतला राजा व्यायाम करून शरीर सुधारायला जातो, पण व्यायामाचे प्रमाण नि काळवेळ यांचे तारतम्य उतावळेपणामुळे न राहिल्याने व्यायामाचा प्रत्येक प्रकार त्याच्या अक्षरश: अंगाशी येतो. आसने करताना पडून तोंडाला सूज येते, पहाटे तीनला 'रनिंग' करताना पोलिस मागे लागतात, जोरबैठका काढून हातापायांना सूज येते व अंथरूण धरावे लागते. इतके होऊनही व्यायामाची आणि शरीर सुधारण्याची हौस कायमच असते. स्वभावनिष्ठ विनोदाचे हे एक गमतीशीर चित्रण आहे. अतिशयोक्ती हा विनोदाचा आत्मा असल्यामुळे, यातल्या घटनांमध्ये अतिरिक्तता असली तरी तिच्यामुळेच विनोद निर्माण झालेला आहे. 'चुकीच्या सिद्धांताची गोष्ट' ही अशीच अतिशयोक्ती आणि व्यक्तिविशेष यांतून विनोद निर्माण करते. मित्राचा मित्र तो आपलाच मित्र असे समजणाऱ्या शेवडेकडे केंजळेसारखा विक्षिप्त पाहुणा येतो आणि त्याला सतावून सोडतो. त्याचेच दात त्याच्या घशात घालून त्याला पळवून लावल्यावर शेवडेला शेवटी आपला सिद्धांत सोडून द्यावा लागतो. अतिशयोक्ती फार ताणली गेल्याने आणि एकंदर प्रकार पोरकटपणाच्या पातळीवरून कुठेच वर उचलला न गेल्याने ही कथा विनोदी म्हणण्यापेक्षा हास्यास्पद म्हणणे ठीक होईल. (पण तरीही आकर्षक वाटत राहते ते खेळकर शैलीतल्या लेखकाच्या साध्यासुध्या भाषाशैलीचे.) 'चिंताकर चावरे' ही याच प्रकारची कथा त्यापेक्षा बरी आहे.

'एका काऊबॉयची जन्मकथा', 'चाळीस वर्षांपूर्वीची गोष्ट', 'पडद्याआडचे नाटक' व 'एक विमाएजंट खेड्यात जातो' या कथांमध्ये घटना फारशा घडत नाहीत. सारी गंमत आहे ती त्यांतल्या खुमासदार संभाषणांत. विनोदाची रंगत वाढवीत नेणारी यांतली संभाषणे अगदी नाट्यमय आहेत. आणि त्यांतून व्यक्तींच्या स्वभावाच्या मजेदार बाजू व्यक्त झाल्या आहेत. खंडूच्या आईचे विचित्र डोहाळे

पाहून खंडूच्या वडिलांची उडालेली तारांबळ, दिग्दर्शकाच्या हाती दिगंबर वामनचे नाटक गेल्यावर त्यातल्या घटनांची, व्यक्तींची व नाट्याची झालेली ओढाताण व वाभाडे, शिंदेंना विमा समजावून सांगताना विमा एजंटाला हात टेकण्याची आलेली वेळ हे सगळे संभाषणांमधून खुलवत खुलवत नेले आहे. व्यक्ती, घटना आणि परिस्थिती यांवर ही संभाषणे विनोदाचा झोत टाकतात. " एखादं सुंदर गाव असावं, त्या गावात एखादं सुंदर घर असावं, त्या सुंदर घरात एखादा सुंदर गवळी असावा, त्या सुंदर गवळ्याची एखादी सुंदर गोजिरवाणी पण अवाढव्य म्हैस असावी, त्या म्हशीला एक सुरेख, आखूड आणि आटोपशीर शेपूट असावं, तशी वाटते तुझी वेणी. " यांसारख्या गमतीदार उपमांनी ही संभाषणे खळखळून हसतात. हसायला लावतात.

'शुभमंगल सावधान' ही कथा म्हणजे लेखकाच्या निरीक्षणाचा नमुना आहे. लग्नविधीसारख्या अस्ताव्यस्त प्रकारावर विनोदी स्पॉट लाईट टाकून काही नमुनेदार दृश्ये नेमकी हेरली आहेत. 'असाच काहीसा प्रकार' ही एक भुताटकीची गोष्ट आहे आणि 'एकनाथ बिस्किट मार्ट' ही स्वभाव आणि घटना यांच्या दुपेडी गुंफण करणारी चढत्या श्रेणीची विनोदी कथा आहे. या तिन्ही गोष्टी चांगल्या आहेत.

'दुसऱ्या मरणाची ही शोकांतिका' ही एक सामान्य गोष्ट आहे.

एकूण, दोन गोष्टी सोडल्या तर हे पुस्तक म्हणजे खुसखुशीत विनोदी गोष्टींचा संग्रह आहे. एक गंमत म्हणूनच या विनोदाकडे पाहायचे. भलत्या उच्च अपेक्षा करायच्या नाहीत. ◻

---

# सती गोदावरी

---

"अलीकडे ऐतिहासिक व्यक्तींच्या राजकीय जीवनाबरोबरच कौटुंबिक जीवनाचेही इष्ट, तसेच हृद्य चित्रण करण्याची नवी प्रथा पडू लागली आहे. त्याच प्रथेतील हे नाटक आहे," असे प्रकाशकांनी या नाटकाच्या प्रस्तावनेत म्हटलेले आहे, ते बरोबर आहे. शिवाजी-संभाजी, त्यांच्यांतील दुरावा, आणि त्याला कारण म्हणजे शिवाजीची कडक शिस्त ही साखळी आता सर्वांच्या मनामध्ये घट्ट बसलेली आहे. ही साखळी मनात धरूनच चव्हाणांनीही नाटक लिहिलेले आहे. परंतु त्या असामान्यांच्या जीवनातले ते दाहक नाट्य पेलण्यासाठी केवढीतरी पल्लेदार प्रतिभा हवी. चव्हाणांच्या प्रतिभेचा पल्ला तेवढा नाही. त्यामुळे हे नाटक म्हणजे कृत्रिम संवाद, ढोबळ नाट्य आणि एकांगी व्यक्तिचित्रण यांचे संकलन झाले आहे. एकंदर ऐतिहासिक वातावरण निर्माण करण्याचा सर्व खटाटोप बालिश आहे. देवडीवाल्याने

येऊन वर्दी देणे, जासूद पाठवणे, फटक्यांची, हातपाय तोडण्याची शिक्षा देणे, एवढ्याने ऐतिहासिक वातावरण निर्माण होत नाही. त्याला इतिहासात हरवलेले मन आणि ऐतिहासिक कागदोपत्री घोटवलेली लेखणी लागते. ते या चव्हाणांच्याजवळ नाही. केवळ नवीन टूम म्हणून त्यांनी हे नाटक लिहिलेले आहे. त्यामुळे ठिकठिकाणी 'हास्यास्पद विसंगतीही आढळतात! महाराजांच्या राज्यभिषेकाला महाराष्ट्रातील ब्रह्मवृंदाचा विरोध होता. पण "आपल्याला घोर करायचं आता काहीही कारण नाही, मामाहेब," असे बाळाजीने जिजाबाईचे सांत्वन करणे आणि "तसा घोर आम्हांला कधीच नव्हता. तुमच्यासारख्या निष्ठावंत अनुयायांच्या भरंवशावर आम्ही बिनघोर आहोत," असे जिजाबाईने उत्तर देणे हा सगळाच प्रकार विचित्र वाटतो. स्वराज्यसंस्थापन करणाऱ्या आपल्या पराक्रमी पुत्राच्या राज्यभिषेकाच्या बाबतीत वीरमाता जिजाबाई इतकी हळवी नव्हती. नाटकावर सर्वत्र गडकऱ्यांची उघड छाप आहे. पण ती उसनी ऐट आहे हेही तिथेच जाणवते. संभाजीचे वाघाच्या झुंजीचे वर्णन धाराऊने जिजाबाईला ऐकवणे हे अप्रस्तुत आणि अनावश्यकच, पण त्यातही "एका एका लाथेनं दोन्ही छाव्यांचे मुडदे पाडले, आणि ते उचलून जवळच्या झाडीत भिरकावून दिले!" ही भुक्कड अतिशयोक्ती आणखीच अप्रस्तुत! "जवानीच्या जोसात ते आपल्या गुणावर जाणार." हे वाक्य जिजाबाईच्या–संभाजीच्या आजीच्या–तोंडी? भाषा सर्वत्र एकाच छापाची आहे. मासाहेब आणि धाराऊ हे फक्त नावांवरून ओळखायचे! संभाजीने पळवून नेलेली गोदावरी विधवा होती, असा काही ठिकाणी उल्लेख आहे. चव्हाणांनी मात्र ती सधवा दाखविली आहे, आणि नवरा जिवंत असताना तिला 'सती जायला' लावले आहे!

अशा या ढोबळ नाटकात "पापण्यांच्या आडोशानं डोळ्यांतल्या बाहुल्या जपाव्या तसं त्यांना जपलं." यासारखे एखादे सुंदर वाक्य चमकून गेले, की बरे वाटते. "चार पोराबाळांना जन्म देणं, काट्याकुट्या जमवून आपलं घरकुल उभारणं, याला का कुठं जीवन म्हणतात? असं जिणं चिमण्या–कावळेही जगतात" हे वाक्य मात्र सहीसही सावरकरांचे.

**— निशीकांत मिरजकर**

['चंगळ' अनंत तडवळकर–जे. विनायक प्रकाशन–किंमत तीन रुपये–]
['सती गोदावरी' शं. ब. चव्हाण–चंद्रकांत शेटये प्रकाशन मंदिर, मूल्य रु. तीन]

## एक परिसंवाद

मुक्काम औरंगाबाद.

दिनांक २६ एप्रिल, १९६७.

वेळ : संध्याकाळी ५॥.

स्थळ : सरस्वती भुवन कॉलेजचा डायनिंग हॉल.

प्रसंग : 'इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडम्'च्या औरंगाबाद शाखेच्या वतीने आयोजित केलेला परिसंवाद.

विषय : स्वातंत्र्यानंतरचे मुस्लिम राजकारण.

औरंगाबाद : ज्या ठिकाणी हिंदु-मुस्लिम दंगल होऊन वर्षसुद्धा झाले नाही, असे शहर. दंगल ही गोष्ट तर फार जुनी. त्यानंतर एका जुन्या हैद्राबाद संस्थानच्या अधिकाऱ्याकडे सापडलेले मालेगाव बनावटीचे हातबॉम्ब, कटाचा संशय ही गेल्या महिन्यातील घटना. स्वस्थतेचे ग्रह पत्रिकेत नसलेले हेही एक शहर.

# स्वातंत्र्यानंतरचे मुस्लिम राजकारण

त्या ठिकाणी मुस्लिमांच्या राजकारणावर चर्चा करायची आहे. आमंत्रण सर्वच बुद्धिवंतांना, हिंदूंनाही आणि मुस्लिमांनाही.

नांदेडचे प्रा. नरहर कुरुंदकर, पुण्याचे श्रीपाद जोशी, यदुनाथ थत्ते, प्रा. बापट, वसंत पळशीकर, मुंबईचे प्रा. ए. बी. शहा, प्रा. रा. भि. जोशी, प्रा. पारीख अशी ही बाहेरची विचारवंत मंडळी तर खुद्द औरंगाबादमधील श्री. गोविंदभाई श्रॉफ, अनंतराव भालेराव, प्रा. मोईन शाकिर, प्रा. बोरीकर, उर्दू कवी बशेर नवाज. सर्व बडी मंडळी.

एकंदरीत 'प्रा०'चा भरणा जास्त.

एक विदुषीही. काही मुस्लिम बांधवही कदाचित औत्सुक्य असल्यामुळे किंवा विषयात खरोखरीच गोडी असल्यामुळे आलेले.

टेबलाभोवती मांडलेल्या खुर्च्यांवर सर्व स्थानापन्न झाले. अपेक्षेपेक्षा जास्त प्रतिसाद मिळाल्यामुळे खुर्च्या कमीच पडतात की काय ही रास्त भीती.

**किरण ठाकूर**

मग प्रत्येकाने उठून आपले नाव, गाव, व्यवसाय सांगून ओळख करून द्यायची. कन्व्हेनर प्रा. अन्सारी मराठवाडा विद्यापीठाचे राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. शर्मा यांना विनंती करतात. थोडे आढेवेढे, मग आग्रहाला मान देऊन अध्यक्षस्थान स्वीकारले जाते.

प्रा. अन्सारींचे स्वागतपर भाषण सुरू झाले आहे. : परिसंवादाचे प्रयोजन काय आहे ते समजावून सांगतात. हिंदु-मुस्लिम ऐक्याची आवश्यकता याबाबत कुणाचेही दुमत होणार नाही म्हणतात. दोन्ही समाजांतील आपल्यासारखे विचारवंतच या बाबतीत मार्ग काढू शकतील, असा विश्वास व्यक्त करतात.

परिसंवादाचे उद्घाटन जाहीर करण्यासाठी रेक्टर पारीख उभे राहिलेले आहेत. प्रा. शहांचा एक गुण ते सांगतात. प्रा. शहा आधी एखादी गोष्ट ठरवितात आणि मग त्यासाठी काय कारणे आहेत ते शोधतात. मला या परिसंवादाच्या विषयाची फारशी माहिती नाही हे त्यांना सांगू पाहत होतो पण आधीच अध्यक्ष ठरवून टाकल्यामुळे विषयाची माहिती नसणे हेच कारण त्यांनी दाखविले.

हास्याची एक छोटीशी लकेर उपस्थितांमधून निसटून जाते.

प्रा. अ. भि. शहांनी विल्स् पेटवून बहुधा विचार करायला सुरुवात केली असावी. या माणसाबद्दल बऱ्याच उपस्थितांना औत्सुक्य असावेसे दिसते. पुरीच्या शंकराचार्यांना आव्हान देणारी ही वल्ली. आज या शंकराचार्यांच्या मूर्ख बडबडीमुळे त्यांच्याविषयीचा आदर कमी झाला असला तरी गोवधबंदीच्या चळवळीच्या काळात या ' महात्म्या 'ने स्वतःचा बराचसा गवगवा आणि दबदबा निर्माण केला होता. त्याला या प्रा. शहा नावाच्या माणसाने वेदांविषयी आव्हान दिले होते. वेदशास्त्रांना कोळून पिऊन ते रक्त मानसी भिनविलेल्या धर्मपीठ प्रमुखाला.

प्रा. पारीख फाळणीचे विवेचन करतात, " दोन राष्ट्रांची वेडगळ कल्पना घेऊन बसलेल्या लोकांच्या दुराग्रहामुळे हे सर्व घडले. हिंदू आणि मुसलमान ह्या दोन मनोवृत्ती एकत्र राहणे शक्यच नाही अशी ठाम समजूत करून घेण्यात आली होती. हिंदुस्थानमध्ये ' हिंदू बहुसंख्याक आहेत आणि आम्हा मुसलमानांना त्यांच्या सत्तेखाली राहावे लागेल. आम्ही, आमचे हितसंबंध सुरक्षित राहणार नाहीत, ' अशी मुसलमान बांधवांची ओरड होती, त्यामुळे फाळणी करण्याचे मान्य करण्यात आले. फाळणी ठरविली नाही ती मान्य केली. (we agreed to part) परंतु या फाळणीमुळे मुसलमान समाजाचेच नुकसान झाले. फाळणी देशाची झाली नाही, फाळणी त्यांच्या समाजाचीच झाली. . . "

आणखी विचारवंत परिसंवादासाठी यायला लागले आहेत, हे साहित्यिक आणि चिकित्सक टीकाकार प्रा. वा. ल. कुलकर्णी, औरंगाबादमधील प्रसिद्ध डॉ. पठाण.

डॉ. शर्मा परिसंवादाच्या कामाला सुरुवात करतात. पहिलाच निबंध प्रा. नरहर कुरुंदकरांचा. पान चघळत चघळत ते उठतात, " . . .अल्पसंख्याकांना नेहमी बहु-

संख्याकांची भीती वाटत असते, ही भीती हा त्यांच्या राजकारणाचा गाभा असतो. समतेची हमी आणि समजंस औदार्य हा या भीतीवरचा उपाय असतो. . . . .मुस्लिम समाज अगतिक, सामाजिक व शैक्षणिक बाबतींत मागासलेला असल्यामुळे विकासाचे सर्व प्रश्न औदार्याने हाताळले पाहिजे यात शंका नाही. . . .पण या प्रश्नाचे स्वरूप केवळ अल्पसंख्याकांचा प्रश्न इतकेच मर्यादित नाही. हिंदुसमाज जातीच्या विभाजनाने विस्कळित असल्यामुळे मुस्लिम समाज एकसंध असणाऱ्या भारतीय समाजातील सर्वांत मोठा गट आहे. स्वतःच्या धर्माचा, संस्कृतीचा, श्रेष्ठतेचा व परिपूर्णतेचा अहंकार, जेतेपणाचा दर्प व इतर धर्म व संस्कृतींविषयींची तुच्छता यामुळे मुस्लिम राजकारणात अहंकार व विशेषाधिकार या कल्पनांचा पगडा फार दाट आहे. अहंकारातून उदय पावणाऱ्या या भ्रामक राजकारणाला उत्तर औदार्य नसून धर्म, इतिहास, राजकारण यांची निर्भय व कठोर चिकित्सा हे आहे. . . . .श्रेष्ठतेच्या कल्पनेमुळे मुस्लिम समाज इतर धर्मांचे अस्तित्व मानतो. परंतु इतर धर्मीयांना आपल्या श्रद्धेनुसार जगण्याचा हक्क मानीत नाही. . . . तुम्हांला पैगंबर हा एकमेव प्रेषित व कुराण हा ईश्वरी ज्ञानाचा साठा वाटतो हे ठीक आहे. पण इतरांना पैगंबर हा इतर ऐतिहासिक पुरुषांसारखाच एक थोर पुरुष वाटत असेल तर त्यांना तसे वाटण्याचा हक्क असायला हवा. परंतु मुसलमान तसे मानीत नाहीत. तुम्ही मुसलमान आहात, तुमचा तो हक्क आहे. परंतु आम्हांलाही मुसलमान ' नसण्या 'चा हक्क असू द्या. . . . "

बाकी कुरुंदकर म्हणजे वैचारिक बंडखोर वाटतात. एखाद्याने समजा, एवढेच छापले, ' आम्हांला मुसलमान नसण्याचा हक्क असू द्या ' ! केवढा गोंधळ होईल. काय परिस्थिती आली आहे पाहा, असाही हक्क आम्हांला मागावा लागतो ! वाचकांची पत्रे, मुलाखती, अग्रलेख, निषेध, सभा. . .काय न् काय !

बाकी वैचारिक दिवाळखोरीपेक्षा ही बंडखोरी परवडली. निदान शिस्तबद्ध तर्कशास्त्र तरी यात असते, समोरच्या माणसाला बुद्धी असेल तर तो पटवून घ्यायचा प्रयत्न तरी करतो.

## इतिहासाची चिकित्सा हवी

कुरुंदकरांची मते स्पष्ट आणि तितकीच आग्रही. ते नेहमी म्हणतात, हिंदू असो वा मुसलमान असो त्याला जर तळमळ असेल त्याने एकत्र यायचा प्रयत्न करावा, डोके शांत ठेवून, इतिहासाची चिकित्सा करून समोरच्या व्यक्तीला वर्तमानकालाची जाणीव द्यावी आणि त्यावरून पुढे वाटचाल करावी. इतिहासाची शास्त्रशुद्ध चिकित्सा नेहमीच आवश्यक आहे. मुसलमानांना आवडणार नाही म्हणून मी खऱ्या गोष्टी बोलणार नाही, त्यांना आवडेल तेवढेच बोलेन. या लवचिकपणाला गोंजारून घेण्याला मी अनुकूल नाही.

प्रा. बापट उठतात. कुरुंदकरांच्या काही मुद्यांना आक्षेप घेण्यासाठी. निबंध सोडला

तर आतापर्यंत सर्व कामकाज इंग्रजीत चालू आहे. हे मात्र सुरुवातीलाच सांगून टाकतात, " आमच्या तरुण प्राध्यापकांच्या इंग्रजीविषयी तुम्हा सर्वांना माहीत आहेच. म्हणून मराठीतच बोलतो. " पण मग काहींना मराठी समजणार नाही म्हणून अध्यक्ष सुचवितात म्हणून इंग्रजीतच बोलतात. अस्खलित इंग्रजीत. झरझर बोलतात. ' धर्माशिवाय निधर्मी समाज कसा असणार ? मुसलमान धर्मीयांना कुराणात विश्वाचे रहस्य दडलेले वाटते तर हिंदूंना वेदातील तत्त्वे प्रमाण वाटतात. प्रत्येक धर्मीयाला आपल्या श्रद्धांना जपायचे आहे, तर जपू द्या. इतिहासाची चिकित्सा करून काही घडणार नाही. कटुता मात्र वाढेल– "

बोलण्याच्या भरात ते सांगून टाकतात, " धर्म, संस्कृती, भाषा, राष्ट्रीयत्व यांचा परस्परांशी काही संबंध नाही. एखादा हिंदूधर्मीय इंग्रजी भाषिक असू शकेल, त्याची संस्कृती अरेबियन असू शकेल आणि राष्ट्रीयत्व भारतीय असू शकेल. किंवा उद्या राष्ट्राचे तुकडे झाले तर राष्ट्रीयत्व महाराष्ट्रीयनसुद्धा असू शकेल.

' महाराष्ट्रीयन ' राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेने उपस्थितांमध्ये अशक्यतानिदर्शक हास्य फुटून जाते. तामीळनाडमध्ये कदाचित या वाक्यावर ' हियर, हियर 'च्या टाळ्या पडल्या असत्या.

मग एकामागे एक विचारवंत आपले विचार मांडायला सरसावत आहे. बरेचसे प्राध्यापक असूनही या लोकांना दहा मिनिटांच्या कालखंडांत स्पष्ट, नेमके आणि योग्य मुद्देसूद बोलता येत नाही याचे आश्चर्य वाटते.

इतिहासाची चिकित्सा. शतकानुशतके मुसलमान इतर धर्मीयांना आपल्या सत्तेखाली आणण्याच्या खटपटीत आहेत. आपला धर्म इतरांच्या गळी उतरविण्याच्या प्रयत्नांत आहेत. कुराणातील तत्त्व म्हणजे अंतिम तत्त्व या समजाला कवटाळून आहेत.

डॉ. शर्मा सांगतात, " ज्या राष्ट्राला इतिहास नाही ते सर्वांत सुखी राष्ट्र..."

यदुनाथ थत्ते म्हणतात, " हिंदू समाजामध्ये प्रत्येक पिढीत निरनिराळे विचार असणारे लोक असतात. त्या सर्वांना त्याने पचविले आहे. चार्वाक, बुद्ध, जैन या सर्वांची मते त्याने सामावून घेतली आहेत. या उलट मुसलमान मात्र अजूनही कुराण अंतिम मानून चालला आहे. "

गोविंदभाई श्रॉफ सांगतात, " कुरुंदकरांचे म्हणणे पूर्वग्रहदूषित आहे. आजचा सर्वसामान्य मुस्लिम माणूस इस्लाम राज येण्याची स्वप्न पाहत नाही. "

प्रा. रा. भि. जोशी माहिती पुरवितात, " कुराणाचेसुद्धा वेगवेगळ्या प्रकारे अर्थ लावण्यात आले आहेत. पैगंबरानंतर आणि त्याच्या काळातसुद्धा, हे घडले आहे, एकूण २५० प्रकारचे अर्थ लावले गेले आहेत. "

श्रीपाद जोशी आणि डॉ. पारिख म्हणतात, " फाळणीनंतर झालेल्या अत्याचारांमुळे मुसलमानांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. त्यांच्यामध्ये आत्मविश्वासाचा पूर्णपणे अभाव आहे. "

परिसंवाद बराच रंगत चालला आहे. दोन-अडीच तासांवर वेळ होऊन गेला आहे. आज प्रा. अ. भि. शहांनी भाग घेतलेला नाही. नुसतेच लिहीत होते. बहुधा उद्या बोलणार असावेत.

दिनांक : २७ एप्रिल.

वेळ सकाळी : ९–३० वाजता.

अजून कालच्या इतकेही लोक आलेले नाहीत. रविवार असल्यामुळे कदाचित आज जास्त येतील असा अंदाज. कदाचित सुटी असल्यामुळेच शैथिल्य आले असावे.

सभेची सूत्रे प्रा. शहांकडे आहेत.

एकूण तीन निबंध या अधिवेशनात वाचले जातील.

शहांची विल्स् पेटली.

पहिला निबंध मराठवाड्यातील तरुण कार्यकर्ते प्रा. एस्. ए. अन्सारींचा. विषय : मुस्लिम वृत्तपत्रे.

मुस्लिम वृत्तपत्रे म्हणजे प्रामुख्याने उर्दू वर्तमानपत्रे. प्रा. अन्सारी त्यांची वर्गवारी करतात. १. स्थानिक वर्तमानपत्रे : व्यक्तिगत फायद्यासाठी निघणारी ही वर्तमानपत्रे २. राजकीय पक्षाची मुखपत्रे : उदा. ‘ हयात ’, ‘ किसान मजदूर ’, ‘ उर्दू ब्लिट्स् ’ ३. मुसलमानांच्या जातीय भावना भडकविणारी ‘ मिदा-ए-मिल्लत ’, ‘ जिंदगी ’, ‘ तजल्ली ’ व ‘ रेडियन्स ’सारखी जमाते इस्लामीची प्रचारपत्रे. ४. ‘ शौर ’सारखी धर्मप्रचार न करणारी परंतु जातीय असलेली वर्तमानपत्रे, आणि ५ निधर्मवादी (सेक्युलर) पत्रे उदा. ‘ इन्कलाव, ’ ‘ सियासत ’ ‘ उर्दूप्रेस ’, ‘ जम्हूरियत ’ इ.

प्रा. अन्सारींनी अगदी थोडक्यात आणि मुद्देसूद विचार मांडले होते.

त्यांची तक्रार रास्त वाटते. ते म्हणतात, “ बहुसंख्य पत्रे जातीय, राष्ट्रविरोधी प्रचार करतात हे मान्य. पण काही थोडी का होईना अशी पत्रे आहेत की ती निधर्मी आहेत, राष्ट्रीय आहेत. त्यांची दखल बहुसंख्याक घेत नाहीत. इतर भाषिक पत्रे जातीय मजकुराचीच भाषांतरेच छापतात, त्यांनी निधर्मी, राष्ट्रीय विचार प्रकट करणाऱ्या उर्दू मजकुराच्या भाषांतराला प्रसिद्धी देऊन या लोकांच्या भावनांची कदर केली पाहिजे. ”

कुरुंदकरांनी या बाबतीत आपण स्वतः काय केले ते सांगून टाकले, “ आर्. डी. देशपांडे या नावाचे माझे एक मित्र आहेत, ते असे जातीय उतारे भाषांतरित करीत असतात. त्यांच्या निदर्शनाला मी आणून दिल्यानंतर, त्यांनी, अन्सारी म्हणतात तसे निधर्मी राष्ट्रवादी लेख भाषांतरित करायला सुरुवात केली. आजपावेतो त्यांनी १३ लेख भाषांतरित केले आहेत. ”

थत्ते सांगतात, “ सर्वसाधारणपणे वृत्तपत्रे काय घडले ते बातमीच्या स्वरूपांत सांगतात. उदा. सध्या जनसंघाचे अधिवेशन चालू आहे त्याची बातमी प्रसिद्ध केली

म्हणजे ते पत्र जनसंघाचे ठरत नाही."

प्रा. रा. भि. जोशी : 'साधना' द्वारा महाराष्ट्रीयन लोकांना शिकविण्याचे काम थत्ते करीत आहेतच. त्यांनी या बाबतीतही पुढाकार घ्यावा. उर्दू पत्रांची संख्या किती आहे, त्यांचा खप काय आहे, हे महत्त्वाचे नाही. अगदी एक उर्दू वृत्तपत्रसुद्धा फार मोठे कार्य करू शकेल. आपण सर्वांनीच मिशनरी वृत्तीने काम केले पाहिजे."

धार्मिक शिक्षणाला स्थान असू नये असा मुद्दा निघाला. कुरुंदकरांनी एक नमुना सांगितला. चौथा इयत्तेच्या उर्दू पुस्तकात (म. प्र. मधील शाळेत हे पुस्तक आहे.) एक कथा आहे, या स्वरूपाची : ये राधा की गाय है। राधा ब्राह्मण की लडकी है। राधा और गाय कृष्ण को चाहती है। चलो हम सब भगवान कृष्णजी की पूजा करें।

श्रीपाद जोशी यांनी आपला अनुभव सांगितला. त्यांनी अब्दुल गफारखानांवर एक धडा लिहिला. मराठी, उर्दू, हिंदी या तिन्ही भाषेंतून. त्यापैकी हिंदी सिलेक्शन कमिटीने तो स्वीकारला, उर्दूवाल्यांनी मात्र परत पाठवला. मराठीचा निर्णय अजून कळलेला नाही.

## बुद्धीवादी नेत्यांचा अभाव

दुसरा निबंध औरंगाबादच्या शासकीय महाविद्यालयाचे प्रा. मोईन शाकिर यांचा. निबंध बराच मोठा दिसतो. पण त्यांनी थोडक्यात विवरण केले. त्यांचे म्हणणे, "स्वातंत्र्यानंतर २० वर्षे उलटली तरी जातीय सलोखा नाही, याचे प्रमुख कारण मुसलमान बुद्धिवादी नेत्यांचा अभाव. फाळणीपूर्वी मौलाना आझाद आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तिला विरोध केला होता. त्या घटनेचे दुष्परिणाम काय होतील, हे त्यांना पूर्णत: माहीत होते. हा एक लहानसा गट सोडला तर बहुसंख्य मुसलमान नेते आजही फुटीर प्रवृत्तीला उत्तेजन देत आहेत...डॉ. संपूर्णानंद यांच्यासारखे लोक इतर सर्व धर्मीयांना हिंदू धर्म, संस्कृती यांच्यांत सामावून जायला सांगतात, पण ते मुसलमानांना मान्य होणे कधीच शक्य नसल्याने, या समाजाने जातीय द्वेष विसरून एकसंध राष्ट्रनिर्मितीसाठी इतरांनी हातभार लावला पाहिजे."

डॉ. पठाण अध्यक्षांना दहा मिनिटे बोलण्याची परवानगी मागतात. परवानगीची गरज काय ? सर्वांनाच आपले विचार मांडायला हवे आहेत.

"सर्वसामान्यपणे मुसलमान म्हटला म्हणजे धर्मवेडा, दुराग्रही, राष्ट्रद्रोही असे चित्र उभे केले जाते. पण सगळेच तसे नाहीत, हे मी त्या समाजातील प्रतिनिधी म्हणून सांगतो. असा एक लहानसा गट असेल, परंतु तो काही प्रातिनिधिक नाही. हा गट गाजावाजा करतो इतकेच. कुटुंब-नियोजनासारख्या राष्ट्रहिताच्या गोष्टीला मुस्लिमांचा विरोध आहे, असे सांगण्यात येते. सुरुवातीला असेलही, पण डॉक्टर असल्याने माझा अनुभव सांगतो. आज बहुसंख्य मुसलमान स्वत:हून संततिनियमनासाठी पुढे येत आहे. चार बायका, जास्त संतती ह्या गोष्टी त्यांना परवडणे शक्यच नाही. मूठभर स्वार्थी लोक संपूर्ण जातीला बदनाम करीत असतात. कुराणा-

वर श्रद्धा म्हणजे काय ? कितीसे लोक रोज पाच वेळा नमाज पढतात ? ह्याजला किती लोकांना जाणे शक्य असते ?"

'उर्दू प्रेस'विषयी प्रा. अन्सारींची तक्रार रास्त आहे. औरंगाबादला दंगली झाल्या त्या मुख्यत्वे गैरसमजावर होत्या. मराठी पत्रांनी भडक प्रसिद्धी दिल्यामुळे फार वाईट परिणाम झाला. दोन्ही जमातींतील अराष्ट्रीय प्रवृत्तींवर कडाडून हल्ला झाला पाहिजे. आमच्या जमातीचे दुःख एवढेच आहे की, आमच्यात आगरकर, फुले व्हायचे आहेत. आजच्या सुशिक्षित मुसलमान तरुणांना हित आणि अहित काय आहे, ते कळून चुकले आहे. त्यांच्या राष्ट्रीयत्वाला आव्हान देऊन त्यांच्या भावनांची खच्ची करू नये. प्रतिगामी शक्तीला सर्वांनीच विरोध केला पाहिजे. आर्थिक सुधारणा ही महत्त्वाची गोष्ट आहे. परभणीच्या एका मुसलमान घराण्याची हकीकत या दृष्टीने डोळे उघडविणारी ठरावी. या घराच्या तीन पिढ्या रिक्शा ओढत आहेत. सध्याच्या रिक्षावाल्याचे वडील आणि आजोबा रिक्शा ओढून ओढून दमेकरी झाले आणि त्यात मृत्यू पावले. आजचा रिक्षावालासुद्धा दम्याने बेजार आहे.

आज खूप तरुण समान नागरी कायद्याला अनुकूल होत आहेत. बहुपत्नीत्वाच्या कायद्यामुळे, सोप्या घटस्फोटपद्धतीमुळे समाजाचे अहित आहे, हे त्यांना उमजले आहे.

दहा मिनिटांच्या छोट्या वेळेत हे गृहस्थ फारच काही सांगून गेले.

राजकारणामध्ये धर्माचा प्रभाव असता कामा नये असे नेहमी म्हणतात. परंतु समाजप्रबोधन पत्रिकेचे श्री. वसंत पळशीकर यांनी अगदी पाश्चात्य राजकारणातसुद्धा तीन शतके उलटून गेली तरी धर्माचा प्रभाव आहे, असे सांगितले.

आता तिसरा निबंध 'साधना'चे संपादक श्री. यदुनाथ थत्तेंचा. त्यांचा निबंधसुद्धा अगदी मुद्देसूद. ते सांगत होते, "बदलत्या काळानुसार धर्मग्रंथाचे अर्थ लावले पाहिजेत. सर्व धर्मीयांना एकाच निधर्मी कायद्याखाली राहावे लागेल. नवीन परिस्थितीत निर्माण होणारे प्रश्न संपूर्णतः आधुनिक, विज्ञाननिष्ठ भूमिकेतून सोडविले पाहिजेत. 'मुसलमान असण्या'बद्दल खास हक्क, सवलती, अधिकार मागण्यात येऊ नयेत. सर्वांना सारखेच हक्क, सवलती आणि अधिकार उपभोगता येतील. मुसलमान स्त्रियांना अन्य धर्मीय स्त्रियांप्रमाणेच समान हक्क मिळायला हवेत. एकपत्नीत्वाचा कायदा, घटस्फोटावर बंधने, मुसलमान बालकांना पूर्वप्राथमिक शिक्षण यांसारख्या गोष्टी, त्या समाजाच्या हिताच्या असल्याने, त्यांनी त्यांबद्दल प्रयत्न करणे आवश्यक ठरते."

एक उर्दू कवी श्री. नवाज यांनीही आपले म्हणणे प्रभावीपणे मांडले. "प्रत्येक मुस्लिम जमाते इस्लामीचा अनुयायी वा सभासद असतो, असे मानू नये. संपूर्ण भारतात या संघटनेला फक्त १७५० सभासद आहेत. औरंगाबादमध्ये तर फक्त दोनच आहेत. यावरून इतरांच्या मनातला गैरसमज दूर व्हावा. दोन्ही धर्मांचे लोक

निरनिराळ्या निमित्ताने एकत्र यायला लागले आहेत, आशा धरायला अजिबात प्रत्यवाय नाही."

परिसंवादामध्ये दोन्ही समाजांचे लोक रस घेत आहेत, पण दुपारचे १२–३० वाजले. भरपूर विचारमंथन झाले आहे. 'आता उपस्थितांनी जेवणासाठी इथेच थांबावे' अशी विनंती प्रा. अन्सारी करीत आहेत.

खरे म्हणजे सगळ्यांत उत्तम हाच कार्यक्रम. वैचारिक मंथनामुळे रिकाम्या झालेल्या पोटात आता काहीतरी सब्स्टेन्शियल् हवेच नाहीतरी.

जेवणाची तयारी चालू आहे. जेवणाचा बेत शिऱ्याचा.

जेवण आटोपले. गप्पा सुरू झाल्या. टोळक्या टोळक्याने.

मुसलमानांचा घटस्फोटाचा कायदा सुधारला तरी बरीचशी क्रान्ती होईल, लग्नासंबंधी बंधने घातली पाहिजेत, यावर एक गट चर्चा करतो आहे. रेक्टर पारिख खूप रस घेऊन बोलत आहेत, "आपला 'तसा' काही विचार नसल्या "चे सांगून श्रोत्यांमध्ये खसखस पिकवीत आहेत.


तिसरे अधिवेशन. दुपारचे २–३० वाजले आहेत. आता निबंध उरला फक्त श्री. श्रीपाद जोशींचा. "उर्दू भाषेचा ऱ्हास होत आहे अशी ओरड हेतुपुरस्सर मुस्लिम नेते करीत असतात. वस्तुतः फाळणीनंतर बहुसंख्य उर्दू भाषिक समाज पाकिस्तानात गेल्यानंतरसुद्धा उर्दू भाषेचे अध्ययन करण्याच्या सोयी आहेत. इंग्रजीच्या खालोखाल उर्दू साहित्य भारताच्या बाहेर पाठविण्याइतपत परिस्थिती आहे. असे असले तरी बहुसंख्य मुसलमानांची भाषा उर्दू नसून ते ज्या प्रदेशात राहतात त्या प्रदेशाची भाषा ते बोलत असतात. उर्दूतून शिक्षण घेतल्यानंतर त्या प्रदेशात नोकरी मिळेलच अशी शाश्वती नसते, तेव्हा उर्दू ही एक भाषा म्हणून तिचे अध्ययन मुसलमानांनी जरूर करावे. पण शिक्षणाचे माध्यम मात्र प्रादेशिक भाषाच ठेवावी; कारण त्यामुळे पुढे आर्थिक व सामाजिक प्रश्न सुटून एकात्मतेला मदत होणार आहे."

प्रा. रा. भि. जोशी एक शिक्षणतज्ज्ञ या नात्याने अनुमोदन देतात.

शेवटी प्रा. अ. मि. शहा बोलतात. ठराव तयार होतात.

समान नागरी कायद्याला अनुकूल मत तयार करण्यासाठी दोन्ही समाजांत जागृती करावी. उर्दू पत्रे व नेते यांच्या जातीय आणि विरोधी प्रचाराविरुद्ध आघाडी उभारावी, राष्ट्रवादी हिंदु-मुसलमान तरुणांची संघटना तयार करावी, उर्दू शिक्षणासंबंधी मुसलमानांना योग्य मार्गदर्शन करावे.

दोन दिवसांचा हा उत्साही कार्यक्रम संपला. आमच्यात राष्ट्रवादी विचारसरणीचा, पुरोगामी मनोवृत्तीचा एक, लहानसा का होईना, तरुणांचा गट आहे, याची जाणीव मुसलमान तरुणांनीच करून दिली, हा या परिसंवादाचा आशादायी निष्कर्ष. O



# क्रीएशन्स इन वुड

## एक वेगळे प्रदर्शन

पुष्पा भावे

गेल्या काही वर्षांत कला आणि कारागिरी या दोन्ही क्षेत्रांत लाकूड, वाळू, माती ही जुनीच माध्यमे नव्या दृष्टिकोणातून वापरण्याचे अनेक प्रयत्न झाले–चालू आहेत. या प्रयत्नांमागे एक केवलाभ्यासी ( अॅकेडेमिक ) वृत्ती स्पष्ट असते. या वृत्तीमुळे कला अधिक गहन झाली असली तरी सजावटीच्या विविधांगी क्षेत्राचा विचार करता कलाप्रवृत्तींचा गाढ संस्कार सजावटीच्या नवकल्पनांवर झालेला दिसतो. विशेषत:, आजच्या कामगिरीमध्येही आकार–रेषांना आलेले महत्त्व पाहिले की हा संस्कार चटकन जाणवतो.

प्राकृतिक माध्यमावर अवलंबून असलेले एक साधेसुधे कला-प्रदर्शन एका गृहिणीने मुंबईतील आपल्या घरी मांडले होते. ते पाहत असताना शुद्ध कलेचे सजावट-कल्पनांवर झालेले हितकारक संस्कार चटकन जाणवले. सौ. मित्सु कोठारी यांनी ‘ क्रीएशन्स इन वुड ’ या सरळ नावाने आपल्या पन्नाससाठ काष्ठ-कलाकृतींचे एक अनौपचारिक प्रदर्शन भरवले होते. हे प्रदर्शन काष्ठशिल्पांचे नव्हते; यात केवळ झाडाच्या फांद्या, वांडगुळे, बुरशी, झाडाच्या खोडाला बिलगून वाढणारी काष्ठफुले,

पारिजातकाच्या सुकलेल्या बियांच्या फांद्या, माडा-पोफळीच्या माळा, सुकलेले गवत यांनी साधलेल्या काष्ठाकृती होत्या. केवळ वक्र व सरळ रेषांनी साधलेले एकसंध आकार आणि तपकिरी व काळा या दोनच रंगांच्या विविध छटांचे संयोजन यांत दिसत होते. भिंतींचे कोपरे सजवण्यासाठी, दारात तोरणाप्रमाणे टांगण्यासाठी, पुष्परचनेऐवजी टेबलावर ठेवण्यासाठी या कृतींची निर्मिती झाली असली तरी झाडफांद्या-गवतकाटक्यांच्या माध्यमाची एक विलक्षण जाण या कलाकृतींतून जाणवत होती. या कृती पाहताना ' इकेबाना 'ची (जपानी पुष्परचनापद्धतीची) स्मृती चटकन होत होती. तरी जपानी पुष्परचनेच्या आंधळ्या अनुकरणातून या काष्ठाकृती निर्माण झालेल्या नाहीत हेही चाणाक्ष रसिकाला खचित जाणवत होते.

सौ. मित्सु कोठारी यांचे नाव जपानी भासत असले तरी त्या भारतीयच आहेत. कलेचे वा कारागिरीचे तांत्रिक शिक्षणही त्यांना लाभलेले नाही. परंतु त्यांचे माहेर आहे मुंबईजवळ माथेरानला. त्यामुळे तेथे त्यांचे अनेकदा जाणे होते; पण तसे पाहिले तर पुण्या-मुंबईची अनेक सुखवस्तू माणसे ' सीझन 'मध्ये माथेरान–महाबळेश्वरला जातात आणि येताना सहजप्राप्त भडक, रंगीत गवत आणून घरातील सापडेल त्या पुष्पपात्रात खोचून ठेवतात. पण सौ. कोठारींचे व्यक्तिमत्त्व या सीझनवाल्या मंडळींपेक्षा वेगळे आहे. त्या पाऊलवाटांनी जात निसर्गनिर्मित काष्ठाकृतींचा साक्षेपाने शोध घेतात. हे पाऊलवाटेचे वेड त्यांचे वडील श्री. कापडिया हे माथेरानच्या जंगलात सापडणाऱ्या फांद्या-खोडांतून ' झू इन वुड ' करण्यात दंग असतात. या छंदासाठी त्यांनी जमवलेल्या प्राकृतिक नवलचित्रांतूनच सौ. कोठारी यांना प्रथमतः स्फूर्ती झाली. मग यथाकाल, झाडांच्या खाली पडणाऱ्या फांद्या, काटक्या, वांडगुळे, सुकलेले गवत यांच्यातील स्वतंत्र आकारसौंदर्य वा आकारसौंदर्याला पूरक ठरणारी त्यांची क्षमता ओळखून ते पदार्थ गोळा करून त्यांच्या चतुर संयोजनातून या कलाकृती त्यांनी निर्माण केल्या. प्राप्त साहित्याच्या निसर्गनिर्मित सौंदर्यावर कमीत कमी संस्कार करून आणि परके माध्यम शक्यतो टाळून या काष्ठाकृती सिद्ध झाल्या आहेत. ज्या ठिकाणी रचना उभी राहण्यासाठी झाडाच्या खोडाचा भाग मिळाला नाही तेथे फक्त माठ वा माठाचा काठ वापरला आहे.

त्यांच्याशी बोलताना मी त्यांना सहज विचारले, " तुम्हांला हवा असलेला भाग झाडापासून अलग करायला तुम्ही कोणती आयुधं वापरता ? " " छे छे " त्या दचकून म्हणाल्या, " मी झाडाला कधी हातसुद्धा लावत नाही. जे झाडाखाली सापडेल तेवढेच घेते. झाडं ओरबाडणं पटतच नाही मला. "...वृक्षमैत्रीची इतकी सहज जाण अलीकडे क्वचितच आढळते. त्यामुळेच प्रथमतः मुंबईच्या ' वृक्षमित्र मंडळा 'च्या प्रदर्शनातच त्यांच्या संग्रहाचे दर्शन रसिकांना घडवण्यात आले होते. परंतु त्या वेळी त्या संग्रहाचे स्वरूप कलापूर्ण नव्हते. पण स्वगृही मांडलेल्या नेटक्या

[ पान ५७ पाहा ]

# झुंड

८ सप्टेंबर १९६२ ला खरे म्हणजे मी रजेवर होतो. माझी रजा मंजूर झाली होती. वाटेत मी तेझपूरला उतरलो होतो. चौथ्या डिव्हिजनचा जनरल ऑफिसर कमांडिंग (GOC 4) आणि मी; आम्ही दोघांनी—त्या दिवशीची सकाळ मिसमारी येथे १/९ गुरखाज या आपल्या तुकडीतल्या जवानांबरोबर मजेत वातचीत करण्यात घालवली. हे जवानदेखील खुशीत होते; कारण तेदेखील रजेवरच जात होते. पंजाबमधल्या योल या ठिकाणी जाण्यासाठी ते गाडीत चढण्याच्या बेतात होते. नेफा आघाडीवर सतत ३ वर्षे काम करून ते अगदी दमून गेले होते.

जनरल निरंजन प्रसाद यांनी या जवानांचे, त्यांनी तावांगमध्ये केलेल्या अत्युत्कृष्ट कामगिरीबद्दल आभार मानले. त्यांचा काटकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि उत्साह यांची जनरल निरंजन प्रसाद यांनी स्तुती केली. आघाडीवर चौक्या बांधत असताना कधी कधी त्यांचा चिनी सैनिकांशी आकस्मिक सामना होत असे आणि तरीदेखील डगमगून न जाता या जवानांनी आपले कर्तव्य पार पाडले होते. चिन्यांचा परिहार केला होता. जनरल निरंजन प्रसाद आपल्या या भाषणात पुढे म्हणाले की, "तुम्ही सर्वजण आता रजेवर जात आहात. सुटीचा योग्य उपभोग घ्या. आता दसरा जवळ आलाय. दसऱ्याचा सण नेहमीप्रमाणे उत्साहाने साजरा करा." तीन वर्षांनंतर प्रथमच

लेखक
**ब्रिगेडिअर**
**जे. पी. दळवी**

अनुवाद
**ॲडव्होकेट**
**माधव कानिटकर**

**लेखांक**
**बारावा**

हे जवान आपल्या बायकामुलांना भेटणार होते. त्यांच्या संगतीत कौटुंबिक सुखाचा आनंद उपभोगणार होते.

दुपारी चमचमीत जेवण झाल्यानंतर मी या आनंदात असलेल्या जवानांचा निरोप घेतला. मनुष्य आनंदाच्या शिखरावर असतानाच दारुण दुःख एक एक पाऊल पुढे येत असते. त्या आनंदी आणि उत्साही जवानांना पाहत असताना मला कल्पनाही नव्हती की, लवकरच या जवानांची आणि आपली आघाडीवर लढाईच्या वातावरणात भेट होणार आहे. दैवाचे खेळ असे की, योलला जाण्यापूर्वीच त्यांना थाग-ला रीज प्रदेशात लढाईसाठी जावे लागले. त्यांच्या हातातोंडाशी आलेला सुखाचा घास चिन्यांनी अकस्मात हिसकावून घेतला.

ब्रिगेडिअर डी. के. पलित हे त्या वेळी DMO (Director of Military Operations) होते. ब्रिगेडिअर पलितनी या जवानांना आश्वासन दिले होते की, आता काही काळ तरी तुम्हांला आराम आहे. तुम्हांला रजा संपेपर्यंत तरी आघाडीवर जावे लागणार नाही. योलला गेल्यानंतर दसरा मोठ्या प्रमाणावर साजरा करा. जमल्यास मी पण तुमच्या आनंदात सहभागी होण्यासाठी योलला येईन आणि अचानक या जवानांना कळविण्यात आले की, तुमची रजा रद्द केलेली आहे. लढाईसाठी आघाडीवर तावडतोब रुजू व्हा ! आपल्या कुटुंबापासून सतत तीन वर्षे लांब राहून बघा तरच तुम्हांला या

जवानांचा किती हिरमोड झाला, त्यांची कशी हिंमत खचली, याची कल्पना येईल. दुपारी GOC ने मला तेझपूर येथे नवीनच बांधलेल्या मैदानावर गोल्फ खेळण्याचा आग्रह केला. त्यानंतर मला सिनेमाला घेऊन जाण्याचा त्यांचा बेत होता, पण माझे विमान दुसऱ्या दिवशी पहाटे सुटणार होते. म्हणून सिनेमाला जाण्यास सविनय नकार दिला आणि विमानतळाजवळच्या माझ्या राहुटीत परत आलो.

मला आठवतंय संध्याकाळचे ठीक ६।। झाले होते. अचानक माझ्या राहुटीतील टेलिफोनची घंटा खणखणली. टेलिफोन ! टेलिफोन ! टेलिफोन ! मी तर वैतागेलो होतो. जरा कुठे छावणीत येऊन आराम करायचा बेत करावा की, आलाच कुणाचा तरी टेलिफोन. एकदा वाटले, हा फोन घेऊच नये. वाजूदे घंटा किती वेळ वाजते ती. फोन करणारा खूप प्रयत्न करील शेवटी एंगेज आहे किंवा लागत नाही म्हणून नाद सोडून देईल. पण का कोण जाणे ! कुठल्या तरी आंतरिक प्रेरणेने मला इशारा दिला की, हा फोन सोडू नकोस. कदाचित महत्त्वाचाही असेल. कारण खरे म्हणजे आज दुपारपासून मी रजेवर होतो. मी कुठे आहे ते फारच थोडया लोकांना ठाऊक होते. तसे काही विशेष घडल्याशिवाय माझ्याशी संपर्क साधण्याचा भगीरथ प्रयत्न सहसा कोणी उगाचच केला नसता. DAA & QMG (Deputy Assistant Adjutant and Quarter Master General) मेजर बी. परेरा तावांगमधून बोलत होते. त्यांच्याकडून आलेला हा संदेश अभद्र होता. घाईघाईत ते सांगत होते, " धोला या आपल्या चौकीवरच्या पोस्ट कमांडरकडून संदेश मिळालाय की, सुमारे ६०० चिनी सैनिकांनी आज सकाळी ८ वाजता थाग-ला रीज प्रदेशातून आत घुसून धोलापर्यंत मुसंडी मारली आहे. आपल्या जवानांना अन्न वेळेवर मिळू नये म्हणून वाटेतला एक महत्त्वाचा पूल चिन्यांनी उद्ध्वस्त करून टाकला आहे आणि आता आपल्या जवानांचे पाणीदेखील तोडण्याच्या विचारात ते आहेत. पोस्ट कमांडरला मदतीची अत्यंत आवश्यकता आहे. "

चिन्यांनी हल्ला केला होता सकाळी आठ वाजता. DAA आणि QMG ला ती बातमी कळली होती दुपारी अडीच वाजता आणि माझ्यापर्यंत ती बातमी आली होती संध्याकाळी साडेसहा वाजता. मला उत्सुकता होती की, चिनी नेहमीप्रमाणे आत येऊन नासधूस करून परत गेलेत की अजून तिथेच आहेत ? पण ती वेळ चौकशा करीत बसण्याची नव्हती. मी ब्रिगेडिअर परेरांना ताबडतोब हुकूम दिला की, " लुमला येथील आसाम रायफल्स या तुकडीला आणि लुंपू येथील आसाम रायफल्स पोस्टला तयार राहायला सांगा. कुठल्याही क्षणी त्यांची मदत लागेल. कारण, लुमला आणि लुंपू ही आपली ठिकाणे धोलापासून अवघ्या दोन दिवसांच्या वाटचालीच्या अंतरावर आहेत. मी स्वत: ताबडतोब तावांगमध्ये येण्यासाठी निघतो. बहुधा उद्या सकाळपर्यंत मी तावांगमध्ये येऊन पोचू शकेन."

आपल्या फॉरवर्ड पॉलिसीचा फज्जा उडायला सुरुवात झाली होती तर. केमांग फ्रांटियर डिव्हिजनवर माझ्या हाताखाली असलेल्या तथाकथित 'फौजे'ला ६०० या जबरदस्त संख्येने आत आलेल्या चिन्यांना तोंड देणे शक्यच नव्हते. ही बातमी ऐकल्याबरोबर माझी धांदल उडाली. घाईघाईने मी GSO II यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. ही बातमी GOC ला कळवण्यासाठी टाकोटाक एक जासूद पाठवला. कारण GSO II कडेच आघाडीवरच्या प्रदेशाची स्पष्ट माहिती देणारे गुप्त नकाशे असतात. सरतेशेवटी GSO II पावणेनऊ वाजता आले तर GOC रात्रौ नऊ वाजता भेटू शकले. ८ सप्टेंबर १९६२ हा शनिवारचा दिवस होता. शनिवार हा एरव्ही न कर्त्याचा वार असला तरी युद्धशास्त्रात तो कर्त्याचा वार आहे. कारण ब्रिटिशांकडून आपण ज्या ज्या गोष्टींचा वारसा घेतला त्यांत वीक-एण्डला मजा करणे हीही एक गोष्ट आहे. अमेरिकन्स पण तसेच. आणि म्हणूनच जपान्यांनी पर्ल हार्बरवर हल्ला केला, तो रविवारी सकाळी. जपान्यांना ठाऊक होते की कालची रात्र म्हणजे शनिवारची रात्र. अमेरिकन सैनिक वीक-एण्डची मजा मारण्यासाठी जरा जास्तीची दारू घेतील. आणि रविवारी सकाळी चर्चमध्ये प्रार्थनेसाठी जातील. रविवारी सकाळी त्यांची 'उतरलेली'देखील नसेल अशा स्थितीत ते लढणार काय ? चिन्यांनी थाग-ला रीज प्रदेशात भडका उडवून देण्यासाठी शनिवार निवडला तो यासाठी. त्यांना ठाऊक होते की, चिनी आत घुसले ही बातमी 'दिल्ली'ला कळेल ती शनिवारी रात्री किंवा रविवारी सकाळी. चिन्यांना हेही ठाऊक असावे की, भारतीय लष्कराच्या आघाडीवरच्या कमांडरला प्राप्त परिस्थितीत स्वयंस्फूर्त निर्णय घेऊन हुकूम देण्याचा अधिकार नाही. भारत सरकारकडून येणाऱ्या पुढच्या हुकमाची तो वाट बघत बसेल आणि आता पुढे काय करायचे याचा हुकूम दिल्लीहून आघाडीवर येईपर्यंत सोमवारची सकाळ उजाडेल. सतत ४८ तास विनविरोध आपण भारतीय प्रदेशात मनचाहे धुमाकूळ घालू शकतो. लष्करी निर्णय राजकीय व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असू नये, असे मी म्हणतो ते यासाठी.

याच संदर्भात भारतीय लष्करातली त्या वेळची अवघड आणि कंटाळवाणी कार्यपद्धती तपासून पाहणे आवश्यक आहे; कारण नेफामध्ये आपला धुव्वा उडायला ही पद्धतदेखील कारणीभूत ठरली. जाता जाता वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांची मनोवृत्ती या किचकट कार्यपद्धतीमुळे कशी बनली होती, हे पाहणेही योग्य ठरेल.

थाग-लामध्ये ज्या ठिकाणी चिनी घुसले होते त्या ठिकाणापासून पाच दिवसांच्या वाटचालीच्या अंतरावर तावांगमध्ये माझी ब्रिगेड Hq. होती. तिथून तेझपूर येथे सुमारे २०० मैल अंतरावर डिव्हिजन होती. तेझपूरमध्ये अनेक क्लब्स आहेत, सिनेमागृहे आहेत आणि त्यामुळे तिथले एकूण जीवन शांततेचे आहे. त्या

वेळी तेझपूरमध्ये लढाईचे असे वातावरण नव्हतेच. तिथून पुढे २०० मैलांवर शिलाँग येथे कोअर हेडक्वार्टर होती. शिलाँग हे भारतातले एक प्रसिद्ध हिल स्टेशन आहे. लोक तिथे जातात ते माथेरानला किंवा महाबळेश्वरला जावे त्या मूडमध्ये. युद्धाचे असे वातावरण खुद्द शिलाँगमध्येदेखील नव्हते. तिथले वातावरण नितांत रम्य, शांत आणि विहंगम नैसर्गिक दृश्यांनी नटलेले. शिलाँगपासून ६०० मैलांवर लखनौ येथे आपली कमांड हेडक्वार्टर होती तर आर्मी हेडक्वार्टर आणि सरकार होते दिल्लीत ! आणि दिल्ली म्हणजे राजकारण. दिल्ली म्हणजे शांतता. दिल्ली म्हणजे प्रेक्षणीय स्थळे असलेले शहर. साहजिकच शिलाँग, लखनौ आणि दिल्ली इथले लष्करी अधिकारी सुखासीन आणि शांत मनोवृत्तीचे बनले होते. लष्करात काही वर्षे कष्ट सोसलेली ही माणसे होती. त्यामुळे जरा आराम आणि करमणूक या गोष्टींवर त्यांचा हक्क होता. कुणी मेडिकल ग्राऊंडवर तर कुणी आणखी कसा. शिलाँग–लखनौ–दिल्लीमधला लष्करी अधिकारी दुपारी आपले नेमून दिलेले ऑफिसचे काम करून झाल्यावर बायका-मुलांच्यांत सुखाने जीवन जगत होता. शिलाँग–लखनौ–दिल्ली यांतले अंतर, तिथली एकूण शांतता याचा शत्रूला सुरुवातीलाच फायदा उठवता आला. असे होणे हे अपरिहार्य होते. कशाचा परिणाम होता हा ? भारत सरकारचा चीनच्या बाबतीतल्या अर्धवट धोरणाचा. धड नाही शांतता, धड नाही लढाई. Hq.मधला लष्करी अधिकारी हा त्याचे कुटुंब आणि मनाला मोह पाडणाऱ्या नाटक–सिनेमा–क्लब्स या गोष्टींपासून अलिप्त असला पाहिजे. निदान लढाई जवळ आलेली असताना तरी ! तरच तो अचूक हालचालींचे हुकूम देऊ शकेल. मजेच्या वेळेला मजा करायची असते आणि एरव्ही फक्त त्रास आणि कष्टच भोगायचे असतात तरच कुठलीही लढाई जिंकता येते.

आता पुन्हा मूळपदावर येऊ. रात्रौ ९ वा. आल्याबरोबर GOC ने तातडीची सभा घेतली. पुढे काय करायचे ? या बाबतीत GOC ने BGS कडे (Brigadier General staff) विचारणा केली. आणि BGS ने सल्ला दिला की, कुठल्याही परिस्थितीत धोला पोस्ट चिन्यांच्या हाती जाता कामा नये. धोला येथे ताबडतोब मदत पाठवा आणि धोला संकटात येणार नाही, याची काळजी घ्या. काही वेळ चर्चा झाल्यानंतर GOC ने काही प्राथमिक स्वरूपाचे हुकूम दिले. त्यांची रूपरेषा अशी होती :—

१. धोला पोस्टच्या कमांडरने धोला पोस्ट सोडून एक इंचदेखील मागे येऊ नये. शक्य असेल तितक्या लवकर त्याच्या मदतीसाठी आणखी कुमक पाठवली जाईल. धोला येथील चौकी सोडायची नाही, की ती चौकी तिथून हलवायचा विचारदेखील मनात आणायचा नाही. वेढा घातल्या गेलेल्या फौजेच्या तुकडीला मदत करण्यासाठी आसाम रायफल्स विंग ही तुकडी रवाना होईल.

२. पंजाबमधील शक्ती आणि लुंपू यथे असलेल्या तुकड्यांना धोला या ठिकाणी

रवाना होण्याचा हुकूम देण्यात येईल. तावांगमधील उर्वरीत फौजेच्या तुकडीने लुंपूकडे रवाना व्हावे आणि हुकूम मिळाल्यास धोलाकडे सरकण्याची तयारी ठेवावी.

३. माझी रजा रद्द करण्यात आली होती आणि मी ताबडतोब तावांगकडे रवाना होऊन तिथल्या हालचालींचा ' रिपोर्ट ' द्यावा, असा हुकूम मला मिळाला होता.

४. जे इतर लोक (जवान) रजेवर होते, त्यांची रजा रद्द केली गेली नव्हती. मात्र ' गावी ' जाण्यासाठी जे जवान मिसमारी येथे गाडीची वाट पाहत होते त्यांना पुढचा हुकूम मिळेपर्यंत तिथेच डांबून ठेवण्यात यावे. न जाणो कदाचित त्या सर्वांची रजा रद्द करून त्यांना आघाडीवर पाठवावे लागेल.

याच मिटिंगमध्ये मला ठाऊक असलेली तावांगबद्दलची महत्त्वाची माहिती मी GOC ना दिली आणि त्यांना पुन्हा पुन्हा सांगितले की, कोअर, कमांडर लेफ्टनंट जनरल उमरावसिंग यांना स्पष्ट इशारा द्या की, तावांगमधल्या तुकडया अचानक धोला इथे हलवणे याचा अर्थ तावांग या अत्यंत महत्त्वाच्या प्रदेशाला धोका निर्माण करण्यासारखे आहे. तावांगचे संरक्षण करणे हे ७ व्या पायदळ तुकडीचे सर्वप्रथम कर्तव्य आहे. मला एक काहीतरी निश्चित काम द्या. तुमच्या हुकमाप्रमाणे मी माझ्या तावांगमधल्या फौजा धोला इथे पाठवल्या तर कदाचित खुद्द तावांगच धोक्यात येईल. त्याचप्रमाणे थाग-ला प्रदेशात चिन्यांनी केलेले आक्रमण हा क्षुल्लक प्रकार समजण्यात येऊ नये. मी GOC ना आठवण करून दिली की, वादग्रस्त टापूत चौक्या उभारायला आपण आतापर्यंत नेहमीच नाखूष होतो आणि GOC नी स्वतःच या बाबतीत कोअर Hq. कडे तीव्र नापसंती व्यक्त केली होती. धोला ही चौकी अशीच एक होती. चिन्यांकडून मोठया प्रमाणात बोचक प्रतिक्रिया अपेक्षितच होती. मी GOC ना हेही सांगितले की, हल्ला करण्याच्या दृष्टीने परिस्थिती चिन्यांना अत्यंत अनुकूल आहे.

त्या दिवशी रात्री मी अंथरुणावर पडलो. पण मला झोप लागेना. मी आढयाकडे पाहत अंधारातच जागा होतो. पुढच्या अनर्थाची मला पूर्ण कल्पना आली होती. कुठून दुर्बुद्धी झाली आणि मिलिटरी सेक्रेटरी मोतीसागर यांच्या विनंतीवरून ७ व्या पायदळ तुकडीचा कमांडर झालो असे मला झाले. केमांगमधल्या अडचणी फार भयंकर होत्या आणि तो प्रदेश ज्यांनी पाहिलेला नव्हता ते मला हुकूम देणार होते ! दिल्लीत बसून टेबलावर नकाशा ठेवून ज्या प्रदेशाला दिल्लीपती फक्त पाव इंच समजत होते तो प्रदेश प्रत्यक्षात किती अवाढव्य आहे, तिथे काय काय अडचणी आहेत याची त्यांना काय कल्पना ? सगळयाच बाबतींत आपण थिटे पडणार होतो. चिन्यांच्या बाबतीत इथून पुढे काय निर्णय घ्यायचा हे ठरवण्यासाठी दिल्लीत झालेल्या अनेक सभांना मी उपस्थित होतो. आणि माझी अशी खात्री पटली होती की, लष्करीदृष्टया काय करायला पाहिजे याहीपेक्षा राजकीयदृष्टया काय करायला पाहिजे यालाच भारत सरकार जास्त महत्त्व देते. भारत

सरकारच्या अंतिम हुकमापुढे लष्करी अधिकारी काय बोलणार ? हुकूम कसाही का असेना, तो पाळणे हे लष्करी अधिकाऱ्यांचे कर्तव्य होते. 'चिन्यांना काहीही करून थोपवून धरा,' असा भारत सरकारचा हुकूम व्हायचीच खोटी, की चिन्यांना थोपवून धरण्यासाठी आम्ही पुढे जायचे. मग प्रत्यक्षात आम्ही चिन्यांना थोपवू शकू की नाही ? त्या कामात काय काय अडचणी येतील ? याचा विचारच भारत सरकार करीत नव्हते. हे मी आताच लिहितोय असे नव्हे. त्या वेळचे ब्रिगेड मेजर (BM) आणि आता ब्रिगेडिअर असलेले श्री. खरबंडा यांना मी त्याच वेळी पुढचे भाकित सांगून ठेवले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी म्हणजे ९ सप्टेंबरला पहाटे ५॥ वा. मी तेझपूर सोडले आणि हेलिकॉप्टरने तावांगकडे रवाना झालो. वाटेतच मला ब्रिगेड मेजर भेटले. त्यांना मी GOC बरोबर माझे काय बोलणे झाले ते सांगितले; आणि एकंदर पुढच्या कार्यक्रमाची रूपरेषा त्यांना समजावून सांगितली.

त्यानंतर मी ताबडतोब माझ्या तुकडीतल्या कमांडिंग ऑफिसर्सची भेट घेतली. लेफ्टनंट कर्नल बी. एन. मेहता आणि लेफ्टनंट कर्नल आर. एन. मिश्रा या दोघांची भेट घेतल्यानंतर माझ्या लक्षात आले की मी बराच सुदैवी आहे. कारण लेफ्टनंट कर्नल मिश्रांना थाग-ला आणि धोला या दोन्ही ठिकाणी प्रदेश कसा आहे ? कुठला रस्ता कुठे जातो ? कुठले ठिकाण किती अंतरावर आहे ? एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जायला अंदाजे किती वेळ लागतो याची चांगली माहिती होती.

त्यांच्याबरोबर झालेल्या महत्त्वाच्या चर्चेतले ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे होते.

**जमीन व मार्ग :**

१. थाग-ला रीज प्रदेशापर्यंत जाण्याच्या रस्त्याचा पहिला टप्पा नीमजंग चू व्हॅली (Nyamjang Chu Valley) ते लुंपू असा होता; तिथून पुढे १३,४०० फूट उंचीवर होती हाथुंग-ला-खिंड व शेवटचा टप्पा होता नामका-चू नदी हा. हे सर्व अंतर अंदाजे ६० मैलांचे होते. वाटेत कमीत कमी ४–५ ठिकाणी थांबावें लागणार होते आणि तरीदेखील उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून भराभर पावले उचलून आगेकूच करावी लागणार होती. वाटेत कुठेच न थांबता एकदम पिसाटासारखे पुढे जाण्यात शहाणपणा नव्हता. कारण, त्या वेळी मुसळधार पाऊस पडत होता आणि रस्ता तुडवीत जाणे याचा खरा अर्थ चिखल तुडवीत जाणे असा होता.

२. दुसरा रस्ता होता तो लुंपू–कारपोला खिंडीवरून. हा दुसरा मार्ग एका अर्थाने कठीण होता तर दुसऱ्या अर्थाने सुरक्षित होता. कारण, कारपोला खिंड होती १६,५०० फूट उंचीवर. मात्र या रस्त्यात वाटेत अचानक चिनी भेटण्याचा संभव नव्हता.

**अत्यंत महत्त्वाची स्थळे :**

१. सांगधर (Tsangdhar) आणि हाथुंग-ला ह्या दोन्ही ठिकाणांना विशेष

महत्त्व होते. कुठल्याही परिस्थितीत ही दोन ठिकाणे चिन्यांच्या हातात जाणार नाहीत, याची काळजी घ्यायला हवी होती. धोला हे ठिकाण एका अरुंद दरीत होते. त्यामुळे तिथल्या चौकीचा बचाव करता येणे शक्यच नव्हते. फार फार तर धोला या ठिकाणी आपला हक्क शाबीत करण्यासाठी तिरंगा फडकवता आला असता. अशा या फ्लॅग-पोस्टवर फार मनुष्यशक्ती खर्च करण्यात अर्थ नव्हता.

२. लुंपू-चौकसेन मार्ग बचावाच्या दृष्टीने योग्य होता. लुंपू काहीही करून आपल्या ताब्यात ठेवायलाच हवे होते. कारण नाम-का चूपर्यंत पुढे गेलेल्या जवानांना अन्न पुरवले जात होते ते लुंपू या ठिकाणी विमानातून टाकून.

३. शक्ती हे ठिकाण तर अत्यंत महत्त्वाचे होते. शक्ती चिन्यांच्या हातात जाऊ देणे म्हणजे चोराच्या हातात जामदारखान्याची किल्ली ठेवण्यासारखेच होते.

**रस्त्यांची अवस्था**

तावांग ते थाग-ला या रस्त्यात अनेक ठिकाणे अशी अरुंद होती की, एका वेळी एकच माणूस पुढे जाऊ शकला असता. जवानांचे सामान वाहून नेण्यासाठी हमाल मिळण्याचीही सोय नव्हती. सरकारी अधिकाऱ्यांशी या बाबतीत माझे बोलणे झाले. त्यावर अधिकाऱ्यांनी मला बोलून दाखवले की, " सध्या सुगीचा हंगाम चालू आहे. भारतीय सेनकरी हमाली करतो, पण ती त्याला शेती करता येणे अशक्य असते तेव्हाच. त्यांना हमाल म्हणून आत्ताच कामासाठी बोलावून त्यांच्या भावना दुखवण्यात अर्थ नाही. चिन्यांशी प्रत्यक्ष गोळागोळी सुरू होईपर्यंत—२४ सप्टेंबरपर्यंत—आम्हांला जड सामान वाहून नेण्यासाठी हमाल मिळाले नाहीत.

**तुलना**

१. बातम्या अशा येत होत्या की, धोला या ठिकाणी चिन्यांनी अंदाजे १२००



चिनी सैनिक घुसवले आहेत. ही बातमी आली होती ती JCO ( Junior Commissioned Officer) कडून. ' ज्युनियर ' आणि ' सिनीयर ' या शब्दांना अनुभवाच्या पाठबळाप्रमाणे काही निश्चित अर्थ आहेत. धोला या चौकीवरचा लष्करी अधिकारी ' ज्युनियर ' होता याचाच अर्थ अधिक लष्करी मदत मिळावी या हेतूने त्याने कदाचित् चिनी सैनिकांची संख्या फुगवून सांगितली असेल. काहीका असेना, एक गोष्ट मात्र निश्चित की, चिन्यांची एक बटालियन थाग-ला रिज प्रदेशात घुसली असली पाहिजे; आणि उर्वरित रेजिमेंट (आपली एक ब्रिगेड म्हणजे चिन्यांची एक रेजिमेंट) थाग—ला ते मारमांग या टापूत विखुरलेली होती.

२. आपल्या ७ व्या पायदळ तुकडीच्या २ बटालियन्स आघाडीवर पाठवल्या गेल्या होत्या. या दोन्ही बटालियन्सजवळ एकंदर ३५० ते ४०० संगिनी आणि एकच तोफखाना होता. तोफखाना पुढे हलवणार कसा ? तिथली घोडी तावांगच्या पुढे एक पाऊलदेखील चालायला तयार नव्हती. याचा अर्थ चिन्यांशी सामना देत असताना आपल्या जवानांजवळ तोफखाना असा नव्हताच. एवढेच नव्हे शस्त्रास्त्रांच्या ताकदीच्या हिशेबात बोलायचे तर ज्या वेळी आपल्या दोन बटालियन्स आघाडीवर आहेत असे आपण समजत होतो, तेव्हा प्रत्यक्षात सापेक्ष तुलना करता आपली फक्त एक बटालियन आघाडीवर होती.

३. ७ व्या पायदळ तुकडीचे पहिले काम हे होते की, सर्वप्रथम तावांगचे संरक्षण करा. कारण एकदा का चिनी तावांगमध्ये घुसले की, ते भारतात वेगाने घुसू शकतील. अशा स्थितीत तावांगमधले जवान थाग-ला प्रदेशात हलवणे म्हणजे तावांगमध्ये कसाही धुडगूस घालायला चिन्यांना संधी देण्यासारखेच होते. लढाईसुद्धा तालात आणि तोलात करायची असते. कमरेचे सोडून डोक्याला गुंडाळायचे याला लढाईत काहीही अर्थ नसतो. तावांगमधल्या ७ व्या पायदळ तुकडीतले जवान नाम-का चू प्रदेशात हलवणे म्हणजे तोल सांभाळता येत नसताना तारेवर कसरत करण्यासारखे होते. तशातच गेली कित्येक वर्षे आपले जवान ' आक्रमण ' हा शब्द विसरत चालले होते. त्यांच्या अंगवळणी पडला होता तो ' संरक्षण ' हा शब्द. जसे विचार तशी कृती ! आक्रमण आणि संरक्षण या दोन शब्दांत महदंतर आहे. लढाईत शत्रूच्या हद्दीत आक्रमण केल्याशिवाय आपल्या भूमीचे संरक्षण करता येत नाही.

४. त्सेला खिंडीच्या पूर्वेकडच्या प्रदेशाच्या संरक्षणासाठी खरे म्हणजे दुसरी कुठलीतरी पायदळ तुकडी आणायला हवी होती. फक्त ७ व्या पायदळ तुकडीचे जवान किती ठिकाणी धावतील ? त्याच वेळी मी असे सुचवले होते की, नागालँडमधली ११ वी पायदळ तुकडी या कामासाठी बोलवून घ्या. पण ऐकतो कोण ?

५. पायथ्यापासून तावांगपर्यंत जाण्यासाठी जो रस्ता होता तो पावसामुळे कित्येक ठिकाणी उद्ध्वस्त झाला होता. ताज्यातवान्या पायदळ तुकड्या नुसत्या तावांगपर्यंत न्यायला कमीत कमी १०–१२ दिवस लागले असते. तिथून पुढे आणखी

४–५ दिवस थाग–ला पर्यंत पोचायला लागले असते. तिथे पोचेपर्यंतच नवीन जवान थकून गेले असते. त्यांना तिथल्या हवामानाचा सराव होईपर्यंत, त्यांचा श्रमपरिहार होण्यापूर्वीच लढाईला पाठवण्यात धोका होता.

६. या उलट चिनी सैन्य थाग-लापासून अवघ्या काही मैलांवर ताजेतवाने होऊन उभे होते. प्रत्यक्ष रणक्षेत्रापासून अंतर आणि वेळ या दोन्ही गोष्टी चिन्यांना अत्यंत अनुकूल होत्या. आपला जवान 'बिचारा' आघाडीवर नुसता पोचेपर्यंतच थकून जात असे तर चिनी सैनिक उत्साहाने फक्त हुकमाची वाट पाहत होते.

७. अवजड तोफखाने आघाडीपर्यंत चिनी सहज आणू शकत होते. कारण दळण-वळणाच्या दृष्टीने त्यांचा रस्ता सरळ आणि सोपा होता, तर आपल्या रस्त्यात हजारो फूट उंचीचे चढउतार होते. खाण्या-पिण्याच्या वस्तूंपासून तो अवजड शस्त्रास्त्रां-पर्यंत प्रत्येक गोष्टीत आपण विमानांवर अवलंबून होतो. विमान आले तर ठीक, नाहीतर जवानांच्या हातात दारूगोळाच नाही ! चिन्यांनी समोरून तोफा डागल्याच तर आपला जवान जबाब देणार कसा ? तोफा आहेत कुठे ? विमान आलेले नाही !

**व्यवस्था**

१. पायदळ तुकड्या डोंगराळ आणि वर्फाच्या प्रदेशात पुढे पाठवण्यापूर्वी जवानांचे थंडीपासून संरक्षण करू शकतील असे कपडे, सर्व प्रकारची शस्त्रास्त्रे आणि भर-पूर अन्नाचे साठे अगोदर करून ठेवावे लागतात. या तिन्ही आवश्यक गोष्टी सोडूनच द्या. आपल्या जवानांजवळ पुरेसे वायरलेस सेटस्‌देखील नव्हते.

२. आघाडीवरचे लुंपू हे एकमेव ठिकाण असे होते की ज्या ठिकाणी विमानांतून रसद टाकणे सोयीचे होते. एअर फोर्सनी टेस्ट घेऊन पसंत केलेले असे तेच फक्त ठिकाण होते.

३. जड वस्तू वाहून नेण्यासाठी हमाल मिळवणे हाही एक किचकट प्रश्न होता. आपल्याकडे चिन्यांप्रमाणे लेबर–बटालियन नव्हती. कारण सरहद्दीवर हमालसुद्धा पुरवायचे तर त्यांनाच पोसायचे कसे, हा प्रश्न होता. जवानांना अन्न मिळायची मारामार तर हमालांना काय पोसणार ? दुष्काळात तेरावा महिना !

४. पुढे जून महिना येणार आहे. तावांगमधले हवामान खराब होईल. रेशन घेऊन येणारे विमान जवानांना अन्नपुरवठा करू शकेल, याची शाश्वती नाही. तावांगमधून थाग-लापर्यंत जायला निघालेल्या जवानांनी जगायचे कसे ? एकतर तावांगमध्ये अन्नाचे साठे करून ठेवायला हवेत आणि ते अन्न तावांगपासून पुढेपर्यंत नेऊन पोहोचवण्यापेक्षा आघाडीवरच्या लुमला या ठिकाणीच रसद टाकली गेली तर बरे. ही सूचना पुढे मान्य झाली आणि ते एक वरदानच ठरले.

**हवामान**

१. सैन्याची जमवाजमव आणि लढाईची तयारी या दृष्टीने हवामानदेखील प्रतिकूल होते. पाऊस मुसळधार पडत होता. सतत पडत होता. जवानांची पुढे

जाण्याची गती त्यामुळे अगदीच मंद होती. पुढे जाणेच शक्य नव्हते. कारण वाटेत उभे कडे, खोल दऱ्या आणि निसरडे रस्ते.

२. अशा पावसात वाटेत कुठे जवानांनी जरा थांबावे तर तीही सोय नव्हती. भर पावसात आपले जवान उघड्यावरच तळ देऊन बसून राहत. अंगावर रेन-कोट्स नाहीत, की थंडी वाजते म्हणून गरम कपडा नाही. जवानांच्या तब्येतीच धोक्यात आल्या होत्या. प्रत्यक्ष लढाईपूर्वीच आपल्या जवानांना फार उंचीवर पावसात भिजल्यामुळे फुफ्फुसांचे रोग होण्याची शक्यता होती. पुन्हा कुणाला आजाराने गाठलेच तर त्याला त्वरित हलवायची सोय नव्हती. प्रतिकूल हवामान जवानांची ताकद खच्ची करून टाकत होते.

तुम्हांला वाचून आश्चर्य वाटेल, पण भारतीय माणसांइतकी भावनाप्रधान माणसे जगाच्या पाठीवर कुठे नसतील. आणीबाणीच्या प्रसंगी भावनेच्या आहारी जाणे हे आपले खास वैशिष्ट्य. चिन्यांनी आक्रमण केल्याची बातमी कळली मात्र, भारतीय जनता एकदम 'जिंकू किंवा मरू !' या अवस्थेला गेली. शत्रूच्या आक्र-मणामुळे राग येणे मी समजू शकतो; पण आपण रागावलो आहोत हेदेखील न दाखवता जो विचाराने पावले टाकतो त्याचा राग शत्रूला भारी पडतो. भारतीय जनता कितीही क्रुद्ध झाली असती तरी ती पाऊस थांबवू शकत नव्हती. पर्वत-राजींतल्या धोकेबाज दऱ्यांतून जवानांना पुढे जाण्यासाठी रस्ता करून देऊ शकत नव्हती. लढाईतल्या हालचाली या नेहमीच विचारपूर्वक, थंड डोक्याने आणि सावधपणे करायच्या असतात. नुसता आरडाओरडा, घोषणा, मोर्चा यांचा काहीही फायदा नसतो. ब्रिटिश आणि अमेरिकन लोकांपासून याबाबतीत आपल्याला खूप शिकण्यासारखे आहे. ६२ साली हा आपला दुर्गुण आपल्याला नडला. चिनी आत घुसले. जनता खवळली. 'चिन्यांना हुसकून द्या'... 'जिंकू किंवा मरू'... 'इंच इंच लढवू ऽऽ' असा गहजब सुरू झाला... भारत सरकारनेदेखील शांतपणे विचार करायचे सोडून घाईघाईत हुकूम दिला की 'चिन्यांना हुसकून द्या...!' भोगावे लागले आम्हा लष्करी अधिकाऱ्यांना.

त्याच दिवशी ९/ पंजाब ही आपली तुकडी विभागण्यात आली आणि या तुकडी-पैकी काही जवान लुंपूपासून हा-थुंग-ला खिंडीमार्गे धोलापर्यंत पाठवण्यात आले या जवानांची मुख्य कामे दोन होती. एकतर किती चिनी आपल्या हद्दीत घुसलेत ? त्यांची ताकद किती ? ते कुठे कुठे आणि कसे घुसलेत याची खबर द्या आणि दुसरे म्हणजे धोला काहीही करून लढवा ! ९/ पंजाबच्या उर्वरित जवानांना अवघ्या चार तासांची नोटीस दिली गेली, 'तयार राहा.' कुठल्याही क्षणी आघाडीवर लढण्यासाठी जावे लागेल. आणि अक्षरशः चार तासांच्या आत जवानांनी मला कळवले की, "आम्ही तयार आहोत; फक्त हुकूम द्या की, निघालोच पुढे !"

दहा सप्टेंबरला जनरल प्रसाद हेलिकॉप्टरने आले आणि आल्याबरोबर विश्रांती

न घेता त्यांनी माझी, कमांडिंग ऑफीर्सरची आणि असिस्टंट पोलिटिकल ऑफीसर व्ही. व्ही. मोंगिया यांच्या भेटी घेऊन चर्चा केली. त्यांनी एकूण परिस्थितीचा अंदाज घेतला. धोला विभागात काहीही तयारी नसताना घाईघाईत चिन्यांशी सामना देणे ठीक नव्हे या माझ्या मताशी खुद्द जनरल प्रसाद सहमत झाले; पण काय करणार? आता लढाईला सुरुवात झाली होती. आणि एकदा लढाई सुरू झाली की, लष्करी अधिकाऱ्याला मत नसते. जो हुकूम येईल त्याची त्याने फक्त अंमलबजावणी करायची असते. धोला या ठिकाणाबाबतची ताजी खबर ऐकून GOC ने आम्हांला पुढीलप्रमाणे हुकूम दिले :–

१. ७ व्या पायदळ तुकडीने धोला या ठिकाणी आघाडीवर जाऊन चिन्यांशी सामना देण्यासाठी ४८ तासांच्या आत तयार राहावे.

२. १/९ गुरखाज या रजेवर गेलेल्या आणि योल या ठिकाणी जाण्यासाठी गाडीत चढण्याच्या तयारीत असलेल्या जवानांना तात्बडतोब कळवा की, त्यांची रजा रद्द केली गेली आहे; त्यांनी आघाडीवर परत यावं.

२/ राजपूत ही ताज्या दमाची तुकडी ७ व्या पायदळ तुकडीच्या मदतीसाठी शक्य तितक्या लवकर पाठवली जाईल.

३. ७ वी पायदळ तुकडी तावांगमधून धोलापर्यंत जाईल. याचा अर्थ तावांग चिन्यांसाठी मोकळे सोडा, असा नव्हे. १/ सीख ह्या तुकडीने तावांगमध्येच राहावे आणि प्राण पणाला लावून तावांगचे संरक्षण कुठल्याही परिस्थितीत करावे.

४. ९/ पंजाब या तुकडीने शक्य तितक्या लवकर लुंपूकडे रवाना व्हावे.

५. पंजाबी कंपनी आणि आसाम रायफल्सच्या तुकडीतल्या जवानांनी भराभर पावले उचलावीत (Must move faster !) आणि शक्य तितक्या लवकर आघाडीवरच्या जवानांशी संपर्क साधावा. ( वाटेत रस्ता कसा आहे? एकूण अंतर किती आहे? किती वेळ लागावा, याचा ऑर्डरमध्ये उल्लेख नाही. )

६. पायदळ तुकड्यांना वेळीवेळी अन्नपुरवठा केला जाईल. (would be arranged) या बाबतीत मी जरा साशंकच होतो. पायदळ तुकड्या सर्वस्वी विमानांतून 'पडणाऱ्या' अन्नावर जगणार. हवामान कसे असेल? आपल्याकडे विमाने पुरेशी आहेत का? बरे, एवढे करून ज्या ठिकाणी पिशव्या टाकायच्या ते ठिकाण तरी 'सुटेबल ड्रॉपिंग झोन' हवे ना. नाहीतर? ... मी विचार करायचे सोडून दिले. सर्वस्वी दैवगतीवर आणि अनिश्चिततेवर अवलंबून राहून कमांडर या नात्याने जवानांना काही हुकूम द्यायला मी तयार नव्हतो. त्यातसुद्धा दुसरी गोष्ट अशी होती की, लढाई हरलो असतो तर त्याला एअर फोर्स जबाबदार नव्हते. जबाबदार होत्या त्या पायदळ तुकड्या. कारण एअर फोर्स हवामान कंट्रोल करू शकत नव्हते. जादा विमाने एअर फोर्स आणू शकत नव्हते, किंवा भारत सरकारच्या मदतीशिवाय पिशव्या अचूकपणे खाली टाकणारे यंत्र आणू शकत नव्हते.

एअर फोर्स पायदळ तुकडीच्या कमांडरला फक्त आश्वासन देऊ शकत होते की, तुमच्या मागणीप्रमाणे पुरवठा शक्यतो करू.

७. जे जवान रजेवर गेले असतील त्यांना परत बोलावू नका. पण रजेवर जाण्याच्या तयारीत असलेल्या आणि मिसमारी येथे अडकून पडलेल्या जवानांना मात्र ताबडतोब परत बोलवा.

८. लेफ्टनंट कर्नल मिश्रा यांच्याकडून असे कळविण्यात आले की, बचावाची दिशा खालीलप्रमाणे असावी :—

अ ] ही जमीन आमची आहे, कृपा करून परत जा, अशा अर्थाने चिन्यांचे मन वळवा हृदयपरिवर्तन करा (... Persuade them to leave Indian Territory and go back.)

ब ] जर का चिन्यांनी हे ऐकले नाही तर पायदळ तुकड्या पुढे पाठवा आणि त्यांना आणखी आत येऊ देऊ नका.

'हुकूम' वाचूनच हे कळत होते की वादग्रस्त टापूतदेखील आपल्या चौक्या कशा लढवायच्या याचा अंदाज आर्मी हेडक्वार्टरला आलेला नाही. १९४३–४४ मध्ये जर्मन कमांडर इन् चीफपुढे इटलीमध्ये हाच प्रश्न होता. काय केले कमांडर इन् चीफ कैसरलिंगने ? त्याने आधी प्लॅन रचला. त्याच्या लक्षात आले की शत्रू जोरदार आहे. इंच इंच लढवण्यात अर्थ नाही. जिकडे शक्य असेल तिकडेच शत्रूला ठोकू आणि शेवटी मार्शल कैसरलिंग लढाई जिंकला. आपल्यापुढे प्रश्न तोच होता. फरक असलाच तर हा होता की, मार्शल कैसरलिंगला समुद्र किनाऱ्यावर लढायचे होते तर आपल्याला जमिनीवर.

GOC बरोबर या बाबतीत खाजगीत माझे बोलणे झाले. मी त्यांना स्पष्ट सांगितले की, "एकदा का कमांडर आघाडीवर पुढे गेला की आर्मी हेडक्वार्टर्सशी त्याचा संबंध तुटतो. डोंगराळ प्रदेशात वेळ ही अंतरावर मोजली जाते, तासांवर नव्हे. आपल्याकडे एका ब्रिगेडला फक्त दोन स्टाफ ऑफीसर्स आहेत. त्यांनी दररोज एकमेकांना भेटले पाहिजे. त्याशिवाय 'पुढची हालचाल' कळायची नाही. काय प्लॅनस् आहेत आपल्याकडे ?"

एक लक्षात घ्या की, कमांडर म्हणजे फायर ब्रिगेडचा मनुष्य नव्हे, की जिथे आग लागेल तिथे धरली 'नळी' ! कमांडर 'हा कमांडर' असतो. हे मी माझ्या मोठेपणासाठी लिहीत नाही. आता काय मी तर रिटायर्ड झालो. माझ्या मोठेपणाचा प्रश्नच उपस्थित होत नाही. हे मी एवढ्याचसाठी लिहिले की, सिनियर ऑफीसरला फ्रंटवर पाठवायची आपल्याला घातुक सवय आहे. जरा काही झाले की "ब्रिगेड कमांडर कुठाय ?" अशी आरडाओरड केली जाते. मी GOC च्या लक्षात आणून दिले की, ७ व्या पायदळ तुकडीपैकी ९/पंजाब ही एकच तुकडी आता माझ्याजवळ शिल्लक आहे. पुढच्या तीन दिवसांत ही तुकडीसुद्धा पुढे जाईल

आणि त्यांच्याबरोबर मी पण जाईन. जवानांना पुढे जायला सांगून कमांडर मागे राहिला, अशी टीका माझ्यावर कुणी करायला नको. आणि आम्ही एकदा का पुढे गेलो की, आर्मी हेडक्वार्टर आणि डिव्हिजन यांच्याबरोबरचा आमचा संपर्क तुटेल. कारण आघाडीवरच्या माझ्या संपूर्ण ब्रिगेडजवळ फक्त ६२ वायरलेस सेटस् आहेत आणि ही ब्रिगेड जवळ जवळ २२ मैल लांब विखुरलेली आहे. पुढे काय चाललंय ते मागे समजायचे नाही आणि तुमचे पुढचे हुकूम काय आहेत, ते आम्हांला पुढे वेळे-वर कळायचे नाहीत; कारण संदेशांची ने-आण करायला माध्यमच नाही.

त्यावर GOC नी मला सांगितले की, "९ / पंजाब ही तुकडी लुंपू या ठिकाणी जाईपर्यंत तू तावांगमध्येच हेडक्वार्टरमधे थांब. ९ / पंजाब या तुकडीतले जवान लुंपूला पोचले की, लुंपूमध्ये तुला घेऊन येण्यासाठी मी हेलिकॉप्टर पाठवीन."

एवढया हालचाली होईपर्यंत त्या दिवशी एकीकडे धोला पोस्टकडून उलटसुलट आणि वेडयावाकडया, अभद्र बातम्या येतच होत्या. ज्या तुकडया 'मदती'साठी टाकोटाक पुढे पाठवल्या आहेत, त्यांनी काय प्रगती केली, याची चौकशी मी करीत होतो. संकट कधी एकटे येत नाही. एखादा दिवस असा उजाडतो की, त्या दिवशी एक काम सरळ होत नाही. ८ सप्टेंबर १९६२ हा दिवस त्यांपैकी एक होता की काय? मदतीकरता म्हणून तावडतोब पुढे पाठवलेल्या ९ / पंजाब या तुकडीतल्या जवानांवरोबर वाटाडया नव्हता. रस्ता अनोळखी. हा-थुंग-ला खिंडीपलीकडे गेल्या-वर हे आपले जवान रस्ता चुकले आणि मदत वेळेवर पोचू शकली नाही.

त्या दिवशी रात्री GOC जनरल निरंजन प्रसाद यांच्याशी मी मनमोकळे-पणाने गप्पा मारल्या. अधिकाराने जरी ते वरिष्ठ होते तरी त्यांच्यात आणि माझ्यात स्नेहाचे नाते निर्माण झाले होते. १९४९ पासून त्यांचा-माझा घनिष्ठ संबंध आला होता. १९४९ मध्ये जनरल निरंजन प्रसाद 5th रॉयल गुरखा राय-फल्स रेजिमेंटल सेंटरचे कमांडर होते आणि मी त्यांच्या हाताखाली सेंकंड–इन्-कमांड म्हणून काम केले होते. आमचे नाते आता लष्करी दर्जाचा विचार कर-ण्याचे राहिले नव्हते. गेली कित्येक वर्षे आमचा नुसता परिचयच नव्हता तर मैत्री होती. जनरल निरंजन प्रसाद माझे मित्र आहेत, असे सांगायला मला अभिमान वाटावा इतके ते सभ्य आणि सुसंस्कृत होते. त्यांच्याशी गप्पा मारताना माझ्या मनात सारखा विचार मात्र असा येत होता की, हा माणूस एक शिस्तप्रिय सोल्जर या नात्याने आपल्याला अडचणीत आणणाऱ्या, अशक्य कोटीतल्या योजनांना कसून विरोध करण्याचे नैतिक धाडस दाखवील काय? गप्पा मारता मारता आमच्या १२ सप्टेंबरच्या मिटिंगमध्ये जे काही ठरले होते त्याची मी त्यांना आठवण करून दिली आणि स्पष्ट इशारा दिला की, "लक्षात आहेना? त्याच दिवशी हे स्पष्ट झालंय की नाम-का चू खिडीत आपली लष्करी ताकद फक्त एका बटालियनची आहे. या बटालियनमधले जवान फार फार तर धोला पोस्टवरच्या जवानांना हिंमत

देऊन चिन्यांना थोपवू शकतील, पण फक्त थोपवू शकतील. कारण चिन्यांनी अजून म्हणण्यासारखी लढाई सुरू केलेलीच नाही. पण जर का सर्व शक्ती पणाला लावून चिन्यांनी युद्ध सुरू केले तर आपल्या या एकमेव बटालियनचा धुव्वा उडेल! कारण शत्रूला अडवणे, थोपवून धरणे आणि लढाईत त्याचा नि:पात करणे या दोन गोष्टी फार वेगळ्या आहेत. लढण्यासाठी ताकद जास्त लागते." मी त्यांना पुढे असेही म्हणालो की, "हे तुम्हांला मी का सांगितले ? फक्त एकाच हेतूने की, तुम्ही स्वभावाने सरळ आहात. प्राप्त परिस्थितीत प्रचंड आणि सुसज्ज चिनी सैन्याशी लढाई करणे केवळ अशक्य आहे हे ठाऊक असून आयत्या वेळी राजकीय दडपणाला बळी पडाल आणि वरून येणारे वेड्यासारखे हुकूम जसेच्या तसे पाळायच्या भरीस पडाल. भारत सरकारच्या लष्करीदृष्ट्या अर्थहीन असलेल्या हुकमांना कसून विरोध करा. ऐन प्रसंगी तुम्ही तेझपूरलाच असल्यामुळे वस्तुनिष्ठ विचार करून सत्य सांगू शकाल. सरकारला खबरदारीचा आणि सबुरीचा सल्ला देऊ शकाल. मला मात्र कटू सत्य बोलता येणार नाही. कारण मी असेन फ्रंटवरचा कमांडर. मीच जर का असे काही कटू सत्य बोलायला लागलो तर माझ्यावर नाही नाही ते आरोप येतील. मला भ्याड म्हणतील. शिवाय त्याच्या जोडीला ते 'पश्चिमी राष्ट्रांचा हस्तक' आणि 'सैन्यात घबराट माजवणारा' हे नेहमीचे आरोप आहेतच. तेव्हा मी जे बोलू शकत नाही. ते तुम्ही स्पष्टपणे बोला."

मी त्या वेळी मिळणाऱ्या चुकीच्या हुकमांचा विषय उकरून काढला व तो अशासाठी की, भविष्यात असे कधी पुन्हा घडू नये. उदाहरणार्थ, बघा, चिनी थाग–ला विभागात घुसल्याबरोबर सातवी पायदळ तुकडी थाग-ला विभागात केन्द्रित करण्याचा हुकूम ईस्टर्न कमांडकडून सुटला. तावांगमधल्या परिस्थितीचा ईस्टर्न कमांडने अंदाज घेतला होता काय ? कमांड हेडक्वार्टरने या बाबतीत ब्रिगेड कमांडर, डिव्हिजनल कमांडर आणि कोअर कमांडरशी चर्चा करायला नको ? जवानांची तुकडी म्हणजे काय मेंढरांचा कळप आहे, की आपली मुकी बिचारी कुणी हाका ? नको त्या ठिकाणी, नको त्या वेळी नेल्यामुळे कित्येक जवान प्राणास मुकले. ७ व्या पायदळ तुकडीतले जवान फार फार तर तावांगचे संरक्षण कसेबसे करू शकले असते. चांगली शस्त्रास्त्रे हाती नसताना, अन्न-पाणी मिळण्याची शाश्वती नसताना, भौगोलिक प्रदेश प्रतिकूल असताना सरळ सरळ वादग्रस्त टापूत एकदम पुढे जायचा हुकूम निश्चितच चुकीचा होता. आपण नागा बंडखोरांशी किंवा काश्मिरी पठाणांशी लढणार नव्हतो. लढणार होतो ते बेरक्या, बलिष्ठ आणि प्रचंड चिनी सैन्याबरोबर! शहरात कुठे काही गंभीर प्रकार घडला की ट्रक्स भरभरून कॉन्स्टेबल्स पाठवले जातात. त्यांची संख्या वाढली की, तावडतोब शांतता प्रस्थापित होते. लढण्यासाठी जवान मात्र या पद्धतीने पाठवायचे नसतात, तर त्यांना कुठे पाठवायचे, पाठवायचा उद्देश काय, कुठल्या पद्धतीने त्यांना पुढे पाठ-

वायचे, त्यांचा एकमेकांशी संपर्क कसा राहील आणि त्यांना निश्चित काय कामगिरी करायची याचा विचार प्रत्यक्ष हुकूम देऊन त्यांना हलवण्यापूर्वी करावा लागतो.

चीन-भारत युद्धात आपली काय परिस्थिती होती याची आतापर्यंत मी दिलेली माहिती ही फक्त नांदी होती. पुढचे भीषण नाट्य आत्ता कुठे सुरू होणार आहे.

(क्रमशः).

From Himalayan Blunder by Brig. J. P. Dalvi
Thacker & Co. © with the Original Publisher

## क्रीएशन्स इन वुड

[ पान ४१ वरून ]

प्रदर्शनात मात्र आकार अवधानाचे विशेष दर्शन घडले.

अर्थात कोणत्याही प्रामाणिक कलावंताप्रमाणे सौ. कोठारी अजून खूप अस्वस्थ आहेत. विरचनेचे शास्त्रशुद्ध शिक्षण घ्यावे, काष्ठशिल्पे निर्माण करण्याचे प्रयत्न करावेत असे त्यांचे अनेक संकल्प आहेत.

भारतीय लोककलेची (फोक आर्टची) परंपरा कितीही विविध असली तरी त्या त्या मातीतून निर्माण होणाऱ्या प्राकृतिक सौंदर्याच्या विरचनेचे असे नवे प्रयत्न झाल्याशिवाय ती खऱ्या अर्थाने अखंडित राहणार नाही. म्हणूनच सौ. कोठारींचे हे प्रदर्शन पाहत असताना खूप आशा मनात निर्माण झाल्या. त्याचबरोबर या काष्ठक्रियेच्या प्रदर्शनापासून स्फूर्ती घेऊन कदाचित मुंबईतील काही हौशी रसिकांचे पाय कधीतरी पाऊलवाटांकडे वळतील, असा विचार मनात येऊन बरे वाटले. ○

# रंगभूमि

## स्नेहसंमेलन

रोजच्या सात–आठ तासांचे नियमित काम चालू ठेवायचे, घरच्या जबाबदाऱ्या सांभाळायच्या आणि मग अवती भवतीची चार मंडळी घेऊन व एकांकिका बसवून 'औद्योगिक ललितकला मंडळा'च्या स्पर्धेत उतरायचे. स्पर्धा म्हटल्यावर यशाचे स्वरूप मर्यादित होते. ते तसे ते याही स्पर्धेत झाले. बाकीच्यांच्या वाटचाला आला तो आनंद.

'औद्योगिक ललितकला मंडळ ' हे गेली चार वर्षे या स्पर्धा भरवीत आहे. यंदाचे स्पर्धेचे पाचवे वर्ष संख्यात्मक दृष्टीने विचार केला तर स्पर्धेला वाटते यश मिळत आहे, असे म्हणावे लागले. गुणात्मक दृष्टिकोणातून विचार केला तर फारसे काही हाती लागत नाही, असेच म्हणावे लागेल व लागावे अशी निदान माझी तरी आपेक्षाही नाही, म्हणूनच या स्पर्धेकडे पाहण्याचा दृष्टिकोण स्वाभाविकपणेच मवाळ होता. नाट्यस्पर्धांच्या कसोट्या लावून या स्पर्धेचे मूल्यमापन करण्याच्या भरीस न पडता कामगारांच्या या सांस्कृतिक मेळाव्यात जे लक्ष्यणीय वाटले त्याची दखल मी घेणार आहे.

चालू वर्षाच्या स्पर्धेमध्ये पुण्याच्या परिसरातील विविध औद्योगिक संघटनांतर्फे एकवीस एकांकिका सादर करण्यात आल्या. राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन यांच्या दुर्दैवी निधनामुळे कार्यक्रमपत्रिकेचे वेळापत्रक बदलावे लागले. परीक्षक, प्रेक्षक व स्पर्धक या तिन्ही संबंधित वर्गांना या बदलाचा त्रास सोसावा लागला. रोज 'तीन एकांकिका ' हे जुने वेळापत्रक रद्द करून दररोज पाच एकांकिकांचा कार्यक्रम असलेले वेळापत्रक अंमलात आले आणि उत्साहपूर्ण वातावरणामध्ये सुरू झालेल्या या स्पर्धा अकारण कंटाळवाण्या भासल्या.

### अनोखी 'रात्र'

स्पर्धेमध्ये सादर करण्यात आलेल्या एकवीस एकांकिकांमध्ये सर्वोत्तम म्हणून 'रात्र' या एकांकिकेचा उल्लेख करावा लागेल. 'चीफ इन्स्पेक्टोरेट ऑफ आर्मामेंटस् 'तर्फे सादर करण्यात आलेल्या या एकांकिकेमध्ये रोहिणी ओक (ती)

-यांचा विशेष प्रभाव पडला. वातावरणनिर्मिती, प्रकाश-योजनेचा सुयोग्य वापर, कलाकारांची भूमिकेची समज यांमुळे प्रयोग उचलला गेला.

सर्वसाधारणपणे स्पर्धा आणि गंभीर प्रकृतीची नाटचकृती यांचे विलक्षण सख्य आहे. तथापि टाटा इंजिनीयरिंग लोकोमोटिव्ह कं. लि. च्या प्रेस टूल डिव्हिजनने ' सदू आणि दादू ' चा सुंदर प्रयोग करून प्रेक्षकांना (आणि परीक्षकांनाही) जिंकून घेतले. स्पर्धेतील अनेक पारितोषिके मिळवण्याचा मान या एकांकिकेने मिळवला. अभिनय, दिग्दर्शन आणि प्रयोग या तिन्ही क्षत्रांत या एकांकिकेने पारितोषिके मिळवली. नाटचातील तंत्राच्या वाढत्या वडेजावावर या एकांकिकेमध्ये मोठी मिस्किल टीका आहे. दिग्दर्शक श्री. शशिकांत दिघे यांनी एकांकिकेचा प्रयोग नीटस केला. सुदैवाने त्यांना कलाकारांकडून उत्तम साथ मिळाली. त्यांच्या ' दादू ' (विहंगनायक) स्पर्धेतील विनीचा कलावंत ठरला. कलाकारांची संख्या भरपूर असूनही प्रयोगाची पातळी सांभाळण्यात यशस्वी ठरलेला हा एकमेव प्रयोग. उत्कृष्ट संघ म्हणून यशस्वी ठरून हा संघ मानाचे पान घेऊन गेला.

**' सतरा वर्षे '**

ॲम्युनिशन फॅक्टरीतर्फे मो. ग. रांगणेकरांच्या ' सतरा वर्षे ' या एकांकिकेचा प्रयोग सादर करण्यात आला. नीटस दिग्दर्शन, समजूतदार अभिनय आणि सुयोग्य पार्श्वसंगीत, ही या प्रयोगाची वैशिष्टचे. प्रयोगाच्या यशाचे पुष्कळसे श्रेय दिग्दर्शक डॉ. प्रभाकर देशपांडे यांच्याकडे जाते.

याखेरीज प्रयोग म्हणून ज्यांची दखल घ्यावी अशा दोनच एकांकिकांचा उल्लेख करतो. अडवानी ऑर्लिकॉन प्रा. लि. या संघाने सादर केलेला—' गुंता ' आणि इंटरनॅशनल कॉम्प्यूटर्स इंडियन मॅन्युफॅक्चर लि. चे ' जग हे वंदीशाळा ' हे दोन प्रयोग ठीक आले.



स्पर्धेतील एकवीस एकांकिकांपैकी ज्यांची दखल घेतली जावी अशा, दहा एकांकिकाही मिळू नयेत हे या स्पर्धेचे अपयशच म्हणावे लागेल. स्पर्धेतील कित्येक एकांकिका अती हिणकस झाल्या. 'प्रायश्चित्त' या ऐतिहासिक एकांकिकेची केविलवाणी शोकान्तिका झाली. छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका करणारा कलावंत मागून मिळणाऱ्या साहाय्याखेरीज एक वाक्य बोलायला तयार नव्हता. 'रोगी, डॉक्टर आणि यम' ही एकांकिका स्पर्धेसाठी निवडणाऱ्या हुशार मंडळींच्या अकलेचे कौतुक करावे तेवढे थोडेच ! एकांकिकांचा प्रायोगिक दर्जा, कलाकारांचा वैयक्तिक अभिनय, रंगमंचावरील प्रकाश, ध्वनी, नेपथ्य आदी बाबींतील आधुनिक तंत्रांचा वापर या दृष्टिकोणातून बहुसंख्य नाटयसंघांनी निराशा केली.

मग स्वाभाविकपणे प्रश्न उभा राहतो तो हा की, या स्पर्धांनी साधले काय ? माझ्या मते या क्षेत्रामध्ये विशेष गोडी असणाऱ्या कामगार मंडळींना या स्पर्धा एकत्र आणतात. स्पर्धा भरवणाऱ्या संघटनेचे उद्दिष्ट एवढेच मर्यादित असावे असे वाटते.

स्पर्धातील कलावंत, प्रेक्षक, आणि अन्य संबंधित यांची मुद्दाम भेट घेतली असता त्यांच्या अनेकविध अडचणींचे स्वरूप समजून आले.

स्पर्धेमधील प्रयोगांतून काही गुणी कलावंत जरूर आढळले. त्यांना सुयोग्य मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. पुण्यातील हौशी नाटयसंस्था व या स्पर्धांचे संयोजक यांना या दृष्टीने संबंधितांना मदत करणे शक्य आहे. अशा कलावंतांमध्ये प्रतिभा फडणीस (परिवर्तन-पार्वती), आनंद बाजीकर (सत्य-पहिला इसम), अरुण भिडे (लाल गुलाबांची भेट-तो), वेलणकर (गुंता-दिग्दर्शक), हेमा जोशी (काळोख-यमू), सुधीर साने (जग हे बंदीशाळा–शंकर) आदी कलावंतांचा वानगीदाखल उल्लेख करतो. स्पर्धेत भाग घेणाऱ्या कलावंतांना संबंधित कंपन्यांकडून फारसे सहकार्य मिळत नाही, अशी अनेक कलाकारांनी तक्रार केली. सवलती विशेषतः दोन प्रकारच्या अपेक्षित आहेत. प्रयोगाच्या तालमीसाठी वेळेची सवलत आणि प्रयोग उभा करण्यासाठी आर्थिक साहाय्य. या बाबतींत स्पर्धा संयोजकांनी आणि कलावंतांनी आपल्या कार्याचे महत्त्व मालक मंडळींना पटवून द्यावे. यथाकाल याबाबत काही सवलती मिळतील, अशी अपेक्षा आहे.

स्त्री–कलावंत मिळण्याबाबत अनेक अडचणी येतात. 'पाहुणे स्त्री-कलाकार' विशिष्ट संघामध्ये काम करण्यास राजी असतात. त्यात विशेष कुशल स्त्री-कलाकार विशिष्ट संघांना मिळत गेल्यास अन्य संघांवर स्वाभाविकपणेच अन्याय होतो. या संदर्भात काहीतरी मार्ग काढणे जरुरीचे आहे. स्पर्धांना सध्या असलेले स्नेहसंमेलनाचे स्वरूप हळूहळू बदलत जाऊन स्पर्धा जेव्हा खऱ्या तेजाळतील तेव्हाच स्पर्धेला प्रेक्षकांचा उदार आश्रय मिळेल.

– शरद गोखले

# प्रेम आणि मरण

(पान १५ वरून)

नव्हता, तो मरून पडतापडता हसला; जी पानं वादळाच्या थैमानातही हलत नव्हती, ती अखेर या शेवटच्या स्पर्शानं फडफडून हसली, कळ्या खुलत नव्हत्या त्या कायमच्या खुलल्या ! या कडव्यात आधीच्या काही ओळींचा जणू उत्तरार्ध ऐकू येतो.

" **तो योग । खरा हटयोग । प्रीतिचा रोग लागला ज्याला । लागते जगावे त्याला हे असे !** " या ओळी, मागे चौथ्या कडव्यात आलेल्या आहेत. आता त्यांचाच उत्तरार्ध किंवा Counterpart या बाराव्या कडव्यात ऐकायला सापडतो. त्यात फक्त दोन शब्दांचा फरक आहे. चौथ्या कडव्यात **लागते जगावे त्याला ।। हे असे ! ।।** अशा ओळी आहेत; तर बाराव्या कडव्यात **लाभते मरणही त्याला ।। हे असे ।।** अशा ओळीत त्याच जीवनाची दुसरी शोकान्त पण दिग्विजयी बाजू दाखविली आहे !

व्यवहारवादी शहाण्यांचे अशुभ शब्द अशा प्रकारे खरे ठरतात; पण विजय आणि वैभव (Glory) मात्र वेड्या वृक्षाच्या वाट्याला येते. ध्येयवादात येणारं मरण म्हणजे नाश नसून अमरत्व असतं. जीवनसार्थक्य म्हणजेच मरणावर मात. प्रेमाचा एक क्षण म्हणजेच अमरत्व आणि अनंतत्व. आजचे विश्वविख्यात गूढवादी जे. कृष्णमूर्ती म्हणतात–Love is its own Eternity. "

प्रेम आणि मरण या दोन्ही अनुभवांचा एक सर्वस्वी वेगळा अर्थ आणि एक सर्वस्वी वेगळं मूल्यमापन कवीनं या कवितेत दाखविलं आहे. अलीकडचे टीकाकार म्हणतात. "गडकरी केवळ शब्द चमत्कार आणि कल्पना चमत्कार करून दाखवितात; त्यांच्या कवितेत श्रेष्ठ अनुभव नाही. "

' प्रेम आणि मरण ' ही कविता वाचूनही ते तसं म्हणत असतील, तर त्यांची धन्यच म्हटली पाहिजे ! O

(पुणे आकाशवाणीच्या सौजन्याने)

# तुमचे भविष्य
# आमचा अंदाज

## २४ ते ३० मे राशिभविष्य

श्री. गो. जोशी सायनाचार्य

**मेष :** या आठवड्यापासून आपला अनिष्ट काल ओसरू लागल्याची लक्षणे दिसायला लागतील. याचा अर्थ सहजासहजी कामे यशस्वी ठरतील असा नव्हे. शिकस्तीचे प्रयत्न करावेच लागतील.

अनेक कार्यक्रम धावपळीने करावे लागतील. रेंगाळलेली सारी कामे निपटून काढावी लागतील आणि आपल्या परिश्रमांचे श्रेयही आपणांस लाभेल.

मंगल कार्यात भाग घ्यावा लागेल. व्यवसायधंद्याचे तंत्र सुधारेल. अपेक्षेपेक्षाही अधिक सहकार्य लाभेल.

दि. २४ ते २६ हे दिवस लाभाचे जाणवतील.

**वृषभ :** सूर्य–मंगळांच्या कोंडीत तुम्ही सापडला आहात. थोडा ताण बसेल, धावपळ–धडपड खूपच करावी लागेल. उद्योगधंद्यात नवे धोरण आखावे लागेल. पण या कालात आपल्या कार्यात अत्युत्तम यश आपण पदरी पाडून घेऊ शकाल.

व्यावहारिक संघर्षाची धार बोथट बनेल, सहकारी आता आपणांकडे सहानुभूतीने पाहू लागतील, नोकरीधंद्यातील अनेक किचकट प्रश्न या आठवड्यापासून सुटायला लागतील.

सांपत्तिक अनुकूलता निर्माण होण्याची लक्षणे दिसू लागतील. साडेसातीबद्दल सध्याच काही त्रास जाणवेल, अशी भीती बाळगण्याचे कारण नाही.

दि. २६ ते २८ अनुकूल व प्रगतिदायक काल.

**मिथुन :** सभोवारची परिस्थिती हळूहळू निवळू लागल्याची लक्षणे दिसू लागतील. मार्गातील अनेक अडीअडचणी थोरांच्या प्रयत्नांनी दूर होऊ लागतील.

सध्याचे दिवसही अनिष्टच; पण पूर्वीइतकी अनिष्टता जाणवणार नाही आणि म्हणूनच हा काल काहीसा अनुकूल आहे, असे मला म्हणावेसे वाटते.

प्रकृतिमान ठीक राहील, व्यावहारिक अडचणींवर मात करू शकाल, उद्योग-धंद्याचे वातावरण निवळू लागेल, नजीकच्या कालात प्रगतीला पोषक घटना घडू शकतील. अशी आशा वाटू लागेल.

दि. २८ ते ३० अनुकूल व लाभदायक काल.

**कर्क** : लाभस्थानी सूर्य–बुध आल्यापासून तुम्हांला कोणत्याही गोष्टीची उणीव भासू शकणार नाही. अनपेक्षितपणे आपण हाती घेतलेल्या कामांत असे घवघवीत यश मिळेल की, तुम्ही आश्चर्यचकित व्हाल.

परराष्ट्रीय आयात–निर्यात व्यवहाराशी संबंध असणाऱ्या व्यक्तींना हा काल महान पर्वणीच जाणवेल. जवाहीर, सौंदर्यप्रसाधने या व्यवहारांत अफाट लाभ उठवू शकाल. तात्पर्य, सध्या आपण काहीही केलेत तरी ते अपेक्षेबाहेर लाभाचे ठरेल.

दि. २६ ते २९ अनपेक्षित लाभही व्हावा.

**सिंह** : वक्री मंगळाची क्षिती न बाळगता आपण पुढे पाऊल टाकलेत तर ते पथ्यावरच पडेल. सूर्य दशमात आल्याने सध्या आपणांस कोणताच ग्रह बाधू शकणार नाही.

सामाजिक प्रतिष्ठा उंचावेल, राजकीय क्षेत्रात खूपच दबदबा वाढेल, व्यवहार-धंद्यांत तर तुमच्या बरोबरीच्या लोकांना तुम्ही कितीतरी मागे टाकाल. अनेक धाडसी कार्यक्रमांना प्रारंभ केला जाईल. व्यावहारिक यश खूपच लाभेल. स्थावरासंबंधीचे सर्व प्रश्न भराभर सुटतील.




दि. २८ ते ३० अनेक कामे गतिमान बनतील.

**कन्या :** भाग्यस्थानी सूर्य–बुध एवढा एक योगही तुमचे समाजातील स्थान अत्युच्च ठरवायला पुरेसा आहे. या आठवड्यात व आगामी ८–१५ दिवसांत तुम्हांला दूरचा प्रवास घडेल, सांपत्तिक लाभ मोठ्या प्रमाणांत पदरी पडेल, उद्योगधंद्याचे तंत्र आत्मसात झाल्याने तुम्हांला सहसा कोणी प्रतिस्पर्धीच उरणार नाही.

तात्पर्य, येथून आपल्या जीवनाला निश्चितपणे चांगले भरीव वळण लागेल.

यांत्रिक, विद्युत क्षेत्रांतील व्यक्तींना तर हा एक सर्वोत्तम प्रगतीचा काल जाणवेल.

दि. २७ ते ३० अपेक्षित यश पदरी पडेल.

**तूळ :** धनस्थानी मंगळ, अष्टमांत सूर्य या दोन्हीही ग्रहांचा ताप-संताप तुम्हांला सहन करावा लागत आहे. गुरूचीही सहानुभूती लाभू शकत नाही. काही दिवस हे असे सहन करण्यावाचून गत्यंतर नाही.

बारिकसारिक अनारोग्याच्या तक्रारी जाणवायला लागतील. पैसा हाती बराच येईल, पण खूप पैसा येऊनही सांपत्तिक ताण जाणवत राहील.

दैवापेक्षा प्रयत्नांवरच तुमचा भर अधिक असल्यामुळे या अनिष्ट कालीही तुमचे ईप्सित सिद्धीस जाईल. दूरच्या प्रवासाचे शक्यतो टाळा.

दि. २४ ते २६ थोडाफार लाभ होईल, प्रिय जनांच्या भेटी होतील.

**वृश्चिक :** ग्रहस्थिती पूर्णत्वाने अनुकूल आहे. पण अविश्रांत परिश्रमांचीही गरज आहे. अपेक्षित यश खूप परिश्रमानंतरच पदरी पडावे, अशीच ग्रहस्थितीची इच्छा दिसते. गेल्या आठवड्यातील र △ ह पासूनच तुमची प्रगती वेग घेऊ लागलेली आहे. आता तुम्हांला क्षणाचीही उसंत नाही.

मोठ्या प्रमाणावर नवे व्यवसायक्षेत्र उभारण्याच्या खटपटीत असाल आणि त्यात आपणांस यशही चांगले मिळेल.

सांपत्तिक योग अनपेक्षितपणे सुधारतील, थोरांचे सहकार्य कोणत्याही क्षणी लाभेल.

दि. २६ ते २८ अत्युत्तम लाभाचा काल.

**धनू :** राहू-मंगळांची सहानुभूती नसतानाही तुम्ही आपले स्थान अबाधित ठेवलेत यातच तुमच्या कर्तृत्वशक्तीचे दर्शन घडते. हा आठवडा खूपच घाईगर्दीचा, धावपळीचा जाणवेल. अनंत कामे झटपट आवरावी लागतील, मंगल कार्य यथासांगपणे पार पाडण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल.

या काली तुम्ही ठरविलेले, खर्चाचे अंदाजपत्रक साफ चुकेल. उधार-उसनवार

करण्याचा प्रसंग ओढवेल. पण सर्व काही अपेक्षेप्रमाणे घडेल ऐनवेळी कोठूनही मदत मिळेल.

दि. २५ ते २८ खूपच घाईगर्दीचे दिवस.

**मकर** : तुमच्या बाबतींत असे म्हणावेसे वाटते की, अंतरिक्षातील सारे ग्रह तुमच्यावर खूष आहेत. सहज मनात आणले आणि ते यशस्वी झाले याचा प्रत्यय क्षणोक्षणी यायला लागेल.

व्यवसायधंद्यात, नोकरीत अनेक टप्पे ओलांडून पुढे जाल. तुमचे कार्यक्षेत्र निर्वैर, निर्वेध बनेल. मंगलकार्याचे निश्चित ठरेल, अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल.

कला-संशोधन-साहित्य या प्रांतांत तर तुमचे महत्त्व निर्विवादपणे सिद्ध होईल. सामाजिक प्रतिष्ठेची उंची इतकी वाढेल की, आकाशही ठेंगणे वाटावे.

दि. २६ ते २८ या कालाची नोंद करा.

**कुंभ** : सूर्य-बुध चतुर्थात असल्यामुळे फारसे बिघडेल असे नाही; पण काम मंदावतील, धावपळ-धडपड खूपच करावी लागेल.

दि. ३० च्या रवि-मंगळ प्रतियोगाच्या काली काहीसे जुळते मिळते घ्या. प्रकृतीचीही काळजी घ्या.

पण व्यावसायिक बाजू मजबूत राहील. तुमचे सर्व प्रयत्न कारणी लागतील, यश भरपूर पण स्वास्थ्य कमी, असे या कालाचे स्वरूप आहे.

क्षुल्लकशा गोष्टींवरून मतभेद उद्‌भवण्याचा संभव आहे. जरा जपूनच वागायला हवे. या काली दूरचा प्रवास टाळा.

दि. २८ ते ३० अनुकूल व यशदायक काल.

**मीन** : पराक्रमातील सूर्य-बुधामुळे या वेळी तरी तुम्हांला अशक्य-अवघड असे काहीच जाणवणार नाही. शिवाय गुरु-मंगळ अधिकाधिक अनुकूल आहेतच. तुम्ही हाती घेतलेल्या कामांना खरी गती येईल या आठवड्यापासूनच. प्रगतीच्या नव्या वाटा दिसायला लागतील.

संगीत, नाट्य, नृत्य या क्षेत्रांत सदैव आघाडीवर राहाल. आपल्या हयातीत आजच्याइतका सर्वोत्तम प्रगतीचा काल अलीकडच्या कालात हाच होय. सांपत्तिक योग निश्चित सुधारतील.

दि. २७ ते ३० सर्वोत्तम लाभाचा काळ. ०

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649

कव्हर पान १ वरून ........

नाही,' अशा स्वरूपाचे तेजस्वी विचार महाराष्ट्र राज्याचे गृहनिर्माण-मंत्री ना. यशवंतराव मोहिते यांनी कोयना भूकंपाच्या घटनेनंतर व्यक्त केलेले होते व 'माणूस'ने ६ जानेवारी १९६८ अंकाच्या मुखपृष्ठावर रेखाचित्रासहीत या विचारांना प्रसिद्धी देऊन ना. मोहिते यांचा मनःपूर्वक गौरवही केला होता.

असाच एक सुयोग पुन्हा येत आहे. केंद्रीय अन्नमंत्री जगजीवनराम यांनी राष्ट्रपतीपदाबाबत दिल्लीत चालू असलेल्या हालचालींच्या संदर्भात नुकतेच असे उद्‌गार काढले आहेत: 'राष्ट्रपतीपदासाठी एखाद्या हरिजन उमेदवाराची निवड करावयाची असेल तर मी ती उमेदवारी मुळीच स्वीकारणार नाही. उच्च पदावरील उमेदवाराची निवड एखाद्या जातीच्या आधारावर करावी हे मला मुळीच मान्य नाही.' आपण हरिजन असल्यामुळेच वारंवार राष्ट्रपतिपदासाठी आपले नाव घेतले जात असल्याबद्दल त्यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली.

ना. मोहिते यांनी अपल्या अशाच स्वरूपाच्या तेजस्वी विचारांचा पाठपुरावा केला असता तर शहरातील वा खेड्यातील नव्या, उमद्या पिढीचा त्यांना भरघोस पाठिंबा मिळाला असता. या ऐवजी चटकन प्रसिद्धी देणाऱ्या जुन्याच पण 'खळबळजनक' विचार प्रदर्शनामागे ते लागले आणि सगळाच मामला बिघडला. तसेच जगजीवनराम यांचे झाले तर आपले दुर्दैव! पण जातीधर्माच्या कुबड्या वापरूनच आपापले स्वार्थ साधण्यात जो तो मग्न असताना एका हरिजन नेत्याने विशुद्ध राष्ट्रीय दृष्टिकोनाचा आग्रह धरावा, जमातवादामुळे सहज मिळणारे फायदे नाकारण्याची तयारी दाखवावी, हेही शुभचिन्ह काही कमी मोलाचे नाही. जिथे जिथे अशी शुभचिन्हे उमटतील तिथे तिथे त्यांचे आवर्जून स्वागत व्हावे असे 'माणूस'ला वाटते. 'माणूस'च्या या विचारांशी सहमत असणाऱ्यांनी जगजीवनराम यांचे त्यांना पत्रे पाठवून अभिनंदन करावे असेही पुढे जाऊन 'माणूस'ला सुचवावेसे वाटते. **–संपादक**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस, प्रा. लि., १७–ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**